**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७८२/०२**

**श्री.हेमंत कोळी, श्री.अर्जून केणी,**
**तुर्भे मच्छिमार विविध कार्यकारी सहकारी संस्था लि.,**
**राममंदिराजवळ, ट्रॉंबे कोळीवाडा,**
**मुंबई-४०००८८.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त,**
**आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य, तारापोरवाला मत्स्यालय,**
**नेताजी सुभाष रोड,चर्नी रोड, मुंबई-४००००२.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य, तारापोरवाला मत्स्यालय,**
**नेताजी सुभाष रोड,चर्नी रोड, मुंबई-४००००२.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.हेमंत कोळी/श्री. अर्जून केणी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि३.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.१०.०९ रोजी अर्ज करुन तुर्भे, नवी मुंबई उपनगर येथे आरसीसी जेटी बांधणेबाबत एकूण ५ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिनांक १६.११.२००९ च्या पत्रानवये माहिती दिली. अर्जातील मुद्दा क्रमांक२,३ बाबत अद्याप कोणतेही अंदाजपत्रक प्राप्त झाले नसल्याने त्याबाबतची माहिती अपीलकारास निरंक कळविण्यात आली. मुद्दा क्रमांक ४ बाबतची माहिती शोधण्यास विलंब लागणार असल्याने त्याबाबत स्वतंत्रपणे अपीलकारास कळविण्यात येईल. मुद्दा क्रमांक ५बाबत अद्याप अंदाजपत्रक प्राप्त झ ाले नसल्याने याबाबतची कार्यवाही निरंक असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१६.११.०९च्या पत्राद्वारे कळविले आहे. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.३०.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ६ मे,२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी,जन माहिती अधिकारी उपस्थित होते अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन तुर्भे,नवी मुंबई येथे आरसीसी जेटी बांधण्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. द्वितीय अपीलावरील सुनावणीच्यावेळी उत्तरवादीने आयोगास लेखी अहवाल सादर केला. माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता अपीलकाराने उत्तरवादीकडे आवश्यक ते शुल्क भरुन मागणीप्रमाणे माहिती प्राप्त करुन घेतली असल्याचे आयोगासमोर प्रतिपादन करण्यात आले. द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता अपीलकार हजर नव्हते. अपीलकारास आवश्यक ते शुल्क आकारुन उत्तरवादीने माहिती पुरविली असल्याचे सदर प्रकरणी दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:६.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७४६/०२**

**श्री.वैभव चंद्रकांत कोरगावकर,**
**४८/३, राधाकृष्ण निवास,**
**डॉ.आंबेडकर रोड, दादर(पूर्व),**
**मुंबई-४०००१४.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप-आयुक्त(मुख्या-१),**
**पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,**
**मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(मुख्या-१),**
**पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,**
**मुंबई-४००००१.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. वैभव चंद्रकांत कोरगावकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि२४.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.७.११.०९ रोजी अर्ज करुन १)डिफनेस इंडिया रुल्स अंतर्गत महाराष्ट्र पोलीस यांनी महाराष्ट्र राज्यात अधिग्रहित केलेल्या जागांबाबत तपशिल २)त्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशाच्या प्रतीची मागणी कली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.५.१.२०१० च्या पत्रान्वये माहिती कळविली. यामुळे समाधान झ ाले नसल्याने अपीलकाराने दि.२०.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ३.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन महाराष्ट्र पोलीस यांनी महाराष्ट्र राज्यात अधिग्रहीत केलेल्या जागांचा तपशील, त्याबाबत पोलीस महासंचालक यांचया आदेशाच्या प्रतींची मागणी केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी

अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः६.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७४८/०२**

**श्री. अखिलेश एन. गौड,**
**२६, नटवरलाल गणात्रा चाळ, साईनगर कंपाऊंड,**
**एम.जी. रोड, कांदिवली(प.),**
**मुंबई-४०००६७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सहाय्यक महापालिका आयुक्त यांचे कार्यालय,**
**लिबर्टी गार्डन, मालाड(प.),**
**मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(जलकामे),**
**सहाय्यक महापालिका आयुक्त यांचे कार्यालय,**
**लिबर्टी गार्डन, मालाड(प.),**
**मुंबई.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अखिलेश एन. गौड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि४.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.६.१० रोजी अर्ज करुन जल जोडणी क्रमांक पीएनई३४८००८ या नस्तीची माहितीचा अधिकार अध्यादेश २००५ अन्वये पाहणी (Inspection of Work Department) करण्याकरीता वेळ द्यावी, पाहणीच्यावेळी आवश्यक असणा-या सर्व दस्तऐवजाची छायाप्रत माहितीसाठी द्यावी अशी मागणी केली होती. कार्यालयीन वेळेमध्ये रविवार व इतर रजेचे दिवस सोडून रेकॉर्ड असीस्टंट, दुसरा मजला पी/उत्तर, जलविभाग कार्यालय येथे ती फाईल बघू शकता असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.११.७.०९ च्या पत्रान्वये कळविले. कागदपत्राची पाहणी केल्यानंतर जन माहिती अधिका-यांनी कागदपत्राच्या छायाप्रती दिल्या नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.८.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले. कार्यालयात हेलपाटे घालून कागदपत्र मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ३.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते,अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन कार्यालयातील नस्तीची पाहणी करुन जल जोडणी क्र.पीएनई-३४८००८ बाबत अनुषंगिक कागदपत्राच्या प्रतींची मागणी केली होती. अपीलकाराच्या मागणीप्रमाणे जन माहिती अधिका-याने संबंधीत फाईल निरिक्षणाकरीता अपीलकारास उपलबध करुन दिली. अपीलकाराने संबंधीत फाईलचे निरिक्षण केले. परंतू त्यांनी फाईलच्या निरिक्षणानंतर हव्या असलेल्या कागदपत्राची निवड केली नाही असे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने फाईलचे निरिक्षण करुन त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांची निवड करुन त्याची जन माहिती अधिका-यांकडे मागणी करावी. जन माहिती अधिका-यांनी निवडक उपलब्ध कागदपत्राच्या प्रती अपीलकारास पुरवाव्यात.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः६.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७४९/०२**

**श्री. प्रमोद राजाराम पवार,**
**सद्‌गुरु सदन वाचनालय,**
**०६,R२, गोल्डन सोसायटी, शांती पथ,**
**बॅ.नाथ पै नगर, घाटकोपर(पू.),**
**मुंबई-४०००७७. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी(अति./निष्का.),**
**उपजिल्हाधिकारी यांचे कार्यालय,**
**टोपीवाला कॉलेज, सरोजिनी नायडू रोड,**
**मुलूंड, मुंबई-८०.**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,**
**उपजिल्हाधिकारी यांचे कार्यालय,**
**टोपीवाला कॉलेज, सरोजिनी नायडू रोड,**
**मुलूंड, मुंबई-८०. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. प्रमोद राजाराम पवार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि४.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.५.१२.२०१० रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

अे)नाथ पै नगर मधील आमच्या इमारत क्र.आर-१ व आर-२ समोरील त्रिकोणी क्षेत्रफळ असलेल्या सीटीएस नं.२२५ आणि सीटीएस नं.२२६ सहीत पूर्ण जागेच्या नकाशाची खरी प्रमाणित नक्कल प्रत

बी)उद्यानाच्या जागेचे एकूण क्षेत्रफळ व ते बनविल्याचे वर्ष

सी) उद्यानाव्यतिरिक्त जागेचे वाटप आपण कसे केले आहे व त्या हिश्शेदारांची नावे व जागेचे क्षेत्रफळ. स्थानिक आमदार मा.प्रकाश मेहता यांच्या फंडातून २००५ ते २००७ या कालावधीत ६ लाख ३५ हजार खर्चून उद्यानाचे नूतनीकरण करण्यात आले होते तरीसुध्दा लगेच एका वर्षात पुन्हा सदर उद्यानाचे नुतनीकरणाचे काम चालू आहे त्याविषयी माहिती द्यावी.

डी)सांप्रत कोणाच्या फंडातून नुतनीकरणाचे काम चालू आहे

इ)उद्यानाच्या नुतनीकरणासाठी काढलेल्या निविदांच्या जाहिरातीच्या ख-या प्रमाणित नक्कल प्रती

एफ)सांप्रत नुतनीकरणास मंजूरी दिलेल्या ऑर्डरची खरी नक्कल प्रत

जी) उद्यानीकरण करणा-या कंपनीबरोबर झालेल्या कराराची प्रत

एच) काम पूर्ण करण्यासाठी दिलेल्या कालावधीची माहिती

आय)उद्यानातील एकूण किती झाडे तोडली त्याची माहिती

जे) नवीन उद्यानाच्या आराखडयाचा नकाशा प्लानची नक्कल प्रत

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने दि.११.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकार प्रथम अपीलावरील सुनावणीकरीता हतर नव्हते. यामुळे प्रथम अपीलीय अधिका-यांनी प्रथम अपील निकालात काढले. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ३.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अपीलकाराने नकाशाबाबत व उद्यानाविषयीची माहिती मागीतली होती. अपीलकाराच्या अर्जातील मुद्दा क्रमांक अे बाबतची माहिती ही नगर भूमापन अधिकारी, घाटकोपर(पूर्व) यांच्या कार्यालयाशी तसेच बी बाबतची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिका एन विभाग घाटकोपर(पूर्व)यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्याने जन माहिती अधिका-यांनी उक्त अधिनियमातील कलम ६(२)(३)(एक) (दोन) अन्वये अपीलकाराच्या दि.१४.१२.०९ च्या पत्रान्वये संबंधीत कार्यालयाकडे पुढील आवश्यक कारवाईकरीता हस्तांतरित केले. याबाबत अपीलकारास अवगत करुन माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता त्या कार्यालयाकडे संपर्क साधण्याबाबत कळविले. नगर भूमापन घाटकोपर येथील न.भू.क्र.२२५ या मिळकतीची नकाशाची प्रत रु.५५/- इतके शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावी असे नगर भूमापन अधिकारी, घाटकोपर यांनी दि.१७.१२.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून अपीलकारास माहिती पुरविण्याचे प्रलंबित दिसते. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराचा माहितीच्या अधिकारातील अर्ज सर्व संबंधीत प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याची कारवाई नियमानुसार केली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:६.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७४१/०२**

**श्री.मुहम्मद इब्राहिम शौकत अली खान,**
**हॉटेल पाकिजा आणि पाकिजा पान बिडी शॉप,**
**इंदिरा नगर,वाशी नाका,आर.सी.मार्ग,**
**चेंबूर, मुंबई-४०००७४. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप-आयुक्त,**
**उप-आयुक्त(परि.५)यांचे कार्यालय,**
**तिसरा मजला, नटराज सिनेमा जवळ, शरदभाऊ आचार्य मार्ग,**
**चेंबूर, मुंबई-४०००७०.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,**
**उप-आयुक्त(परि.५)यांचे कार्यालय,**
**तिसरा मजला, नटराज सिनेमा जवळ, शरदभाऊ आचार्य मार्ग,**
**चेंबूर, मुंबई-४०००७०. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. मुहम्मद इब्राहीम शौकत अलीखान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि८.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३.१०.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केल्यानुसार माहिती मागीतली होती.

एम पूर्व वार्ड कडून फाईल क्र.ए सी/एम ई/३४४८४/ए ई(बी अँड एफ) दिनांक २४.४.२००६ ही फाईल उप आयुक्त(परिमंडळ ५ यांना पाठवली आणि ही फाईल त्यांनी उप आयुक्त(परिमंडळ २) ला दिनांक १७.५.२००६ आणि १८.५.२००६ पाठवली. त्याची प्राप्त झालेली पावती देणेबाबत आणि ती फाईल कुठल्या डिपार्टमेंटला गेली.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१६.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल कले. प्रथमअपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२६.११.०९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ३.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्जकरुन एम(पूर्व) विभागाकडून फाईल क्र.एसी/एमई/३४४८४/ए.ई(बी आणि एफ) दि.२४.४.२००६ कोणत्या विभागाकडून आलेली आहे त्याची प्राप्त झालेली पावती, त्याचा काय निर्णय घेण्यात आला इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. या फाईलमध्ये अपीलकाराची २ दुकानाची पात्रता सिध्द केलेली सर्व कागदपत्र होती. तसेच अनेक अधिका-याचे अभिप्राय होते. त्यामुळे हयाबाबत अपीलकार एम/पूर्व विभागाकडे पाठपुरावा करत आहेत. या परिस्थितीत सदर प्रकरणी उप आयुक्त(परिमंडळ ५) महानगरपालिका श्री.मिलीद द.सावंत यांनी विल्हेवारी लावावी(sortout) अशा सूचना देण्यात येत आहेत. सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः७.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७४०/०२**

**श्री. मेहमूद मेहबूब शेख,**
**रुम नं.७,दोस्त महमद चाळ,**
**नित्यानंद नगर,घाटकोपर(प.),**
**मुंबई-४०००८६. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सहाय्यक आयुक्त,के/पश्चिम यांचे कार्यालय,**
**के/पश्चिम विभाग इमारत,२रा मजला,**
**पालिराम पथ, बेस्ट डेपोच्या समोर, एस.व्ही.रोड,**
**अंधेरी(प.), मुंबई-४०००५८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण),**
**सहाय्यक आयुक्त,के/पश्चिम यांचे कार्यालय,**
**के/पश्चिम विभाग इमारत,२रा मजला,**
**पालिराम पथ, बेस्ट डेपोच्या समोर, एस.व्ही.रोड,**
**अंधेरी(प.), मुंबई-४०००५८. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. मेहमुद मेहबुब शेख यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.६.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.११.२००९ रोजी अर्ज करुन के/पश्चिम विभागात दि.१.४.२००८ ते ३१.७.२००९ या कालावधीतील एकूण वर्क ऑर्डरची संख्या, महिनावारप्रमाणे नगरसेवकाच्या नावांसहीत किती निधीची रक्कम वापरली त्याचा तपशील, वर्क ऑर्डरचे नाव/नंबर/रक्कम व कामाच्या पत्त्याची यादी, सन २००९-२०१० या चालू वर्षातील विभागाची अर्थसंकल्पीय तरतूद इत्यादी माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयांमध्ये उपलब्ध आहे. छायांकित प्रतींचे प्रती प्रत रु.२ प्रमाणे शुल्क भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१७.११.२००९ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांनी मुद्दा क्रमांकानुसार उत्तर दिले नसल्याच्या कारणावरुन दि.९.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास १५ दिवसात छायांकित प्रती देण्यात याव्यात असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी जन

माहिती अधिका-यांना दि.१४.१.२०१० रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ३.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन के/पश्चिम विभागातील एकूण वर्क ऑर्डरची संख्या, नगरसेवकाच्या नावासह किती निधी वापरला इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. उत्तरवादीने अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली असल्याचे द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली आहे. अपीलकार द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:७.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७६४/०२**

**श्री. रामलाल शामलाल पाल,**
**आर ३१, मारी अम्मा नगर,**
**ए.बी. रोड, वरळी,**
**मुंबई-४०००१८.** .... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, अभियांत्रिकी कक्ष,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व),मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, अभियांत्रिकी कक्ष,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व),मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. रामलाल पाल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.९.२००९ रोजी अर्ज करुन मरी अम्मा नगर, आर-३१,ए.बी. रोड, वरळी येथे झोपडपट्टी पुनर्वसन योजना चालू आहे. त्यामधील डी.पी.रोडची माहिती, सर्व्हे प्लॅनची माहिती, डी.पी.रोडमुळे बाधीत झालेल्या झोपडी धारकांची यादी इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने दि.२०.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास १५ दिवसात माहिती पुरवावी अशा प्रथम अपीलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना सूचना दिल्या. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीताअपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते . सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मरी अम्मा नगर, ए.बी.रोड,वरळी येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत असल्याने तेथील डी.पी.रोड व इतर बाधीत झोपडी धारकाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत किती झोपडीधारक बाधीत झाले आहेत अशा बाधीत झोपडीधारकांची यादी काढून ती अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:७.५.२०१०** | **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७६२/०२**

**श्री. रविंद्र लाला जगताप,**
**५९/३०, बी.डी.डी.चाळ,**
**वरळी, मुंबई-४०० ०१८.** .... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कल्याण आयुक्त,**
**कामगार कल्याण मंडळ, एस.बी. मार्ग,**
**एलफिस्टन, मुंबई५ ४०००१३.**

**जन माहिती अधिकारी तथा उप कल्याण आयुक्त,**
**कामगार कल्याण मंडळ, एस.बी. मार्ग,**
**एलफिस्टन, मुंबई५ ४०००१३.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. रविंद्र लाला जगताप यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.१०.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)श्री.मोहन धोत्रे, कल्याण आयुक्त पदावर कोणत्या साली व कोणत्या तारखेस रुजू झाले?

२)श्री.मोहन धोत्रे यांची शैक्षणिक पात्रता काय? व ते कोणत्या शाखेचे पदवीधर आहेत. असल्यास शैक्षणिक पात्रता दाखवणारे पत्रांची झेरॉक्स प्रत देण्यात यावी.

३) कल्याण आयुक्त धोत्रे हे शासकीय नोकरीत असतांना त्यांनी शासनास/कामगार मंडळास सादर केलेली स्थावर मालमत्ताा त्याचे विवरणपत्राची झेरॉक्स देण्यात यावी.

४)कल्याण आयुक्त श्री.मोहन धोत्रे यांनी सेवेत असतांना स्थावर मालमत्ता खरेदी घेतेवेळेस वेळोवेळी शासनाची परवानगी घेतली होती का? असल्यास त्याची झेरॉक्स प्रत देण्यात यावी.

५)कामगार कल्याण आयुक्तांची शैक्षणिक पात्रता काय असावी याबाबत महाराष्ट्र शासनाने काही निकष काढले आहेत का?

६) कल्याण आयुक्त मोहन धोत्रे यांना मासिक वेतन, प्रवासी भत्ता, कार्यक्रम भत्ता प्रत्येक महिन्याला किती व कोणत्या स्वरुपात दिला जातो? असल्यास त्याची झेरॉस प्रत देण्यात यावी तसेच लाईट बील, टेलिफोन बिल, पॅन कार्ड या सर्वांच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात

७)कामगार कल्याण आयुक्त श्री.मोहन धोत्रे शासकीय निवासस्थानात राहतात काय? मोहन धोत्रे सध्या राहात असलेल्या निवासस्थानात कामगार मंडळाचे सफाई कर्मचारी, घरेलू कामगार नेमले आहेत काय? असल्याचे त्यांचे नाव व पत्ता, मासिक वेतन याची साक्षांकित प्रत देण्यात यावी.

८) कल्याण आयुक्त श्री.मोहन धोत्रे त्यांच्या आजपर्यंतच्या कारकिर्दीमध्ये किती वेळा निलंबीत झाले आहेत? निलंबनाच्या तारखा व कारणे कळविण्यात यावीत.

९) आयुक्त श्री.मोहन धोत्रे यांना किती वेळा सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले त्यांच्या तारखा व कारणे कळविण्यात यावीत.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.८.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन श्री.मोहन धोत्रे, कल्याण आयुक्त पदावर कोणत्या साली व कोणत्या तारखेपासून रुजू झाले इत्यादी एकूण ९ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराचा माहितीच्या अधिकारातील अर्ज उत्तरवादीस प्राप्त झाला नसल्याने अपीलकारास विहित वेळेत माहिती पुरविता आली नसल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले.अपीलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयात तयार असल्याचेही उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास नि:शुल्करित्या माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:७.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७३४/०२**

**श्री. अशोक हिराजी छेडा,**
**अशोक स्टोअर्स, शॉप नं.१०(O.S.),**
**बी.आर.गावडे मार्केट, वरळी नाका,**
**मुंबई-४०००१८. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त(बाजार),**
**सहाय्यक आयुक्त बाजार यांचे कार्यालय,**
**१ला मजला, एम.जे. फुले मार्केट,**
**डॉ.डी.एन.रोड, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(बाजार),**
**सहाय्यक आयुक्त बाजार यांचे कार्यालय,**
**१ला मजला, एम.जे. फुले मार्केट,**
**डॉ.डी.एन.रोड, मुंबई-४०० ००१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अशोक हिराजी छेडा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.८.९.२००९ रोजी अर्ज करुन बी.आर.गावडे मार्केट, वरळी नाका, मुंबईच्या पुनर्विकासाबाबत नवीन धोरण इत्यादीबाबत एकूण १३ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. माहितीपोटी रु.२४८/- इतके शुल्क भरल्यानंतर माहिती पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी दि.९.१०.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी पाठविलेले पत्र उशिराने मिळाले. माहिती मिळाली नाही यामुळे अपीलकाराने दि.२३.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास निःशुल्करित्या माहिती पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१९.१२.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी दि.२४.१२.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ३.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन बी.आर.गावडे मार्केट,वरळी नाका, मुंबईच्या पुनर्विकासाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. बी.आर.गावडे महापालिका मंडई,वरळी विकसीत करण्यासाठी दिलेल्या मार्गदर्शक तत्वांची तसेच अनुज्ञापत्रधारकांची यादी तसेच त्यांनी पुनर्विकासासाठी दिलेल्या अनुमती पत्राची यादी, संमती पत्र रद्द/मागे घेण्याबाबतची अनुज्ञापत्रधारकांची यादी,टेक्नीकल स्क्रुटीनी कमिटीमध्ये झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांताची प्रत,डी.एल.टू एम.एस. ची प्रत व आय.सी.आर.सी.आर.च्या प्रती अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.२४.१२.२००९ च्या पत्रान्वये पुरविल्या असल्याचे आयोगासमोर प्रतिपादन केले. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः७.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७३६/०२**

**श्री. अशोक ना.तांबे,**
**द्वारा बेस्ट कामगार संघटना,**
**भक्तावर बिल्डिंग, अंधेरी(प.),**
**मुंबई-४०००५८.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**उपनिबंधक सहकारी संस्था,ए विभाग,मुंबई,**
**मल्होत्रा हाऊस, ६वा मजला, फोर्ट,**
**मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**उपनिबंधक सहकारी संस्था,ए विभाग,मुंबई,**
**मल्होत्रा हाऊस, ६वा मजला, फोर्ट,**
**मुंबई-४०० ००१.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. अशोक तांबे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३१.७.२००९ रोजी अर्ज करुन दि बेस्ट एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडीट सोसायटी लिमिटेड या पगारदार संस्थेबाबत एकूण ११ मुद्यांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागीतलेली माहिती संस्था स्तरावर असल्याने संस्थेशी संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी, तशा संस्थेला सूचना देण्यात येत आहेत असे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,ए विभाग,मुंबई यांनी दि.१३.८.०९च्या पत्रान्वये कळविले. माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२२.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास माहिती देणेबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.५.११.०९ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने, माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ३.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन दि बेस्ट एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडीट सोसायटी लि.बाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराच्या अर्जातील मुद्दा क्र.३, १० व ११ ची माहिती अपीलकारास देणेबाबत जन माहिती अधिका-यांना प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश दिले होते. त्यानुसार मुद्दा क्र.३ बंधपत्राची छायांकित प्रत, मुद्दा क्र.१० - सन २००६ ते २००९ पर्यंतच्या वैधानिक लेखापरिक्षणाची छायांकित प्रत व मुद्दा क्र.११ वार्षिक सर्वसाधारण सभा पुढे ढकलण्याबाबत(मुदतवाढ) ची छायांकित प्रत दि.२९.१२.०९ रोजी भारतीय रिझर्व बँकेत चलन/शुल्क भरुन अपीलकाराचेवतीने श्री.शंकर थोरात यांनी कार्यालयातून प्राप्त करुन घेतली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. अपीलकाराच्यावतीने श्री.थोरात यांनी माहिती प्राप्त केली असल्याची बाब अपीलकाराने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी नाकारली. श्री.शाम शिंदे व श्री.शंकर थोरात या अपीलकाराच्या सहकार्यांनी मिळून दि.४.३.२०१० रोजी अहवालाच्या छायांकित प्रती घेतल्या आहेत. त्याची पोच कार्यालयाच्या धारिकेवर उपलब्ध असल्याचे जन माहिती अधिका-यांनी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:६.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७७३/०२**

**श्री. प्रविण दत्तात्रेय तळेकर,**
**साफल्य बिल्डिंग, ब्लॉक नं.१,**
**पांडुरंगवाडी मार्ग क्र.२,गोरेगाव(पूर्व),**
**मुंबई-४०००६३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त(प्रशासन),**
**आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत,**
**अब्दुल गफारखान मार्ग, वरळी, मुंबई-४०००१८.**

**जन माहिती अधिकारी तथा नियंत्रक,**
**गुरे नियंत्रण यांचे कार्यालय,**
**गुरांचा बाजार, गोरेगाव(पूर्व),**
**मुंबई-४०००६३.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. प्रविण दत्तात्रय तळेकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.८.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

गुरांच्या बाजाराच्या उत्तरेकडील दरवाज्यासमोर बसणा-या फेरीवाल्यासंदर्भात त्याचबरोबर दुचाकी वाहने बेकायदेशीररित्या उभ्या करण्यात येत असलेल्या वाहनांसंदर्भात मुंबई महानगरपालिकेकडे व वाहतुक नियंत्रण शाखा मुंबई पोलीस यांच्याकडे आजपर्यंत किती लेखी तक्रारी करण्यात आल्या आहेत त्यांच्या प्रती देण्यात याव्यात. आणि जर लेखी तक्रारी केल्या नसतील तर संयुक्तिक कारणे देण्यात यावीत.

आपल्या अधिपत्याखाली असलेल्या रेल्वे स्थानकाजवळ जाणा-या छोटया रस्त्यावर बसणा-या फेरीवाल्यांना तेथून बाहेर काढण्यासाठी आपण संबंधित पोलीस ठाण्याला त्याचबरोबर आपल्या म्हणजेच दुग्धव्यवसाय खात्या अंतर्गत असलेल्या मुख्य दक्षता व सुरक्षा अधिका-यांना किती पत्रे लिहिलीत त्यांच्या छायांकित प्रती देण्यात याव्यात व पत्र लिहिले नसेल तर संयुक्तिक कारणे देण्यात यावीत.

उत्तरेकडच्या दिशेने येणा-या पादचा-याच्या मार्गात लोखंडी छोटे बार लावण्यात आले आहेत ते कोणाच्या आदेशावरुन लावण्यात आले आहेत त्याबद्दलची आदेशाची प्रत देण्यात यावी. आणि सदरहु लोखंडी बार बेकायदेशीररीत्या अन्यत्र कोणी लावले असतील तर त्याबाबत कोणती कारवाई केली

त्याची माहिती देण्यात यावी. त्याचबरोबर जाण्या-येण्याच्या मार्गावर अडथळा ठरलेल्या झाडाच्या फांद्या छाटण्याबाबत कोणती लेखी कारवाई केली त्याच्या छायांकित प्रती देण्यात याव्यात.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१५.९.०९ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे माहिती पुरविली.

गुरांच्या बाजाराच्या उत्तरेकडील दरवाजे समोर बसणा-या फेरीवाल्यांबाबत व उभ्या असलेल्या दुचाकी वाहनांसंदर्भात आपण मागितलेली माहिती सत्य नसून उभी असलेली वाहने ही बाजारात गुरांची खरेदी विक्री करणा-या व्यापा-यांची असतात.

तसेच बाजाराच्या पश्चिमेस असलेल्या रेल्वे स्थानकाकडे जाणा-या पादचारी मार्गालगत फेरीवाले बसतात हे दिसून येत नाही. तसेच पायवाटेच्या मार्गावर दोन्ही बाजूला लोखंडी छोटे बार लावण्यात आले आहेत त्याचे कारण पादचारी वाटेवरुन दुचाकी वाहने इकडून तिकडे जाऊ नये व येणा-या जाणा-या लोकांना त्याचा त्रास होऊ नये म्हणून पादचारी मार्गाच्या दोन्ही बाजूला लहान लोखंडी बार लावण्यात आले आहेत.

तसेच पायवाटेच्या मार्गलगत असलेल्या झाडांच्या वाढलेल्या छोटया फांद्या वेळोवेळी या कार्यालयातील कर्मचारी छाटत असल्याने येणा-या जाणा-या लोकांना झाडांच्या फांद्यांचा त्रास होत नाही असे वाटते हे आपल्या माहितीसाठी.

संपूर्ण माहिती मिळाली नाही, दिलेली माहिती खोटी असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२६.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२.१.२०१० रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील निकालात काढले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अपीलकाराने गुरांच्या बाजारासंदर्भात केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती. अपीलकाराने केलेल्या तक्रारीसंबंधी पोलीस विभाग/बृहन्मुंबई महानगरपालिका यांना पत्र लिहून आवश्यक ती कारवाई करण्याबाबत कळविले असल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी पोलीस/बृहन्मुंबई महानगरपालिका यांना लिहिलेलया पत्राच्या प्रती अपीलकारास निःशुल्करित्या पुरवाव्यात. अपीलकाराच्या तक्रारीनुसार केलेल्या कारवाईची माहिती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक:७.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७३९/०२**

**श्री. दत्ताराम कृष्णा पेडामकर,**
**मरीअम्मा नगर,रुम नं.एम-२२३,**
**नेहरु सेंटर मागे, डॉ.ए.बी.रोड,**
**वरळी, मुंबई-४०००१८. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. दत्ताराम कृष्णा पेडामकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन झोपडपट्टी धारकांबाबत निर्गमित केलेले १९९७ ते अद्यापपर्यंतची मार्गदर्शिका पुस्तक मिळण्याची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास खालीलप्रमाणे माहिती पुरविली.

मार्गदर्शिका समाविष्ट परिपत्रके ज्या भाषेत (मराठी/इंग्रजी) निर्गमित झाली त्या भाषेतील असल्याने इंग्रजी भाषेतील परिपत्रके मराठीमध्ये उपलब्ध नसल्याने ती पुरविता येत नाहीत. या मार्गदर्शिकेत समाविष्ट असलेले विकास नियंत्रण नियमावली ३३(१०) इंग्रजीमध्ये आहेत. हे नियम मराठीमध्ये उपलबध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. ते उपलब्ध होताच मार्गदर्शिकेत समाविष्ट करुन विक्रीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१०.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. मराठी भाषेमध्ये मार्गदर्शिका उपलबध झाल्यावर अपीलकार यांनी अर्ज केल्यास त्यांना प्रत उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी असे

दि.६.१.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. मागीतलेली माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ३.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मार्गदर्शक पुस्तकाची मागणी केली होती. मार्गदर्शिकेत समाविष्ट असलेले विकास नियंत्रण नियमावली ३३(१०) इंग्रजीमध्ये आहेत. हे नियम मराठीमध्ये उपलब्ध करण्याची कार्यवाही सुरु आहे. ते उपलब्ध होताच मार्गदर्शिकेत समाविष्ट करुन विक्रीसाठी उपलब्ध करण्यात येतील असे अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.२४.११.०९च्या पत्रान्वये कळविले आहे. यावरुन सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः७.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७६०/०२**

**श्री. प्रदीप अच्युत जोशी,**
**ब/५, दुर्वांकूर, भूखंड क्र.आर.एक्स.३१/३२,**
**म.औ.वि.मं., डोंबिवली(पूर्व),**
**पिन-४२१ २०३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी,**
**मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत,९वा मजला,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार बोरीवली यांचे कार्यालय,**
**डॉ.न.रा.करोडे मार्ग, नाटकवाला लेन,**
**बोरीवली(प.), मुंबई-४०००९२.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. प्रदीप अच्युत जोशी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१.८.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)मौजे चिंचोली,ता.बोरीवली,मुंबई उपनगर जिल्हा येथील सर्व्हे नं.४७ हिस्सा नं.२(पै)(भूखंड क्र.१६४ अप्पर गोविं नगर) क्षेत्र ४१८.०६ चौ.मीटर(सुमारे ५०० चौ.वार) हया मिळकतीच्या कबजेदार सदरी सन २००४ ते २००९ हया कालावधीमध्ये असलेली नावे याची माहिती अर्जदार यांना पुरविण्यात यावी.

२)सदर मिळकतीवर निवासी प्रयोजनार्थ बांधकाम केले गेले असल्यास त्याची माहिती अर्जदार यांना पुरविण्यात यावी.

३)सदर मिळकतीचा वापर सन २००० ते २००९ या कालावधीमध्ये शेती प्रयोजनार्थ होत आहे अथवा बिनशेती प्रयोजनार्थ होत आहे याची माहिती अर्जदार यांना पुरविण्यात यावी.

४)सदर मिळकत बिनशेतीकडे वर्ग झाली असल्यास त्याची माहिती अर्जदार यांना पुरविण्यात यावी.

५)सदर मिळकत बिन शेतीकडे वर्ग झाली नसल्यास त्याच्या आधारे मिळकत मालक हे शेतकरी ठरत असतील तर त्याची माहिती अर्जदार यांना पुरविण्यात यावी.

अपीलकाराने अर्जात मागणी केलेले श्री.दौलत अमृतलाल शहा यांचे नाव ७/१२,सर्व्हे क्र.४७ हि.क्र.२ मध्ये रेकॉर्ड तपासला असता नोंद आढळून येत नाही. तरी मागणी केलेली माहिती ही निरंक आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२१.१०.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.३०.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास आवश्यक ती माहिती जन माहिती अधिका-यांनी पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२.१२.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील  दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते,अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मौजे चिंचोली, तालुका बोरीवली, मुंबई उपनगर जिल्हा येथील सर्व्हे क्र.४७, हिस्सा क्र.२(पै)(भूखंड क्र.१६४ अप्पर गोविंद नगर) क्षेत्र ४१८.०६ चौ.मिटर या मिळकतीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्याबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित कले होते. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास निःशुल्करित्या माहिती पुरवावी.

## <u>आदेश</u>

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:७.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७७२/०२**

**श्री. निगळे गोनसालवीस,**
**५,सोराब हाऊस,खंबाटा लेन,**
**भायखळा(पूर्व), मुंबई-४०००२७. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता(दक्षिण),**
**एम.बी.आर.अँड आर. बोर्ड,**
**सोनावाला बिल्डिंग, शिंदेवाडी,**
**दादर(पूर्व), मुंबई-४०००१४.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**एम.बी.आर.अँड आर. बोर्ड, ई डिव्हीजन,**
**बिल्डिंग नं.३४,तळ मजला, अभ्युदय नगर,**
**काळाचौकी, मुंबई-४०००३३. ..... उत्तरवादी**

## विवेचन

अपीलकार श्री. निगळे गोनसालवीस यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.८.२००९ रोजी अर्ज करुन खंबाटालेन, भायखळा(पूर्व), मुंबई-४०००२७ येथील ई विभागातील इमारत क्र.२ सी, सोनल हाऊसची दुरुस्ती ललित खंडेलवाल या कॉंट्रॅक्टर कडून करण्यात आली याबाबत एकूण ९ मुद्यांबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२४.९.०९ च्या पत्रान्वये माहिती दिली.यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२३.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली असल्याने अपीलकाराचे प्रथम अपील स्विकारण्यात येत नाही असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२७.१०.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते,अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन ई विभागातील इमारत क्र.२ सीच्या दुरुस्तीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी मा.मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अपील क्र.५५३८/०२ मध्ये दि.१९.३.२०१० रोजी आदेश पारित केले आहेत. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली आहे या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः७.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७७१/०२**

**श्रीमती रेणू कचोलीया,**
**६२,उशा बिल्डिंग, १६१,**
**एच-४,एस.व्ही.रोड,**
**विले पार्ले(प.), मुंबई-४०००५६. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा असिस्टंट कमिशनर,**
**असिस्टंट म्युनिसिपल कमिशनर यांचे कार्यालय,**
**के वार्ड(प.), २रा मजला, पालीराम पथ,**
**अंधेरी(प.),मुंबई-४०००५८.**

**जन माहिती अधिकारी तथा सिनिअर इन्सपेक्टर लायसेन्स,**
**असिस्टंट म्युनिसिपल कमिशनर यांचे कार्यालय,**
**के वार्ड(प.), २रा मजला, पालीराम पथ,**
**अंधेरी(प.),मुंबई-४०००५८. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती रेणू कचोलीया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन जाहिरात फलकांच्या विशेष मंजूरीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली. जन माहिती अधिका-यांनी माहिती अपूर्ण, खोटी पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते,अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन जाहिरात फलकाच्या विशेष मंजूरीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी

आयोगासमोर प्रतिपादन केले.सदर सुनावणीकरीता अपीलकार हजर नव्हते. याच विषयावर मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.३०.३.२०१० रोजी आदेश पारित केले असल्याची बाब उत्तरवादीने आयोगाच्या निदर्शनास आणून दिली. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:७.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७६९/०२**

**श्री. धनाजी रामचंद्र मोरे,**
**संक्रमण शिबिर क्र.१,साईवाडी,**
**ना.सि.फडके रोड, रुम नं.७,**
**अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००६९.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कमांडंट,**
**होम गार्ड, जुने सेक्रेटरीएट ॲनेक्स बिल्डिंग,**
**फोर्ट, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**होम गार्ड, जुने सेक्रेटरीएट ॲनेक्स बिल्डिंग,**
**फोर्ट, मुंबई-४०००३२.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. धनाजी रामचंद्र मोरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१३.११.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

श्री.सत्यविजय परब यांचे एस.एस.सी. सर्टिफिकेट, एस.एस.सी.मार्कशीट, एच.एस.सी. मार्कशीट,एच.एस.सी. शाळा सोडल्याचा दाखला, बेसीक कँप सर्टिफिकेट,एन.सी.ओ. कँप सर्टिफिकेट, कंपनी कमांडर सर्टिफिकेट,असिस्टंट इन्फरमेशन ऑफीसर ची सी.जी. आदेश एन्क्वायरी रिपोर्ट.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२१.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते,अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन श्री.सत्यविजय परब यांच्या शैक्षणिक पात्रतेच्या प्रती व इतर अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१०.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/७७२/०२**

**श्री. नारायण मनहरलाल रावल,**
**६९, ओमकार इमारत,**
**आनंद नगर, सांताक्रुझ(पूर्व),**
**मुंबई-४०००५५. ..... तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-२,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ मुंबई यांचे कार्यालय,**
**म्हाडा इमारत, मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. नारायण मनहरलाल रावल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि. २२.१.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी तक्रारदार/गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.६.४.०९ रोजी अर्ज करुन सदनिका क्र.६९, ओमकार बिल्डिंग,आनंद नगर, सांताक्रुझ(पूर्व), मुंबई या सदनिकेच्या हस्तांतरणाबाबत कोणाची लेखी तक्रार असल्यास त्याची सविस्तर माहिती द्यावी अशी मागणी केली होती. गैरतक्रारदाराने सदर प्रकरणी तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अनुसार राज्य माहिती आयोगाकडे क्र.२००९/३५९०/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.४.११.०९ रोजी आदेश पारित केले आहेत.

श्री.मनहरलाल विश्वनाथ रावल यांचे नावे असलेला गाळा क्र.२/६९ आनंदनगर, सांताक्रुझ ा(पूर्व) हा गाळा श्री.नारायण मनहरलाल रावल यांचे नावे दि.४.५.२०१० पासून हस्तांतरित करण्यात आला असल्याची संबंधीत कागदपत्र गैरतक्रारदाराने आयोगासमक्ष तक्रारदारास हस्तांतरित केली.

यावरुन सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१०.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/५८४/०२**

**श्री. नारायण लक्ष्मण बोरले,**
**९/६०७, मालवणी श्री.साई को.ऑप.हौ.सो.लि.,**
**छ.शिवाजी राजे स्कूल एकता नगर,**
**चारकोप लिंक रोड, कांदिवली(प.),**
**मुंबई-४०००६७. ..... तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१,**
**सहकारी संस्था,सहकारी कक्ष,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**म्हाडा,वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. नारायण लक्ष्मण बोरले यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि. ८.१.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी तक्रारदार/गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२०.२.०९ रोजी अर्ज करुन मालवणी श्रीसाई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,बिल्डिंग क्र.९, छत्रपती शिवाजी राजे संकूल, चारकोप लिंक रोड, कांदीवली(प.),मुंबई-६७ या संस्थेच्या गैरकारभार व भ्रष्टाचाराबाबत १४ सभासदांनी दि.११.६.०८ रोजी सादर केलेल्या तक्रारीवरील केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.२००९/३००५/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. तक्रारदारास सदर प्रकरणी १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.१०.८.०९ रोजी आदेश पारित केले होते.

तक्रारदाराने वारंवार कार्यालयात खेपा मारुन आणि दूरध्वनीवरुन बोलूनही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराने दि.११.६.२००८ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९(अे)खालील जा.क्र.उपनि/स.सं./ मुं.म./ निरिक्षण/ १३३८/२००८ दि.३.१२.२००८ अन्वये तत्कालीन सहकारी अधिकारी श्री.बी.के.हांडे यांची तपासणी अधिकारी म्हणून नेमणूक केली होती. तत्कालीन अधिका-याने तपासणीचे आदेश निर्गमित करुनही संस्थेचे दप्तर न मिळाल्याने, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८०(१(२)अन्वये पोलीसामार्फत दप्तर घेण्यात येईल, असे दि.१३.४.०९ च्या पत्रान्वये कळविल्यानंतर सस्थेने दि.१३.५.०९ रोजी तत्कालीन सहकारी अधिकारी यांनी संस्थेच्या दप्तराची तपासणी घेण्यात आली. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे असे गैरतक्रारदाराने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. तसेच तक्रारदारास दि.२५.८.०९ च्या पत्रानुसार सदर प्रकरणी मुद्देनिहाय माहिती कळविली असल्याचेही पत्राची प्रत सादर करुन प्रतिपादन केले. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९(अे) च्या नोटीसीनुसार सदर प्रकरणी कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर यथावकाश निष्कर्षाबाबतची माहिती गैरतक्रारदाराने तक्रारदारास कळवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१०.५.२०१०** | **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४४४१/०२**

**श्री. निशांत सुभाष घाडगे,**
**२१, गोकूळ, डॉ.पेडणेकर इमारत,**
**स.मं.मार्ग, कुर्ला(प.),**
**मुंबई-४०००७०. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**कार्यकारी अभियंता एस.विभाग यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एल.बी.एस. मार्ग,**
**भांडूप(प.), मुंबई-४०००७८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ. व का.),**
**कार्यकारी अभियंता एस.विभाग यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एल.बी.एस. मार्ग,**
**भांडूप(प.), मुंबई-४०००७८. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. निशांत सुभाष घाडगे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.५.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.३.२००९ रोजी अर्ज करुन पवई एस.व्ही.रोड वरील एल अँड टी कंपनीच्या गेट क्र.१ व ० च्या शेजारील असणा-या विविध हॉटेल, रेस्टॉरंट, चायनीज उपहारगृहे, बॅटरी रिपेअरींग वर्कस, पानपट्टया व इतर गटारावरील बांधकामाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी मागीतलेली माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२३.४.०९ रोजी प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २३.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच उपस्थित होते. सुनावणीच्या

वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अनधीकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. पवई एस.व्ही.रोड वरील एल अँड टी कंपनीच्या गेट क्र.१ व ० च्या शेजारील असणा-या विविध हॉटेल, रेस्टॉरंट, चायनीज उपहारगृहे इत्यादी बांधकामे जूनी व गटारावर नसून गटाराच्या बाजूला आहेत अशी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२२.४.२०१० च्या पत्रान्वये माहिती पुरविली आहे. यावरुन सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याने सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३०.४.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७३३/०२**

**श्री. लक्ष्मण रंगनाथ भदे,**
**प्लॉट नं.३०६, यशवंत नगर बसस्टॉप जवळ,**
**यशवंतनगर,ता.मिरज, जि.सांगली. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव(आस्था),**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(आस्था),**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. लक्ष्मण रंगनाथ भदे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.४.१०.२००८ रोजी अर्ज करुन अपीलकारास विशेष बाब म्हणून कनिष्ठ लिपिक पदी घेणेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी मागीतलेली माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने दि.१७.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.१८.१२.०९ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १०.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन कनिष्ठ लिपिक पदावर घेणेबाबत केलेल्या विनंतीसंबंधी केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी विनंती अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकारास पुरविणे आवश्यक आहे. तरी या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त

झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास त्यांच्या कनिष्ठ लिपिक पदावर घेण्याच्या विनंती अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१२.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८०९/०२**

**श्री. निपुण मठकर,**
**बी-५, जीवदाणी कृपा चाळ,**
**रामचंद्र जाधव वाडी, विजय नगर,**
**नालासोपारा(पूर्व), ठाणे-४०१२०८.** .... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अवर सचिव**
**गृहनिर्माण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**गृहनिर्माण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. निपुण मठकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.निरंक रोजी अर्ज करुन महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय गवसू १२२०/प्र.क्र.२०४(१)झोपुसु-१ दि.११ जुलै,२००१ अनुसार १ जानेवारी,१९९५ पर्यंत अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीतील किती झोपडीधारकांना ओळखपत्र(फोटोपास) देण्यात आले याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. संपूर्ण माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२७.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. ओळखपत्राच्या वाटपाबाबतच्या अहवालाची नस्ती अपीलकारास निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी व त्यामधील आवश्यक असणा-या कागदपत्राच्या छायांकित प्रती विहित शुल्क आकारुन अपीलकारास माहिती देण्यात यावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.४.२.२०१० रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ७.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उ पस्थित नव्हते.सुनावणीच्या वेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन शासन निर्णयानुसार झोपडपट्टी धारकांना वाटप केलेल्या ओळखपत्राबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. संबंधीत अहवालाच्या नस्तीचे निरिक्षणाकरीता अपीलकार श्री.निपूण मठकर हे दि.२९.१.२०१० रोजी कार्यालयात उपस्थित होते. त्यांना विविध महानगरपालिका/ नगरपालिका यांच्याकडून प्राप्त झालेल्या ओळखपत्र वाटपाच्या अहवालाची नस्ती निरिक्षणाकरीता उपलब्ध करुन देण्यात आली. सदर नस्तीमधील १८ प्रती देण्याबाबत श्री.मठकर अपीलकार यांनी विनंती केली. त्याकरीता रु.३६/- इतके शुल्क श्री.मठकर यांनी भरले व त्यानंतर त्यांना सदर माहिती देण्यात आली असा जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरी ल सुनावणीचेवेळी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१२.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/२२२१/०२**

**श्री. सुरेश दशरथ मगरे,**
**न्यु गौतम नगर,प्लॉट क्र.१,**
**सम्राट बुध्द विहार, देवराज लाईम डेपोच्या पाठीमागे,**
**गोवंडी,मुंबई-४०००४३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपनियंत्रक,**
**उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय, ई परिमंडळ,**
**चंचलस्मृती इमारत, १ला मजला,**
**ग.द.आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई-४०००३१.**

**जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी,**
**३३ई चेंबूर, शिधावाटप कार्यालय क्र.३३ई,**
**फाईन आर्ट गॅलरीच्या बाजूला, चेंबूर(पूर्व),**
**मुंबई-४०००७१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. सुरेश दशरथ मगरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.३.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.४.२००८ रोजी अर्ज करुन ३३ई, शिधावाटप कार्यालयाच्या अधिपत्याखालील दि.१.४.२००४ ते अद्यापपर्यंत शिधावाटप दुकानाबाबत एकूण १० मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपेक्षीत माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२१.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती अपीलकारास देण्यात यावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१०.१२.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ७.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उ पस्थित

नव्हते.सुनावणीच्या वेळी  उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन ३३ ई, शिधावाटप कार्यालयाच्या अधिपत्याखालील शिधावाटप दुकानाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराच्या अर्जातील मुद्दा क्र.१,२,३,५,६,७,८,९,१० ची माहिती अपीलकारास पुरविलेली आहे. मुद्दा क्र.४च्या माहितीसाठी अपीलकाराने प्रथम अपीलाच्या आदेशानुसार परिमंडळ कार्यालयास अर्ज केलेला नसल्याने सदर माहिती अर्जदारास दिलेली नाही. अर्जदारानी विहित नमुन्यामध्ये माहिती अधिकारी तथा सहाय्यक नियंत्रक,शिधावाटप,ई परिमंडळ वडाळा यांचेकडे अर्ज केल्यास शि.का.३३ई चे अधिनत्याखालील सद्यस्थिती मध्ये १३२ अधिकृत शिधावाटप दुकाने व ८ एन.पार्ट दुकाने आहेत. १४० दुकानांचे प्राधिकारपत्र धारकाचे नाव,फोटो,दुकानाचा पत्ता, दुकान सुरु झाल्याचा दिनांक ही माहिती प्राधिकारपत्र नोंदवहीमध्ये नोंदविलेली असून प्रत्येक दुकान निहाय २ पृष्ठे आहेत(१४० दुकाने X २ पृष्ठे = २८० पृष्ठे).सदर २८० पृष्ठे X प्रती प्रत रु.२ प्रमाणे रु.५६० एवढे शुल्क अर्जदाराने ई परिमंडळ वडाळा कार्यालयामध्ये भरल्यास अपीलकारास माहिती देणे शक्य होईल असा प्रथम अपीलीय अधिका-यांनी आयोगास द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी खुलासा सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अर्जातील मुद्दा क्र.४ व ५ बाबत संबंधीत कार्यालयाशी संपर्क साधून अपीलकाराने विहित शुल्क भरुन माहिती प्राप्त करावी. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित शुल्क भरल्यानंतर तात्काळ माहिती पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१२.५.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८१०/०२**

**श्री. सुधीर ओमप्रकाश बहल,**
**१४५, महात्मा गांधी रोड,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.** .... **अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग(सां.का.१),**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी,**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग(सां.का.१),**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** ....**उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. सुधिर ओमप्रकाश बहल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.११.२००९ रोजी अर्ज करुन पी.एल.देशपांडे महाराष्ट्र ॲकॅडमी, मुंबई येथील जागा महाराष्ट्र गॅझेटीयर विभागास कार्यालयाकरीता वाटप करण्यात आली त्यासंबंधीच्या फाईलच्या/कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी संपूर्ण माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.७.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १०.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन दर्शनिका विभागाचे पु.ल.देशपांडे कला अकादमी, मुंबई येथील स्थलांतर व त्या स्थलांतरास देण्यात आलेली स्थगिती याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकारास संपूर्ण धारिकेतील

कागदपत्राच्या प्रती दि.२४.२.२०१० च्या पत्रासोबत टपालाने पाठविण्यात आल्या असल्याचे प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१२.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८११/०२**

**श्री. पोळ अविनाश शिवाप्पा,**
**सेक्टर-८,रुम नं.८,**
**कोपरखैरने, नवी मुंबई. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी/अधिक्षीका,**
**कामा व ऑल्ब्लेस रुग्णालय,**
**मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,**
**कामा व ऑल्ब्लेस रुग्णालय,**
**मुंबई-४००००१. ....उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. पोळ अविनाश शिवाप्पा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३१.७.२००९ व २९.९.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

डॉ.सुनंदा रविंद्र कटके या आपल्या रुग्णालयात दि.२३.२.१९९५ पासून दि.५.७.२००१ या कालावधीत कार्यरत होत्या काय? असल्यास त्यांची सेवा स्थायी होती की अस्थायी? स्थायी असल्यास त्यांना वेतनवाढी देय होत्या काय? त्या त्यांना आपल्या आस्थापने अंतर्गत दिल्या गेल्या आहेत काय? दिल्या गेल्या असल्यास किती दिल्या गेल्या त्याची संपूर्ण माहिती साक्षांकित प्रतीत देण्यात यावी. दिल्या गेल्या नसल्यास त्याची काय कारणे आहेत? दिल्या गेल्या नसल्यास यास कोण अधिकारी/कर्मचारी जबाबदार आहे? त्यावर काय कारवाई करण्यात आलेली आहे त्याची इत्थंभूत माहिती मिळावी.

जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे दि.२९.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १०.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, डॉ.सुनंदा रविंद्र कटके यांचेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविलेली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:१२.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८१९/०२**

**श्री. निपूण मठकर,**
**बी-५, जिवदानी कृपा चाळ,**
**रामचंद्र जाधववाडी, विजयनगर,**
**नालासोपारा(पू.), ४०१२०८. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन,**
**बॅकबे रेक्लमेशन, विधानभवन मार्ग, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा समिती अधिकारी,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन,**
**बॅकबे रेक्लमेशन, विधानभवन मार्ग, मुंबई-४०००३२. ....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. निपूण मठकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.५.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.निरंक रोजी अर्ज करुन माािहतीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २५ अनुसार महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागीतली आहे. जन माहिती अधिका-यांनी दि.७.३.२००९च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले.प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.९.४.२००९ रोजी आदेश पारित केले. माहितीपोटी रु.३०/- शुल्क घेऊन संपूर्ण माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १०.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन उक्त अधिनियमातील कलम २५ अनुसार विधानमंडळ सचिवालयाने केलेल्या कारवाईची

माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास  उत्तरवादीने माहिती पुरविली असल्याचे अपीलातील कागदपत्रातून दिसून येते. तसेच जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे द्वितीय अपीलावरील  सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः१२.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८१७/०२**

**श्री. निपूण मठकर,**
**बी-५, जिवदानी कृपा चाळ,**
**रामचंद्र जाधववाडी, विजयनगर,**
**नालासोपारा(पू.), ४०१२०८. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. ....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. निपूण मठकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.७.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.२.२००९ रोजी अर्ज करुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २५ अनुसार नगर विकास विभागाने केलेल्या कार्यवाही संबंधीची अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १०.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन उक्त अधिनियमातील कलम २५ अनुसार नगर विकास विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. या प्रकरणी नगर विकास विभागाचे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री.आ.रा.राजपूत तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप सचिव श्री.सुरेश काकाणी यांनी आयोगासमोर असे प्रतिपादन केले की, अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविणे सोईचे व्हावे म्हणून सदर प्रकरणी प्रथम अपीलकाराबरोबर चर्चा करणे आवश्यक आहे. अपीलकारास नेमकी कोणती माहिती हवी आहे याबाबत निश्चित झाल्यानंतर माहिती पुरविणे सुकर होईल असे उ त्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने नगर विकास विभागातील संबंधीत जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांचेबरोबर सदर प्रकरणी प्रथम सविस्तरपणे चर्चा करावी. त्यानंतर त्यांना हव्या असलेल्या नेमक्या माहितीबाबत मागणी करावी. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीनुसार उपलब्ध माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:१२.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७८५/०२**

**श्री. हरिष चंदू बडेकर,**
**३०४/७, तेजोमय को.ऑप.हौ.सो.,**
**सेक्टर क्र.३, चारकोप,**
**कांदीवली(प.), मुंबई-४०००६७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी**
**बृहन्मुंबई यांचे कार्यालय,**
**नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, आर.सी.चेंबूरकर मार्ग,**
**चेंबूर(पू.), मुंबई-४०००७१.** **....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. हरिष बडेकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.९.२००९ रोजी अर्ज करुन भारत सरकारच्या शैक्षणिक फ्रिशिपबाबत व इतर शिष्यवृत्तीसंबंधी एकूण ९ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.७.१०.०९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ६.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन फ्रिशीप मंजूर करण्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराच्या मागणीप्रमाणे उत्तरवादीने माहिती पुरविलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन

माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलकारास नोंदणी पोच देय डाकेने माहिती पाठवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१२.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८२३/०२**

**श्री. हेमंत हरेश जाधव(अध्यक्ष),**
**समर्थ को.ऑप.हौ.सो.(नियोजित),**
**संजय गांधी नगर,ग्रुप नं.३,**
**विक्रोळी(पूर्व), मुंबई-८३. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**कार्यकारी अभियंता घाटकोपर विभाग,**
**मुंबई मंडळ,२रा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा डेप्युटी सी.डी.ओ.,**
**कार्यकारी अभियंता घाटकोपर विभाग,**
**मुंबई मंडळ,२रा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. ....उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. हेमंत हरेष जाधव यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.९.१२.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

न.भु.क्र.१४९, मौजे हरीयाली व्हिलेज, संजय गांधी नगर,ग्रुप नं.३, विक्रोळी(पूर्व), मुंबई या जागेवरील झोपडी धारकांना सन १९९० ते सन २००९ पर्यंत देण्यात आलेल्या फोटोपासची तसेच पावतीची ज्या रजिस्टरमध्ये नोंद करण्यात येते व दिल्याबाबत झोपडी धारकांची सही घेण्यात येते त्या रजिस्टरची छायांकित प्रत.

जन माहिती अधिका-यांनी संपूर्ण माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने दि.२१.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ११.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते,अपीलकार उपस्थित नव्हते .सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सन १९९० ते सन २००९ पर्यंत न.भु.क्र.१४९ मौजे हरियाली व्हिलेज येथील झोपडपट्टी धारकांना देण्यात आलेल्या फोटोपासबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता अपीलकार हजर नव्हते. उपलब्ध माहिती अपीलकारास पुरविण्यात आली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१२.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७७०/०२**

**श्री. अरुण गणपत भोवर,**
**ए/६०३, साई अशिष,**
**जनकल्याण बँकेशेजारी, स्टेशन रोड,**
**विक्रोळी(पू.), मुंबई-४०००८३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,**
**विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,मुंबई विभाग,**
**मल्होत्रा हाऊस,६ वा मजला,जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहाय्यक निबंधक,**
**विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,मुंबई विभाग,**
**मल्होत्रा हाऊस,६ वा मजला,जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.** **....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अरुण गणपत भोवर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.९.२००९ रोजी अर्ज करुन जन माहिती अधिका-यांच्या कार्यालयातील अपील क्र.१४१/०९ व एकूण ५ आदेश पत्रे यावरुन दिलेल्या आदेशांचा उपनिबंधक कार्यालय म्हाडा यांचेकडून अवमान होत आहे. याबाबत पुढील कारवाई कोणती याबाबत माहिती मागीतली होती. विचारलेली माहिती प्रश्नोत्तर स्वरुपात असल्याने माहितीच्या अधिकारांतर्गत येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२१.१०.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने दि.२६.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलावर खालीलप्रमाणे आदेश पारित केले.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये मी, डॉ.महेंद्र कल्याणकर, प्रथम अपीलीयअधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुबई असे आदेश निर्गमित करतो की, श्री.अरुण गणपत भोवर यांनी

दि.२६.१०.२००९ रोजी केलेले अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे. जन माहिती अधिका-यांना सूचना देण्यात येते की, त्यांनी उपनिबंधक सहकारी संस्था म्हाडा यांना निर्देश देऊन अरुण निवारा को.ऑप.हौ.सोसायटीचे प्रशासक श्री.आनंद म्होळे यांनी दप्तराचा ताबा अद्याप का घेतला नाही व दप्तराचा ताबा घेण्याबाबतच्या विलंबाबाबतची माहिती श्री.भोवर यांना त्वरीत पुरविण्याबाबत सूचना द्याव्यात.

यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अपील आदेशांचा उप-निबंधक कार्यालय, म्हाडा यांचेकडून अवमान होत असल्यासंबंधी अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी आदेशांच्या अवमानाबाबत मार्ग काढून प्रश्न सोडविण्यात आला आहे. याबाबत अपीलकारास अवगत करण्यात आले असल्याचे उ त्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन कले. अपीलकारही द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता हजर होते. या परिस्थितीत मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**

**दिनांकः१२.५.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७८६/०२**

**श्री. हरिष चंदू बडेकर,**
**३०४/७, तेजोमय को.ऑप.हौ.सो.,**
**सेक्टर क्र.३, चारकोप,**
**कांदिवली(प.), मुंबई-४०००६७. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण निरिक्षक,**
**शिक्षण निरिक्षक(प.) यांचे कार्यालय,**
**आय.वाय. कॉलेज कंपाऊंड,**
**जोगेश्वरी(पूर्व), मुबइ्र-४०००६०**

**जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपनिरिक्षक,**
**शिक्षण निरिक्षक(प.) यांचे कार्यालय,**
**आय.वाय. कॉलेज कंपाऊंड,**
**जोगेश्वरी(पूर्व), मुबइ्र-४०००६० ....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. हरिष चंदू बडेकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन दि.९.३.०९च्या सेंट लॉरेन्स स्कुलच्या पत्रावरील कार्यवाहीचा तपशील इतिवृत्तांत तसेच पत्रावर कार्यवाही न करण्याची प्रशासकीय कारणे इत्यादी एकूण ७ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ६.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मुलींच्या जातीची नोंद शाळेच्या अभिलेखावर होणेबाबत मागणी केली होती. कु.निकीता, नालंदा व प्रणिता या मुलींची शाळेच्या अभिलेखावर हिंदू ऐवजी बुध्दीझम अशी नोंद घेण्याबाबत उत्तरवादीने शाळेच्या मुख्याध्यापकांना दि.३.३.२०१० च्या पत्रान्वये कळविले आहे. यावरुन अपीलकाराच्या मागणीनुसार काम पूर्ण करुन अपीलकारास माहिती पुरविण्यात आली. याबाबतची कागदपत्र आयोगासमक्ष अपीलकारास उत्तरवादीने पुरविली. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१२.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७७७/०२**

**श्री. रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज,**
**घनश्यामदास चाळ, रुम नं.२,**
**संत रोहीदास मार्ग, काळा किल्ला,**
**धारावी, मुंबई-४०००१७.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त परिमंडळ-३,**
**मध्य प्रादेशिक विभाग,**
**भायखळा(पूर्व), मुंबई-२७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**मध्य नियंत्रण कक्ष, मध्य प्रादेशिक विभाग,**
**बावळा कंपाऊंड, डॉ.बी.ए.रोड,**
**भायखळा(पूर्व), मुंबई-४०००२७.** **....उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. ४.१२.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)पीएसआय महाजन आणि त्यांचे पोलीस सहयोगी पथक उत्तर प्रदेश धारावी पो.ठाण्यातून कोणत्या दिनांकी रवाना झाले आणि कोणत्या दिनांकानुसार धारावी पोलीस ठाण्यात कार्यरत झाले याबाबत साक्षांकित माहिती मिळण्याबाबत.

२) धारावी पोलीस ठाणेतून रवाना आणि पोलीस ठाणेत कार्यरत पर्यंत संबंधीत कागदपत्रे जसे दैनंदिनी नोंदवही येणे जाणे बाबत, आणि येणे जाणेबाबत ट्रेनची माहिती व तिकिटेची साक्षांकित प्रत मिळण्याबाबत.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२५.१.२०१० च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२५.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.२९.१.२०१० रोजी

आदेश पारित केले. माहिती उशीराने व अर्धवट दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन धारावी पोलीस ठाणेचे तपासी अधिकारी पोलीस उपनिरिक्षक श्री.महाजन व पथक हे उत्तरप्रदेश येथे किती तारखेला रवाना झाले,उत्तर प्रदेश येथून किती तारखेलाप परत आले इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. पोलीस उपनिरिक्षक श्री.महाजन व पथक हे उत्तर प्रदेश येथे दि.३.१२.०८ रोजी रवाना होऊन दि.१४.१२.०८ रोजी धारावी पोलीस ठाणे येथे परत आले. प्रवासाबाबत धारावी पोलीस ठाणे येथील ठाणे दैनंदिनीच्या नोंदी तसेच उपलब्ध रेल्वे वारंटची साक्षांकित प्रत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास उपलब्ध करुन दिली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून आले. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे श्री.अ.अ. चव्हाण, पोलीस उपनिरिक्षक यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१३.५.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/२९९५/०२**

**श्री. प्रदिपकुमार यशवंत भुर्के,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, ३रा मजला,**
**म.गांधी मार्ग, हुतात्मा चौक, फोर्ट,**
**मुंबई-४०० ००१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव(आस्थापना),**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग(आस्थापना),**
**बँक ऑफ इंडिया इमारत,**
**३रा मजला, हुतात्मा चौक, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(आस्थापना),**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग(आस्थापना),**
**बँक ऑफ इंडिया इमारत,**
**३रा मजला, हुतात्मा चौक, मुंबई-४००००१.** **....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. प्रदिपकुमार यशवंत भुर्के यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.६.४.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १७.१०.२००८ रोजी अर्ज करुन मंत्रालय सहाय्यक(मुख्य) परीक्षा १९९५ मधून शिफारसीस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी किती उमेदवारांना आयोगाच्या कार्यालयात नियुक्ती दिली होती व प्रत्यक्षात किती उमेदवारांनी नियुक्ती स्विकारली याबाबतचा तपशील एकूण १० मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.१९.११.०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मंत्रालय सहाय्यक(मुख्य) परीक्षा १९९५ बाबत एकूण १० मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिका-यांनी संपूर्ण माहिती पुरविलेली आहे असे अपीलकाराने दि.३०.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१३.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७९८/०२**

**श्री. निशांत सुभाष घाडगे,**
**२१/२, गोकूळ, डॉ.पेडणेकर बिल्डिंग,**
**स.म. मार्ग, कुर्ला(प.),**
**मुंबई-४०००७०.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, ३रा मजला,**
**गृहनिर्माण भवन, कलानगर,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता,**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, ३रा मजला,**
**गृहनिर्माण भवन, कलानगर,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** **....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. निशांत घाडगे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. ३०.९.२००९ रोजी अर्ज करुन स्थानिक विकास कार्यक्रम सन २०००-२००१ या वर्षी आमदार निधीतून बांधण्यात आलेल्या बस निवारा(पिक अप शेड) च्या बाबीची कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नाही, चुकीची माहिती पुरविली यामुळे अपीलकाराने दि.१२.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ६.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन आमदार निधीतून सन २०००-२००१ यावर्षी बांधण्यात आलेल्या बस थांब्यांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती ही अत्यंत विस्तृत स्वरुपाची असल्याने त्यांनी कार्यालयातील उपलब्ध अभिलेखाचे निरिक्षण करुन त्यांना नेमकी कोणती माहिती आवश्यक आहे याचे विवरण द्यावे, जेणेकरुन सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे अपीलकारास दि.१८.१२.०९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते असा प्रथम अपीलीय अधिका-यांनी लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. सरकारी जागा असतांना ती खाजगी संस्थेस कशी दिली असा अपीलकाराचा मुद्दा आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी मुंबई झ ोपडपट्टी सुधार मंडळ, मुंबई जिल्हाधिकारी आणि संस्था यांचेमध्ये पत्रव्यवहार झाला. बांधकामात सुधारणा करण्यात आली. सदर सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवाव्यात. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१३.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८०३/०२**

**श्री. विलास अनंत लाड,**
**१९, मिशन कंपाऊंड, खोली क्र.१६, ए.के. मार्ग,**
**नाना चौक, मुंबई-४०० ००७. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा धर्मादाय आयुक्त,**
**वरळी, मुंबई-४०००१८.**

**जन माहिती अधिकारी तथा धर्मादाय आयुक्त,**
**वरळी, मुंबई-४०००१८. ....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. विलास अनंत लाड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. २२.९.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)स्कॉटलंड चर्च ट्रस्टमध्ये कोणकोण विश्वस्त आहेत त्यांची नावे काय व पत्ता,कधी नोंद केली याची संपूर्ण माहिती

२)द स्कॉटलंड चर्च व यु.सी.एन.आय.टी.ए. व जॉन विल्सन एज्युकेशन सोसायटी यांच्यामध्ये कधी फेरबदल करण्यात आला, का, तो फेरबदल कोणी केली याची माहिती

३)या वरील ट्रस्टमध्ये अध्यक्ष व सभासद कोण आहेत त्यांची माहिती

४)त्यांच्या बॅलन्सशीटच्या प्रती

५)यु.सी.एन.आय.टी.ए.यांचे आपल्या कार्यालयात नोंदणी केले असल्यास कधी केले त्याचा नोंदणी क्रमांक काय आहे त्याची माहिती

६)याचे अध्यक्ष,विश्वस्त व सभासद कोण आहेत त्याची माहिती

७) या ट्रस्टच्या बॅलन्सशीटच्या प्रती

८)यु.सी.एन.आय.टी.ए. व जॉन विल्सन एज्युकेशन सोसायटी या दोन्ही संस्थेबाबत कोणी तक्रारी केल्या होत्या त्याच्या माहिती व प्रती

९) आपण त्यावर कोणती व कोणत्या नियमानुसार कारवाई केली त्याच्या माहिती व प्रती

वरील संदर्भात संपूण माहिती व प्रती मिळणेबाबत.

जन माहिती अधिका-यांनी आवश्यक ती माहिती विहित कालावधीत अपीलकारास पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२८.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ७.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन द स्कॉटलंड चर्च बाबत एकूण ९ मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१३.५.२०१०** | **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७७४/०२**

**श्री. मंगेश लक्ष्मण कांबळे,**
**१६१, सी हनुमान नगर, सेंच्युरी मिल गेट नं.२जवळ,**
**पी.बी. मार्ग, वरळी, मुंबई-४०००३०. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**सहाय्यक पालिका आयुक्त जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**१ला मजला, ना.म. जोशी मार्ग,धनमिल नाका,**
**एलफीस्टन रोड, मुंबई-४०००१३.**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी,**
**सहाय्यक पालिका आयुक्त जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**१ला मजला, ना.म. जोशी मार्ग,धनमिल नाका,**
**एलफीस्टन रोड, मुंबई-४०००१३. ....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. मंगेश लक्ष्मण कांबळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.११.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)दि.१८ मार्च,२००८ रोजीच्या एजीएमच्या प्रमाणित प्रती द्याव्यात

२) ३३/३८ ची नोटीस काढण्यात आलेल्या संदर्भातील संपूर्ण कागदपत्रांची यादी(अनुक्रमणीका) द्यावी

३)३३/३८ ची नोटीस बजावतांना काढण्यात आलेल्या व्हिडीओ चित्रणाची सीडी

४)अ) ३३/३८ ची नोटीस संदर्भातील संपूर्ण कागदपत्रे व

ब)त्याकरीता एसआरए कार्यालयातून शिफारस करण्यात आलेल्या कागदोपत्राचे निरिक्षण द्यावे

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१८.१२.०९च्या पत्रान्वये माहिती पुरविली.३(एक)ची माहिती देण्यास जन माहिती अधिका-याने नकार दिल्याने ती माहिती मोफत मिळावी

म्हणून अपीलकाराने दि.२४.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.१८.१२.२००९च्या पत्रान्वये उत्तर पाठविले असले तरीसुध्दा अपीलकाराच्या विनंतीनुसार जन माहिती अधिकारी यांनी महालक्ष्मी एस.आर.ए.को.ऑप.हौ.सोसायटी व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना अपीलकारास आवश्यक त्या प्रती उपलब्ध करुन देण्याबाबत कळवावे असे दि.१९.१.२०१० रोजी आदेश पारित केले. संस्थेने महानगरपालिकेत सादर केलेल्या ठरावाची प्रत मिळणेबाबत मुद्दा उपस्थित करुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन महालक्ष्मी एस.आर.ए.सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या दि.१८.३.०८ रोजीच्या ए.जी.एम.च्या प्रमाणित प्रती, ३३/३८ ची नोटीस काढण्यात आलेल्या संपूर्ण कागदपत्राच्या प्रती व इतर अनुषंगिक माहिती मागीतली होती. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, एस.आर.ए.को.ऑप.हौ.सोसायटीची दि.१८.३.२००८रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची प्रमाणित प्रत जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत निःशुल्करित्या पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१३.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/७८६/०२**

**श्री. संदिप लढ्ढा,**
**व्हाईस प्रंसीडेंट(माईन्स),सारडा एनर्जी मिनरल्स लि.,**
**जेएमजी हाऊस, पंचशील नगर,**
**सिव्हील लाईन्स,रायपूर(सी.जी.)-४९२००१. ..... तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**इंडस्ट्रीज अँड एनर्जी अँड लेबर डिपार्टमेंट,**
**महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. संदिप लढ्ढा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२३.१२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. १०.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते, गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.४.१२.२००८ रोजी अर्ज करुन सन १९६६ मध्ये राज्य शासनाद्वारे नागपूर,भंडारा जिल्हयातील कांही क्षेत्रे अराखीव करुन खनिज सवलतीसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत प्रकाशित केलेल्या राजपत्राच्या प्रतीची मागणी केली होती. कार्यासनातील अभिलेखामध्ये सर्वंकश शोध घेतला असता संबंधीत वर्षाची निवडनस्ती अथवा मूळ नस्ती आढळून न आल्याने अभिलेखाचा शोध लागत नसल्याने माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.१७.१२.०८च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. गैरतक्रारदाराने पुन्हा कागदपत्राचा कसून शोध घेऊन तक्रारदारास माहिती पुरवावी असे दि.२७.२.०९ रोजी आदेश पारित केल े होते. त्यानंतर गैरतक्रारदाराने कागदपत्राचा शोध घेतला. दि.१०.८.१९६६ च्या अधिसूचनेची प्रत तक्रारदारास दि.२५.३.२००९ च्या पत्रासोबत उपलब्ध करुन दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती तक्रारदारास दि.२५.३.०९च्या पत्रासोबत पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदाराने तक्रारीवरील

सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. तसेच दि.१०.८.१९६६ च्या अधिसूचनेची प्रत आयोगास सादर केली. यावरुन तक्रारदारास माहिती पुरविण्यात आल्याचे दिसून आले. तक्रारदार तक्रारीवरील सुनावणीकरीता हजर नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१३.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/७८५/०२**

**श्री. अभिजित मेहता,**
**ए-२०१,लेनी, लोखंडवाला कॉम्प्लेक्स,**
**अंधेरी(प.), मुंबई-४०००५३. ..... तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालय,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. अभिजित मेहता यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१८.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. ७.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते, गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन मेट्रोविषयक पत्रव्यवहार व कागदपत्रे पहाण्यासाठी मागीतली होती. कार्यालयात कागदपत्र उपलब्ध नसल्याने व सदर विषयाचा संबंध नगर विकास विभागाशी असल्याने तक्रारदाराचा अर्ज गैरतक्रारदाराने दि.२४.१२.०९च्या पत्रान्वये पुढील कार्यवाहीसाठी नगरविकास विभागाकडे पाठविला. तसे तक्रारदारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने दि.२९.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. विषय नगर विकास विभागाशी संबंधीत असल्याने अपील अर्जही नगर विकास विभागाकडे गैरतक्रारदाराने पाठविला. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराने मेट्रोविषयक पत्रव्यवहार व कागदपत्र पहाण्यासाठी ती उपलब्ध करुन देण्याची गैरतक्रारदाराकडे मागणी केली होती. सदर विषय नगर विकास विभागाच्या कार्यकक्षेतील असल्याने तक्रारदाराचाअर्ज/अपील अर्ज गैरतक्रारदाराने नगर विकास विभागाकडे पुढील आवश्यक

कार्यवाहीकरीता हस्तांतरित केली आहेत. याबाबत गैरतक्रारदाराने तक्रारदारास वेळोवेळी अवगत केले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१३.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/४५६/०२**

**श्री. रविकांत स. दुखंडे,**
**३४/२४३, एम.एच.बी. कॉलनी,**
**मजासवाडी(इडब्ल्यूएस),सर्वोदय नगर,**
**जोगेश्वरी(पूर्व),**
**मुंबई-४०००६०. ..... तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियता(मेंटेनन्स-II),**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई, के/पूर्व वार्ड,**
**अंधेरी(पूर्व), ३रा मजला, आझाद रोड,गुंडवली,**
**मुंबई-४०००६९. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. रविकांत दुखंडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२६.९.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. ७.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते, गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२६.११.०८ रोजी अर्ज करुन सर्वोदय नगर मजासवाडी येथे मैदानाच्या जागेवर पक्के मंडप बांधकाम करण्यात आले आहे त्याची चावी अनधीकृत संस्थेच्या लोकांच्या ताब्यात असून इतर स्थानिक लोकांना त्याचा वापर करण्यास मिळत नाही, याबाबत तक्रार करुन अनुषंगिक माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सर्वोदय नगर मजासवाडी येथे सभामंडपाचे बांधकाम नगर सेवकाच्या निधीतून महानगरपालिकेने केले आहे. सभामंडप सर्वोदय संस्थेच्या ताब्यात आहे. संस्था नोंदणीकृत आहे.सभामंडप बांधकामास म्हाडाकडून ना-हरकत प्रमाणपत्र, कागदपत्र महानगरपालिकेने प्राप्त केली

आहेत. सदर कागदपत्र, ना-हरकत प्रमाणपत्राच्या प्रती गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झ
ाल्यापासून ३० दिवसांचे आत तक्रारदारास पुरवावीत. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१३.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/५८६/०२**

**श्री. हरिबा म.चोपडे,**
**सावित्रीबाई माळीण चाळ,**
**परिघ खाडी वसाहत,एल.बी.एस.मार्ग,**
**सुधाकर स्टोअर्सच्या पाठीमागे,खां.नं.३,**
**कुर्ला(प.), मुंबई-४०००७०. ..... तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियता(इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एल वार्ड,**
**कुर्ला(पूर्व), मुंबई-४०००७०. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. हरिबा चोपडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२३.१२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. १०.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२१.४.०९ रोजी अर्ज करुन सावित्रीबाई मालीन चाळ,परिद खाडी वसंत, कुर्ला येथील अतिक्रमण काढून टाकण्याबाबत मागणी केली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील क्र.२००८/३४७६/०२ दाखल केले होते. गैरतक्रारदाराकडे उपलब्ध असलेली माहिती तक्रारदारास पुरविण्यात यावी असे आयोगाने दि.३१.१०.०९ रोजी आदेश पारित केले होते. गैरतक्रारदाराने चुकीची, दिशाभूल करणारी माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदारास पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये ४ सदनिका धारकांची माहिती पुरविली नसल्याची बाब तक्रारदाराने सुनावणीचेवेळी उपस्थित केली. नेमक्या कोणत्या ४ सदनिकाधारकांची माहिती तक्रारदारास मिळालेली नाही याबाबत सविस्तर तपशील तक्रारदाराने गैरतक्रारदारास सादर

करावा. त्यानुसार गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरवावी. अनधिकृत बांधकामाविरुध्द केलेल्या कारवाईचा अहवाल गैरतक्रारदारानी तक्रारदारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः१३.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/५४८/०२**

**श्री. महाबीर उर्स,**
**५०२, सरीता स्वप्न नगरी,**
**मुलुंड(प.), मुंबई - ४०००८०.** ..... **तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियता(इ.प्र.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,उप मुख्य अभियंता यांचे कार्यालय,**
**इस्टर्न सबर्ब, राज लिगसी जवळ,पेपर मिल कंपाऊंड,**
**विक्रोळी(पूर्व), मुंबई-४०००८३.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. महाबीर उर्स यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.७.३.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. १०.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१.८.२००६ रोजी अर्ज करुन सी.टी.सर्व्हे क्र.११४९,११४९/१ ते ९ एस.व्ही.पटेल रोड, मुलुंड येथील प्रस्तावित/जुन्या इमारतीलगतच्या खुल्या इमारतीलगतच्या खुल्या जागेवरील पाय-यांच्या बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.१४.९.०६ व दि.१८.१०.०६च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.३.१२.०६ रोजी प्रथम अपील दाखल केले. गैरतक्रारदाराने मुद्देनिहाय माहिती तक्रारदारास पुरविली आहे. आवश्यक कागदपत्राच्या छायाप्रती शुल्क भरल्यानंतर उपलब्ध करुन द्याव्यात असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१२.१.२००७ रोजी तक्रारदारास कळवून गैरतक्रारदारास माहिती पुरविण्याच्या सूचना दिल्या. काही माहिती मिळाली, काही मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१.८.२००६रोजी अर्ज करुन माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने प्रथम तक्रारदारास दि.१४.९.२००६च्या पत्रान्वये माहिती पुरविली. उर्वरित माहिती विलंबाने तक्रारदारास पुरविण्यात आली असल्याची बाब तक्रारदाराने तक्रारीवरील

सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार विहित कालावधीत माहिती पुरविणे बंधनकारक आहे. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विलंबाने माहिती पुरविली आहे यासाठी तक्रारदारास जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

**तक्रार अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:१३.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/७७९/०२**

**श्री. विजय दाजी शिर्के,**
**२८/७१, बि.डि.डि. चाळ,एन.एम.जोशी मार्ग,**
**मुंबई-४०००१२.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,**
**मुंबई विकास विभाग चाळी,**
**वरळी, मुंबई-४०००१८.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. विजय दाजी शिर्के यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२३.४.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. ६.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१३.१.०९ रोजी अर्ज करुन बी.डी.डी.चाळ वरळीचे दुरुस्तीचे काम २००७-०८ या कालावधीत केले. त्यावेळी किती ट्रक डेब्रीज उचलण्यात आले, जी.आय.पाईपचा खर्च इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने आयोगाकडे क्र.२०१०/३५२६/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. तक्रारदारास ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.३०.१.२०१० रोजी आदेश पारित कले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने दि.२९.४.२०१० च्या पत्रानुसार गोळा केलेली माहिती तक्रारदारास पोच देय डाकेने निःशुल्करित्या पाठवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१३.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/३९२/०२**

**श्री. मोहम्मद हसीम अन्सारी रामपाललाल,**
**मरीअम्मा नगर, नेहरु सेंटरच्या मागे,**
**डॉ.एस.बी. रोड, वरळी, मुंबई-१८. ..... तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५वा मजला,**
**गृहनिर्माण भवन,बांद्रे(पूर्व),**
**मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. मोहम्मद हासिम अन्सारी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१५.६.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. १०.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदार यांनी माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन मरीअम्मा नगर सहकारी गृहनिर्माण संस्था लि. सर्व्हे क्र.४७ डॉ.एम.बी.रोड, वरळी मुंबई याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने आयोगाकडे द्वितीय अपील क्र.२००९/२०५८/०२ दाखल केले होते. तक्रारदारास १५ दिवसात माहिती पुरवावी असे आयोगाने दि.३१.३.०९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

महाराष्ट्र सहकारी अधिनियमानुसार मरीअम्मा नगर सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी संबंधीच्या कागदपत्रच्या छायाप्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत तक्रारदारास पुरवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१३.५.२०१० राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७५६/०२**

**श्री. शेख फत्तेहमोहम्मद मोहम्मद रझा,**
**शरीफ मन्सुरी चाळ, सीईएन-३३५(२२) गांधी नगर,**
**चारकोप लिंक रोड, कांदिवली(प.),**
**मुंबई-४०००६७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सहाय्यक पालिका आयुक्त यांचे कार्यालय,**
**पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**लिबर्टी गार्डन, मालाड(प.),मुंबई-४०००६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यकअभियंता(इ.व का.),**
**सहाय्यक पालिका आयुक्त यांचे कार्यालय,**
**पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**लिबर्टी गार्डन, मालाड(प.),मुंबई-४०००६४.** **....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. शेख फत्तेहमोहम्मद मोहम्मद रझा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. २१.१०.२००७ रोजी अर्ज करुन होली एन्जल हायस्कूल ब्लॉक क्र.६ मालवणी कॉलनी, मालाड(प.) या शाळेच्या मालकाचे नाव, सद्यस्थिती अहवाल, मोजमाप, किती गाळयाचे बांधकाम तसेच तळमजल्यावरील अतिक्रमण अधिकृत वा अनधिकृत आहे याबाबत माहिती विचारली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. कार्यालयातील कागदपत्राच्या निरिक्षणाकरीता कार्यालयात हजर रहावे असे जन माहिती अधिका-यांनी दि.९.१२.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२९.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर सुनावणी आयोजित करण्यात आली. जन माहिती अधिका-यांनी जागेची प्रत्यक्ष पहाणी करावी. प्रशासकीय अधिकारी(मालमत्ता) व वसाहत अधिकारी यांच्याकडून सदर शाळेची माहिती गोळा करुन १० दिवसाच्या आत अपीलार्थीला देण्यात

यावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२५.१.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, होली एन्जल हायस्कूल ब्लॉक क्र.६, मालवणी कॉलनी बाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. १० दिवसांचे आत जागेची पहाणी करुन अपीलकारास माहिती पुरवावी असे आदेश पारित केले होते. प्रथम अपीलीय अधिका-यांच्या आदेशाचे जन माहिती अधिका-यांनी पालन केले नाही. अपीलकारास माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदरहू प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी उक्त अधिनियमातील कलम ७ चा भंग केला आहे. यासाठी जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती का लादण्यात येउ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयांचे आत आयोगाकडे लेखी अहवाल सादर करावा.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१४.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८३८/०२**

**श्री. निपूण मठकर,**
**बी-५, जिवदानी कृपा चाळ,**
**रामचंद्र जाधववाडी, विजयनगर,**
**नालासोपारा(पू.), ४०१२०८.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी उप सचिव,**
**वित्त विभाग(प्रशासन-२),**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**वित्त विभाग(प्रशासन-२),**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** **....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. निपूण मठकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.८.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. २७.४.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

अ)सर्वोच्च व उच्च न्यायालयात वित्त विभागाविरुध्द दाखल झालेल्या न्यायिक कार्यवाहीचे अनुक्रमांक

ब)सर्वोच्च न्यायालय व इतर राज्यातील उच्च न्यायालये यांनी दिलेल्या निकालाच्या/आदेशांच्या अनुषंगाने केलेली अंमलबजावणी व कार्यपूर्ती यांची माहिती/निरिक्षण आणि

क)शासकीय/अधिकारी/कर्मचारी माहिती अधिकारी अपीलीय प्राधिकारी,सचिव,कायदेशीर प्रतिनिधी, सक्षम प्राधिकारी व मंत्री यांच्या विविध तरतुदीअंतर्गत कर्तव्य व जबाबदा-या यांची माहिती/निरिक्षण यांची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२७.५.२००९ च्या पत्रान्वये खुद्द वित्त विभागाची मुद्देनिहाय माहिती पुरविली. अपीलकाराच्या अर्जाच्या प्रती सर्व संबंधीत जन माहिती अधिका-याकडे

हस्तांतरीत करुन अपीलकारास परस्पर माहिती पुरविण्याबाबत कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपील अमान्य केले. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ११.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव श्री.पु.रा.हरचांदे उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी अपीलकाराने मागणी केलेली खुद्द वित्त विभागाची माहिती जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२७.५.२०१० च्या पत्रान्वये पुरविली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी नियमानुसार समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपीलीय अधिका-यांनी पारित केलेल्या दि.२१.७.०९ च्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**

**दिनांक:१४.५.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८३७/०२**

**श्री. निपूण मठकर,**
**बी-५, जिवदानी कृपा चाळ,**
**रामचंद्र जाधववाडी, विजयनगर,**
**नालासोपारा(पू.), ४०१२०८. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**गृह विभाग पोल-१४,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**गृह विभाग,पोल-१४,**
**मंत्रालय, मुंबईर्-४०००३२. ....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. निपूण मठकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२.६.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन राज्य मानवी हक्क आयोगाच्या कामकाजासंदर्भात माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागीतलेली माहिती मानवी हक्क आयोगाशी संबंधीत असल्याने अपीलकाराचा अर्ज पुढील कार्यवाहीकरीता मानवी हक्क आयोगाकडे पाठविण्यात येत असल्याने त्यांच्याशी संपर्क साधावा असे दि.२०.५.०९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल कले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराचा अर्ज मानवी हक्क आयोगाकडे पाठवावा असे नमूद करुन दि.१६.५.०९ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील निकालात काढले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ११.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित

नव्हते. सुनावणीच्या वेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मानवी हक्क आयोगाच्या कामकाजाबाबत माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीचा संबंध मानवी हक्क आयोगाशी संबंधीत असल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. अपीलकाराचा अर्ज पुढील आवश्यक त्या कारवाईकरीता मानवी हक्क आयोगाकडे हस्तांतरीत केला. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने मानवी आयोगाच्या कामकाजाबाबत माहिती मागीतली आहे. तरी अपीलकाराच्या मागणीप्रमाणे जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१४.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८२८/०२**

**श्री. राहुल श्रीरंग पगारे,**
**पंचनंद निवास, माळेवाडी स्टॉप,**
**मु.आकुर्ली,पो.नवीन पनवेल,**
**ता.पनवेल, जि.रायगड. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.अधीक्षक अभियंता,**
**अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय, मुंबई(सा.बां.)मंडळ,**
**२५ मर्झबान रोड,फोर्ट, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक,**
**कार्यकारी अभियंता,इलाखा शहर विभाग,**
**(सा.बां.वि.)यांचे कार्यालय,३रा मजला,**
**डी.डी.इमारत, जुने जकात घर आवार,**
**मुंबई-४०००२३. ....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. राहूल पगारे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.८.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१.८.२००९ अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

कार्यक्षेत्रातील कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्या उपविभागातील मागणीनुसार मंजूर झालेली कामे, देखभाल दुरुस्तीची सी.आर.व एस.आर.च्या हेडखालील झालेली कामे, काम करणारे ठेकेदार, मंजूर सोसायटयांची नावे,पत्ते सर्व कामांचा तपासणीचा अहवाल धनादेश पुस्तीका, कामांचे जॉब नंबर,वर्क ऑर्डर, तांत्रिक मान्यता, सर्व कामांची एम.बी. रेकॉर्डींगसह तपशीलवार माहिती मिळणेबाबत.

जन माहिती अधिका-यांनी दि.२२.१२.०९च्या पत्रान्वये कार्यालयात उपस्थित राहून माहिती तपासावी व त्याप्रमाणे त्यातील आवश्यक असणा-या माहितीच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील असे अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.५.१.२०१० रोजी प्रथम

अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ११.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन उप विभागात दि.१.४.०७ ते १७.७.२००९ या कालावधीत झालेल्या कामाची माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने कार्यालयात उपस्थित राहून माहिती तपासावी. त्यातील आवश्यक असणा-या माहितीच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील असे अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी कळविले होते. त्यानुसार अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून माहिती तपासली. अपीलकाराने अर्जात नमूद केल्यानुसार माहिती पहावयास मिळाली नसल्याचे दि.११.१२.०९ च्या अर्जान्वये उत्तरवादीस कळविले. माहितीचा अधिकार अधिनियमानुसार उपलब्ध असलेली माहिती ज्या स्वरुपात आहे त्या स्वरुपातच द्यावयाची असते. अपीलकाराने अर्जात नमूद केल्याप्रमाणे माहिती देणे शक्य नाही असे अपीलकारास कळविले. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी नियमानुसार अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१४.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८४५/०२**

**श्री. अली असगर मोहमद तहसीलदार,**
**२९/२६, गेट नं.७, न्यु कलेक्टर कंपाऊंड,**
**मालवणी, मालाड(प.),**
**मुंबई-४०००९५. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी(अति./निष्का.),**
**मालाड विभाग कार्यालय,**
**एम.एच.बी.इमारत क्र.३७,१ला मजला,**
**गोरेगांव(प.),मुंबई-६२.**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**उपजिल्हाधिकारी(अति./निष्का.)कार्यालय,**
**मालाड विभाग,एम.एच.बी. इमारत क्र.३७,**
**१ला मजला, गोरेगाव(प.),मुंबई-४०००६२. ....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अली असगर मोहम्मद तहसीलदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.८.२००९ अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)अपीलकाराने केलेल्या दि.५.५.२००८ टोकन क्र.१३ व २.२.२००९ रोजी टोकन क्र.३ लोकशाही दिनानिमित्त के`ल्या तक्रारीनुसार तळमजला पल्स दोनचे राहण्याचा निवासस्थानाचे,व्यावसायिक गाळे अनधिकृतपणे बांधकाम करणारे बांधकाम व्यावसायिक नामे १)शब्बीर सय्यद अब्दुल कादर सय्यद उर्फ शब्बीर चिकना राहणार प्लॉट क्र.१४,घर क्र.१५७, न्यू कलेक्टर कंपाऊंड, गेट क्र.७, मालवणी मालाड पश्चिम, मुंबई-९५ २) युसुफ राहणार प्लॉट क्र.२१, महादेव मेडीकल स्टोअरचे वर, गेट क्र.७ एन.सी.सी.मालवणी, मालाड पश्चिम यांच्याविरुध्द अनधिकृतपणे बांधकाम करणारे विरुध्द झोपडपट्टी दादा अंतर्गत प्रशासनांनी अद्याप पावेतो कोणती उचित कार्यवाही कली गेली आहे ३) घर मालक यांनी प्रशासनातील अधिकारी यांना दिनांक

२३.६.२००९ रोजी लेखी स्वरुपात आठ दिवसात केले गेलेले अवैध बांधकाम स्वतः मी काढून घेणार परंतु आज पावेतोपर्यंत घर मालक यांचा मार्फत अवैध बांधकाम काढण्यात आले नाही. तरी आपले विभागामार्फत कोणती उचित कार्यवाही करण्यात आली आहे याचा सविस्तर खुलासा व कार्यवाहीची कागपत्राची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी ४)घर मालक मुजफ्फरअहमद यांनी आपले कार्यालयात दिनांक २५.७.२००९ रोजी लेखी स्वरुपात दिलेले विनंती पत्राची प्रत हे सर्व कागदपत्राची प्रत उपलब्ध करुन देण्याची कृपा करावी.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१५.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १२.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अवैध बांधकाम काढून टाकण्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अवैध बांधकाम काढून टाकण्याबाबत केलेल्या कारवाईची माहिती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१५.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८४८/०२**

**श्री. महाबीर नुणीवाल,**
**के-४/१२८, डी.एन.नगर,**
**नेप्च्युन को.ऑप.हौ.सो.,ऑफ जे.पी.रोड,**
**अंधेरी(प.), मुंबई-४०००५३.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता(WS-१),**
**१ला मजला, आर.के.पाटकर मार्ग,**
**बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,(इ.प्र.),**
**१ला मजला, आर.के.पाटकर मार्ग,**
**बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.** **....उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. महाबीर नुणीवाल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२८.१२.२००९ अर्ज करुन प्लॉट क्र.के-३ आणि के-४ चा वापर निवासी ऐवजी व्यापारी तत्वावर करण्याकरीता म्हाडाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. त्यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२९.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १२.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन प्लॉट क्र.के-३ आणि के-४ चा वापर निवासी ऐवजी व्यापारी तत्वावर करण्यास म्हाडाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१५.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८४६/०२**

**श्री. अली असगर मोहम्मद तहसीलदार,**
**२९/२६, गेट नं.७, न्यु कलेक्टर कंपाऊंड,**
**मालवणी, मालाड(प.),**
**मुंबई-४०००९५.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी(अति./निष्का.),**
**मालाड विभाग कार्यालय,**
**एम.एच.बी.इमारत क्र.३७,१ला मजला,**
**गोरेगांव(प.),मुंबई-६२.**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**उपजिल्हाधिकारी(अति./निष्का.)कार्यालय,**
**मालाड विभाग,एम.एच.बी. इमारत क्र.३७,**
**१ला मजला, गोरेगाव(प.),मुंबई-४०००६२.** **....उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. अली असगर मोहम्मद तहसीलदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.९.२००९ अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

दिनांक १.१.२००७ ते आजपर्यंत आपले कार्यालयामार्फत नवीन कलेक्टर कंपाऊंड,ओल्ड कलेक्टर कंपाऊंड व अन्य ठिकाणी मालवणी परिसरात अवैध बांधकाम करणारे बांधकाम व्यवसायिक यांच्याविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता मालवणी पोलीस ठाण्याला किती बांधकाम व्यावसायिकांवर गुन्हा दाखल करण्याकरीता नावांची सूची देण्यात आली आहे. २) सरकारी जागांवर कब्जा करुन त्या ठिकाणी नवीन झोपडी बांधणारे झोपडपट्टी दादा यांच्याविरुध्द मालवणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याकरीता किती लोकांची सूची देण्यात आलेली आहे. ३)अवैध बांधकाम तळ मजला, दोन व एक मजल्याचे तसेच नवीन झोपडपट्टी बांधणे संदर्भात दिनांक १.१.२००७ ते आजपर्यंत किती संस्था व दक्ष नागरिकांनी तक्रार केली आहे. ही सर्व माहिती लेखी स्वरुपात देण्याची कृपा करावी.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत मागीतलेली माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२८.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १२.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन,नवीन व जुने कलेक्टर कंपाऊंड व अन्य ठिकाणी मालवणी,मालाड परिसरात अवैध बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:१५.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८५५/०२**

**ॲड.दिपेंद्र दिनेश कानडे,**
**३,मधुवसंत १ला मजला,**
**पंप हाऊस,अंधेरी(पूर्व),**
**मुंबई-४०००९३.** .... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य,**
**न्यु लॉ कॉलेज, सेनापती बापट मार्ग,**
**माटुंगा रोड, मुंबई-४०००१६.** ....**उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार ॲड. दिपेंद्र कानडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.५.११.२००९ अर्ज करुन न्यु लॉ कॉलेज, सेनापती बापट मार्ग, माटुंगा रोड, मुंबई येथील कर्मचा-यांच्या नेमणूकांबाबत एकूण ११ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती.मुद्दा क्र.९,१०, व ११ची माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १२.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माति अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन न्यु लॉ कॉलेज मधील कर्मचा-यांच्या नेमणुकांबाबत एकूण ११ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास अर्जातील मुद्दा क्र.९,१० व ११ वगळता इतर मुद्यांची माहिती पुरविली आहे. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, सदर संस्थेच्या व्यवस्थापनाने,

अपीलकारास अर्जातील मुद्दा क्र.९,१० व ११ बाबत माहिती पुरवावी. उत्तरवादीने संस्थेच्या सचिवांना दि.६.११.०९ रोजी पत्र पाठवून सदर मुद्यांची सविस्तर माहिती अपीलकारास पुरविण्याबाबत कळविले आहे. तसेच याबाबत अपीलकारासही अवगत केले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१५.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८५६/०२६**

**श्री.नागेश पाटील,**
**बी/३०७, राजविला,लक्ष्मण म्हात्रे रोड,**
**मेरी गर्ल्स हायस्कूलच्या समोर,**
**मंडपेश्वर,बोरीवली(प.),मुंबई-४०००१३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक/वैद्यकीय अधिकारी,**
**जे.जे. रुग्णालय समूह,**
**नेत्ररोग चिकित्सा विभाग,**
**भायखळा, मुंबई-४००००८.** **....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.नागेश पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१.१.२०१० अर्ज करुन जे.जे. हॉस्पीटल आणि ग्रँड मेडीकल कॉलेज कडून देण्यात येणा-या सर्व प्रकारच्या व अंध अपंगत्वाचे दाखले याची नोंद ज्या नोंदवहीमध्ये केली जाते त्या नोंदवहीच्या दि.१.१.१९९५ ते ३१.३.१९९९ या कालावधीतील सर्व प्रकारच्या नोंदी असलेल्या सर्व पृष्ठाच्या छायांकित प्रती व एकूण ४ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित वेळेत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.४.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १२.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलीय अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने ग्रँड मेडीकल कॉलेजकडून देण्यात येणा-या सर्व प्रकारच्या व अंध अपंगत्वाच्या दाखल्यासंबंधी एकूण ४ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. विभाग प्रत्येक बुधवारी सर्वसाधारण २९ ते ३० अपंगांना प्रमाणपत्र देतो. अशा

नोंदवहयांची संख्या खूप मोठी आहे. श्री.किशोर गजानन पाटील यांच्या प्रमाणपत्राची प्रत अपीलकारास देऊन तसे उत्तरवादीने अपीलकारास कळविले. श्री.गजानन पाटील यांना कायमचे ५५% अंधत्व आलेले होते. त्यानंतर त्यांना दि.२७.१.२०१० रोजी नवीन प्रमाणपत्र देण्यात आले. त्यांचे अपंगत्व वाढून ७५% इतके झाले. तसे प्रमाणित करण्यात आले. उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. अपीलकार सुनावणीकरीता हजर नव्हते. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:१५.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८४१/०२६**

**श्री. प्रशांत दिगंबर देऊळकर,**
**२६,सी-४०१, सहयोग सोसायअी,**
**चांदिवली, म्हाडा,अंधेरी(पूर्व),**
**मुंबइ्र-४०००७२.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पणन संचालक,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व),**
**मुंबइ्र-४०००५७.** **....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.प्रशांत देऊळकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.९.२.२०१० रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१०.६.२००९ रोजी अर्ज करुन चांदीवली पवई कोड क्र.१८५ सन २००६ या योजनेबाबत एकूण १० मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती वेळेत पुरविली नाही यामुळे अपीलकाराने दि.३.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १२.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन चांदीवली पवई कोड क्रमांक १८५ सन २००६ या योजनेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती

अधिका-यांनी अपीलकारास कार्यालयातील संबंधीत कागदपत्राचे निरिक्षण करण्यास परवानगी द्यावी. अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत कागदपत्राचे निरिक्षण करावे. त्यामधील हव्या असलेल्या कागदपत्रांची उत्तरवादीकडे मागणी करावी. उत्तरवादीने अपीलकारास हव्या असलेल्या कार्यालयातील उपलब्ध कागदपत्राच्या प्रती पुरवाव्यात.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१५.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८४२/०२६**

**श्री. राजेश छबुलाल भावसार,**
**१०/५, ठाणकरपाडा, दुर्गानगर,**
**गणेशकृपा कॉलनी, कल्याण,**
**जि.ठाणे. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,**
**उद्योग सारथी, महाकाली केव्हज,**
**अंधेरी, मुंबई-४०००९३.**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**विभाग डोंबिवली.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी/उप अभियंता व स्वीस क्र.१,**
**कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, विभाग डोंबिवली. ....उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. राजेश छबुलाल भावसार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये एम.आय.डी.सी.कडे प्रथम अपील दाखल केले त्याची प्रत राज्य माहिती आयोगाकडे पाठविली. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.१०.२००९ रोजी अर्ज करुन डोंबीवली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कार्यालयातून दि.२३.१०.०१ ते १.७.२००९ या कालावधीत मेसर्स विंद्याचल सिक्युरिटी कंपनी, ऐरोली,नवी मुंबई, सिक्युरीटी गार्डच्या वेतनाकरीता दरमहा किती रकमेचा धनादेश दिला त्याची तपशिलवार माहिती व अनुषंगिक एकूण ११ मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२३.१२.०९ च्या पत्रानुसार अपीलकारास मुद्देवार माहिती पुरविली. जन माहिती अधिका-यांनी ११ मुद्यांपैकी ९ मुद्यांची माहिती दिशाभूल करणारी व खोटी माहिती दिली असल्याच्या कारणावरुनअपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी

सुनावणी आयोजित केली. दि.१८.३.२०१० रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील निकाली काढले. अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे प्रथम अपीलाची प्रत पाठविली होती. सदर प्रकरणी राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मे.विंद्याचल सिक्युरिटी कंपनीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली आहे. सदर प्रकरणी कामगार आणि कंपनी मालक यांच्यामध्ये वाद आहे. कामगार आणि कंपनी मालकांतील वाद सोडविण्याची बाब राज्य माहिती आयोगाच्या कक्षेत मोडत नाही. याकरीता अपीलकाराने सक्षम प्राधिका-यांकडे दाद मागावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१५.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८२७/०२६**

**श्री. प्रकाश कृष्णा कदम,**
**न्यू.शिवनेरी गृह निर्माण संस्था,**
**खो.क्र.ए/१०२,मुकुंद नगर,**
**धारावी, मुंबई-४०००१७.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अनबंधक(सहकारी संस्था),**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१(अभियांत्रिकी),**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.** **....उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.प्रकाश कदम यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२.१२.२००९ रोजी अर्ज करुन न्यु शिवनेरी गृहनिर्माण संस्था, मुकुंद नगर, ए/१०२, पहिला मजला धारावी, मुंबई-१७ या संस्थेबाबत खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)उपरोक्त संस्थेतील निवासी/अनिवासी धारकांची नावे/यादी

२)संस्थेतील सोडत झालेल्या सदनिका/दुकाने यांचे वाटप झाले, त्या धारकांच्या नावाची यादी क्रमांकासहीत

३) संस्थेतील बाजवाडी/समाजकल्याणासाठीचे खोल्या/संस्थेचे ऑफीस कोठे व किती क्रमांकाच्या खोल्यांमध्ये आहेत त्याचा तपशील

४)सदर इमारतीमध्ये प्रकल्प ग्रस्तांसाठीचे किती व कोणत्या मजल्यावर खोल्या राखीव आहेत त्याचा तपशील

५)संस्थेची माहितीची सीडी/ऑडीटची प्रत/मिनीट बुक प्रत

जन माहिती अधिका-यांनी दि.३०.१२.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम

अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२२.१.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ११.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अिाका-यांकडे अर्ज करुन न्यू शिवनेरी सहकारी गृहनिर्माण संस्था लि.धारावी या संस्थेसंबंधीची माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी(अभियांत्रिकी विभाग) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास पी.ए.पी.बाबत अनुषंगिक माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१५.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८४०/०२६**

**श्री. अजितकुमार पंजाबी,**
**द्वारा - रमजान भटार चाळ, चाळ नं.२६३/५,**
**डॉ.आंबेडकर चौक,तक्यावार्ड,कुर्ला(प.),**
**मुंबई-४०००७०. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रमुखअभियंता(रस्ते वाह.व पूल),**
**६वा मजला,बृहन्मुंबई महानगरपालिका,विस्तारीत इमारत,**
**महापालीका मार्ग, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप प्रमख अभियंता(रस्ते/पुल)शहर,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, माटुंगा रेल्वे पुलाखाली,**
**गाळा नं.१ व ३, टी.एच.कटारीया मार्ग,**
**माटुंगा(प.), मुंबई-४०००१६. ....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अजितकुमार पंजाबी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.८.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

भायखळा रेल्वे स्थानक प्रवेशद्वारासमोरील पश्चिमेस गणेश हरी पारुडेकर मार्ग, सकीना मंझिल बिल्डिंग समोरील फूटपाथ भायखळा, मुंबई-४०००११ या ठिकाणी लाल पिवळया रंगाचे पेव्हर ब्लॉक बसविण्यात आले होते. याला एक वर्षदेखील झालेले नाही. ते पेव्हर ब्लॉक अनेक ठिकाणी निघून पडले आहेत व दबलेले आहेत. तसेच याला लागून डांबरी रस्तादेखील बनविलेला त्याच काळात होता. त्यालादेखील खड्डे पडलेले आहेत. तेव्हा या कामाबाबत कोणता ठेकेदार नेमलेला आहे. त्याची चौकी कोणत्या ठिकाणी आहे व हमी कामाचा कालावधी किती आहे तसेच यांची चौकी कुठे कशी आहे त्याचे भाडे डिपॉझीट किती आहे आणि टेंडर भरतेवेळेस सिव्हील इंजिनिअर व सुपरवायझर नेमलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतीसह माहिती मिळावी. पी.ओ.कॉपी मटेरियल टेस्ट रिपोर्ट व प्रत्येक कामातील एक वर्क ऑर्डरच्या सर्व प्रती छायांकित मिळाव्यात. आपल्या अभिलेखानोंदीप्रमाणे व सॅप

प्रणालीप्रमाणे लेखी माहिती देण्यात यावी. मी वयोवृद्ध असल्याकारणाने मला येण्या-जाण्याचा त्रास देऊ नये. आवश्यकता पडल्यास माझा प्रतिनिधी येऊ शकेल. आपण त्यांना मदत करावी ही विनंती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१०.९.२००९च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१८.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.१०.९.२००९च्या पत्रान्वये माहिती दिली असल्याने प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकाराचे प्रथम अपील फेटाळण्यात येत असल्याचे दि.२३.११.०९च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १२.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सिव्हील कामाच्या टेंडरची अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी तथा उप म्रमुख अभियंता(रस्ते) शहर यांनी अपीलकारास दि.१०.९.२००९ च्या पत्रान्वये माहिती पुरविण्यात आली असल्याचे द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१५.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८३४/०२६**

**श्री. वाय.सिंग एन.रजपूत,**
**४२, निलकमल निझामपुरा,**
**वडोदरा-३९०००२.**
**राज्य-गुजरात.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप-आयुक्त,**
**हिल रोड, बांद्रा(प.),**
**मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस उप-आयुक्त,**
**डी.एन.नगर विभाग,एस.व्ही.रोड,**
**अंधेरी(प.), मुंबई-४०००५३.** **....उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. वाय. सिंग एन. रजपूत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.१२.२००९ रोजी अर्ज करुन सन १९९९ मध्ये दाखल केलेली तक्रार,एफ.आय.आर.व या संदर्भातील चौकशी संबंधीच्या संबंधीत कागदपत्राच्या प्रती व इतर एकूण ६ मुद्यांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित वेळेत मिळाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले. यामुळे समाधान झले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ११.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मूळ अर्जामध्ये ओशिवरा पोलीस ठाणे, मुंबई येथे नोंदविलेल्या गु.नो.क्र.३३/९९ व

अदखलपात्र गु.ना.क्र.३६४५/१९९९च्या संदर्भात प्रश्नोत्तराच्या स्वरुपात माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२९.३.२०१०च्या पत्रानवये अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. अपीलकार द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता हजर नव्हते. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१५.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८२९/०२६**

**श्री. सुरेश कृष्णा पालांडे,**
**सी-२४०, दिंडोशी मनपा वसाहत,**
**ज.अ.कु.वै.मार्ग,**
**गोरेगाव(पूर्व), मुंबई-४०००६५.** .... **अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहायक आयुक्त,**
**सहाय्यक पालीका आयुक्त, पी/उत्तर यांचे कार्यालय,**
**लिबर्टी गार्डन,मामलेदार वाडी,मालाड(प.),मुंबई-४०००६४.**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी,**
**सहाय्यक पालीका आयुक्त, पी/उत्तर यांचे कार्यालय,**
**लिबर्टी गार्डन,मामलेदार वाडी,मालाड(प.),मुंबई-४०००६४.** **....उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. सुरेश पालांडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.७.५.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)२०००साली देण्यात आलेल्या फोटोपास पावतीचे महत्व काय, पावती असतांना फोटोपाससाठी अर्ज मकेल्यानंतर किती दिवसात भेटतो याची माहिती द्यावी.

२)ए ते एम वार्डातील वितरीत फोटोपास धारकांची संख्या किती त्यांनी सादर केलेले कागदोपत्राची छायांकित प्रत देण्यात यावी.

३)दिंडोशी मनपा वसाहत जागेचे मूल मालकाची माहिती द्यावी.

४) वसाहत संबंधित तक्रार करीता नगरसेवकास वार्ड कार्यालयाच्या नावे अर्ज/तक्रार देता येत असल्यास, नसल्यास माहिती द्यावी.

५) दिंडोशी मनपा वसाहतीच्या ए ते एम वार्डातील पात्र रहिवाश्यांची यादी देण्यात यावी.

अपीलकारास निश्चीत काय माहिती हवी आहे याबाबत अर्थबोध होत नाही. तरी प्रत्यक्ष येऊन भेटावे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१४.५.०९च्या पत्रान्वये कळविले. यामुळे

समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.३०.६.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती १५ दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२४.८.२००९ रोजी आदेश पारित केले.प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ११.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन दिंडोशी म.न.पा.वसाहत बाबत, फोटोपासबाबत, परिशिष्ट II बाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. प्रथम अपीलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशांचे पालन केले नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१४.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८३२/०२६**

**श्री. सी.पी.सिंग(ॲडव्होकेट),**
**०२,क्लासीक पॉवर रेसिडेन्सी,**
**गुरु निवास सबवेच्या समोर,**
**रोड नं.०२,टी.पी.एस.६,**
**सांताक्रुझ(प.), मुंबई-४०००५४.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी,**
**ठाणे जिल्हा किंवा जिल्हाधिकारी ठाणे जिल्हा,**
**जिल्हाधिकारी कार्यालय-ठाणे,**
**ठाणे.** **....उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. सी.पी.सिंग यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१.७.२००९ रोजी अर्ज करुन तहसीलदार वसई कार्यालयात निवडणूक विभागात श्री.प्रकाश पाटील यांची नेमणूक, निवडणूकीवेळी करण्यात येते याबाबत एकूण ८ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही यामुळे अपीलकाराने दि.८.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ११.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन श्री.प्रकाश पाटील यांच्या निवडणूक विभागातील नेमणूकीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास

माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१४.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८००/०२**

**श्री. संजय पी.कोटी,**
**रुम नं.बी-६४७, बेथलगम चाळ,**
**धारावी, मुंबई-४०००१७.** ..... **तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा डायरेक्टरेट ऑफ टेक्नीकल एज्युकेशन,**
**१ला मजला, वर्ल्ड बँक प्रोजेक्ट इमारत, खेरवाडी, बांद्रा,**
**मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. संजय कोटी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२३.६.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. १३.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. तसेच गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.५.७.२००८ रोजी अर्ज करुन पॉलीटेक्नीक कॉलेज सोडल्याचे प्रमाणपत्र आणि एस.एस.सी.ची गुणपत्रिका मिळण्याची मागणी केली होती. त्यासाठी दोन वर्षाची फी भरण्याबाबत तक्रारदारास सांगण्यात आले. या संदर्भात तक्रारदाराने संचालक, पॉलीटेकनीक यांचेकडे चौकशी केली असता फी भरण्याबाबत बोर्डाचे परिपत्रक असल्याचे सांगितले. विद्यार्थ्याने दोन वर्षाची फी भरल्यानंतर लीव्हींग सर्टिफिकेट, गुणपत्रिका आणि इतर कागदपत्र देणेबाबत बोर्डाच्या परिपत्रकान्वये सूचना दिल्या असल्याचेही गैरतक्रारदाराने तक्रारदारास सांगितले. तक्रारदाराने परिपत्रकाची मागणी केली होती. परंतू गैरतक्रारदाराने परिपत्रकाची प्रत तक्रारदारास दिली नाही. तक्रारदाराने वारंवार पाठपुरावा केल्यानंतर सात महिन्यानंतर त्यांना लीव्हींग सर्टीफिकेट,गुणपत्रिका इत्यादी कागदपत्र प्राप्त झाली. याबाबत तक्रारदाराने तक्रारीत सविस्तर कथल केले आहे.

तक्रारदाराचा दि.५.७.०८चा अर्ज गैरतक्रारदाराने दि.८.७.०८ रोजी महाराष्ट्र राज्य बोर्डाकडे हस्तांतरीत केला. सदर प्रकरणी महाराष्ट्र राज्य बोर्डाने तक्रारदाराचा अर्ज संचालक, तांत्रिक शिक्षण विभागाच्या मुंबई विभागीय कार्यालयाकडे पाठविला. संचालक, तांत्रिक शिक्षण कार्यालयाने

तक्रारदाराचा अर्ज प्रलंबित ठेवला असा तक्रारदाराने तक्रारीत मुद्दा उपस्थित केला आहे. संचालक, तांत्रिक शिक्षण कार्यालयाच्या बांद्रा येथील मुंबई विभागाच्या कार्यालयात तक्रारदाराने भेट दिली असता अपीलकारास पॉलीटेक्नीक कॉलेजकडून माहिती मिळेल असे सांगण्यात आले. पॉलीटेक्नीक ही खाजगी संस्था असल्याने ते सहकार्य करत नाहीत. मुंबई विभागीय कार्यालयाकडून माहिती मिळावी अशी तक्रारदाराने मागणी केली असता त्याकरीता काही कालावधी लागेल असे सांगितले. यामुळे तक्रारदाराने दि.२०.१०.०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. म्हणून तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

या माहितीच्या अधिकारातील अर्जाची गैरतक्रारदार, प्रथम अपीलीय अधिकारी दखल घेत नाहीत, माहिती पुरवित नाहीत अशी तक्रारदाराची तक्रार आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, संचालक, तंत्रशिक्षण कार्यालयातील गैरतक्रारदाराने सदर प्रकरणी तक्रारदाराने मागणी केलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत तक्रारदारास पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१५.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८०१/०२**

**श्री. संजय रामचंद्र शिर्के,**
**५४,रिज रोड, शिवा सदन,**
**सागर दिप, मलबार हिल,मुबइ-४०००06.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार(अतिक्रमण व निष्कासन),**
**कुलाबा विभाग यांचे कार्यालय,**
**डी.डी.बिल्डिंग, ४था मजला, जुने जकात घर फोर्ट,**
**मुंबई-४००००१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. संजय रामचंद्र शिर्के यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२०.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. १३.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१२.१०.०७ रोजी अर्ज करुन मलबार हिल विभागातील फोटोपास संदर्भातील माहिती मागीतली होती. गैरतक्रारदार यांनी तक्रारदारास खालीलप्रमाणे दि.३१.१०.०७च्या पत्रन्वये उत्तर पाठविले.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २(च) अन्वये माहिती याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज,ज्ञापने, ई-मेल,अभिप्राय, सूचना, पसिध्दी पत्रके, आदेश, रोजवह्या,संविदा,अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमान(मॉडेल) कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधार सामग्री, आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकालाशी संबंधित माहिती याचा समावेश होतो.

असे असतांही आपण प्रश्नोत्तरात माहिती मागीतली आहे. अशाप्रकारची माहिती देण्याची तरतूद विषयाधीन अधिनियमात असल्याचे दिसत नाही. तरी उपरोक्त नमूद बाबींची माहितीची कागदपत्रे मागितल्यास देण्याची तरतूद ठेवली आहे.

गैरतक्रारदाराने दिलेल्या उत्तराने समाधान झाले नाही. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार  दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविण्याची तयारी दर्शविली. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने अपीलकारास हे आदेश प्राप्त   झाल्यापासून१५ दिवसाचे आत माहिती पुरवावी. तक्रारदाराने माहितीपोटी आवश्यक तेवढे शुल्क भरुन कार्यालयातून गैरतक्रारदाराकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी.

**<u>आदेश</u>**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१५.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/७८९/०२**

**ॲड.श्री. दयानंद द. येंगडे,**
**१०३, मनगंगा अपार्टमेंट,**
**लोकमान्य नगर पाडा नं.३,**
**ठाणे(पश्चिम). ..... तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा प्रभाग अधिकारी(रायलादेवी प्रभाग समिती),**
**ठाणे महानगरपालिका, महानगरपालिका भवन,**
**डॉ.अल्मेडा रोड, चंदनवाडी, पाचपाखाडी,ठाणे-४००६०२. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार ॲड.श्री. दयानंद येंगडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१८.२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. १३.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१२.६.०७ रोजी अर्ज करुन ॲड.चंद्रशेखर एस.थोरे यांनी दत्तात्रय पुंडलीक येंगडे यांच्यातर्फे दि.१६.७.०५ रोजी आवक क्र.१५०३१ द्वारे दिलेल्या नोटीसीत केलेल्या तक्रारीप्रमाणे कार्यालयाकडून काय कारवाई करण्यात आली किंवा कारवाई केली नसेल तर कारवाई का करण्यात आली नाही याबाबतचा तपशिल देण्याची मागणी केली आहे.

प्रभाग अधिकारी रायलादेवी प्रभाग समिती ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी दि.४.५.०७ रोजीच्या पत्रान्वये खुलासा देऊन अपीलकाराने तक्रार केलेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई होण्यासाठी एक महिन्याची मुदतवाढ घेतली होती. ती मुदत दि.४.६.०७ रोजी संपुष्टात येऊनही प्रभाग अधिकारी रायलादेवी प्रभाग समिती,ठाणे महानगरपालिका ठाणे यांच्या कार्यालयाकडून अनधीकृत बांधकामावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही असा तक्रारदाराने तक्रारीत मुद्दा उपस्थित केला आहे.

गैरतक्रारदार तथा प्रभाग अधिकारी रायलादेवी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका,ठाणे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त ठाणे महानगरपालिका,ठाणे यांनी तक्रारदाराने तक्रार केलेल्या अनधीकृत बांधकामावर कारवाई केली नाही. तक्रारदारास माहिती पुरविली नाही. तक्रारदाराच्या अपार्टमेंटला लागून जीना बांधकाम अवैधरित्या करण्यात आले आहे याबाबत तक्रारदाराने तक्रार केली होती. सदर अवैध बांधकामावर कारवाई करुन तक्रारदारास अद्याप माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, या प्रकरणी गैरतक्रारदार तथा प्रभारी अधिकारी रायलादेवी प्रभाग समिती,ठाणे महानगरपालिका,ठाणे यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१५.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/७९८/०२**

**श्री. चंद्रकांत जयराम दौंड,**
**५०१,कावेरी अपार्टमेंट,**
**एच.डी.एफ.सी.बँकेच्या मागे,**
**संतोषी माता रोड,कल्याण(प.),**
**जि.ठाणे-४२१ ३०१. ..... तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी,**
**महसूल व वन विभाग(कार्यासन ई-९),**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. चंद्रकांत जयराम दौंड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१६.२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. १३.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते, तक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२४.१०.०७ रोजी अर्ज करुन

१)कार्यासन ई-९ महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी तक्रारदाराच्या प्रकरणी समाजकल्याण, मंत्रालय यांचेकडे जे जातीबाबत पत्र पाठविले त्या पत्राची प्रत

२)समाजकल्याण मंत्रालयाने कार्यासन ई-९ महसूल व वन विभाग यांना पाठविलेल्या अभिप्रायाची प्रत मागीतली होती. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती गैरतक्रारदाराने विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

नायब तहसिलदार संवर्गातील वेतनश्रेणी निश्चीत करण्याबाबतची अपीलकाराची फाईल कार्यासन ई-९ यांचेकडे दि.२०.४.२००१ पासून प्रलंबित असल्याचा मुद्दा तक्रारदाराने तक्रारीत उपस्थित केला आहे. तक्रारदाराच्या जाती वैधता प्रमाणपत्राबाबत समाजकल्याण मंत्रालयाने शंका काढली म्हणून त्याचे निरसन करण्यासाठी तक्रारदाराने दि.२४.१०.०७, दि.२९.११.०७ व दि.५.१.०८ रोजी अर्ज/अपील

अर्ज करुन वर नमूद केलेल्या पत्राची मागणी केली होती. सदर माहिती गैरतक्रारदाराने विहित कालावधीत तक्रारदारास पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत तक्रारदारास कार्यासनात उपलब्ध असलेली माहिती पुरवावी.

## आदेश

**तक्रार अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१७.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८०२/०२**

**श्री. किर्ती मेहता,**
**मेहुल रिलेटर्स प्रा.लि.,**
**श्रीनाथ,बजाज रोड, विलेपार्ले(प.),**
**मुंबई-४०००५६.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),**
**सहाय्यक आयुक्त बी.एम.सी. यांचे कार्यालय के/पश्चिम,**
**के/पश्चिम वार्ड ऑफीस,२रा मजला,पालीराम पथ,**
**बेस्ट स्टेशन समोर,एस.व्ही.रोड,अंधेरी(प.),**
**मुंबई-४०००५८.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. किर्ती मेहता यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१.३.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. १३.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते, तक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१४.१.०८ रोजी अर्ज करुन सहाय्यक अभियंता(इमारती व कारखाने) के/पश्चिम विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका अंधेरी(पश्चिम) यांना क्र.एफबीएस/एस/३०७/४२२ दि.६.९.०७ रोजी मुंबई अग्नीशमन केंद्राने पाठविलेल्या अहवालाची प्रत मागीतली होती. मुंबई अग्निशमन केंद्राने कोणताही अहवाल कार्यालयाकडे पाठविलेला नाही अशी गैरतक्रारदाराने दि.१४.२.०८ च्या पत्रान्वये तक्रारदारास माहिती पुरविली. अपीलकार हे विकासक आहेत. त्यांनी सरोजनी रोड, विलेपार्ले(पश्चिम), मुंबई-५६ येथील पांडया हाऊस ही मालमत्ता खरेदी केली आहे. सुमारे ९० वर्षापूर्वीची ही इमारत असून मोडकळीस आली आहे. सदर जुनी इमारत पाडून अपीलकारास मालमत्ता पुर्नविकसित करावयाची आहे. सहाय्यक अभियंता(इ.व का.)के/पश्चिम विभाग यांचेकडून कारवाई केली जात नाही. यामुळे अपीलकारास मालमत्तेचा पुर्नविकास करता येत नाही असे तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगाच्या निदर्शनास आले. जुनी मोडकळीस आलेली इमारत पाडून

त्या  मालमत्तेचा पुनर्विकास करण्यास परवानगी देण्याची बाब असल्याने सदर बाब माहितीच्या अधिकारात मोडत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१७.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/७९३/०२**

**श्री. जयंत अनंत अभ्यंकर,**
**अभ्यंकर वाडा, समृध्दी नर्सरीच्या मागे,**
**टिळक चौक, कल्याण(प.),**
**जि.ठाणे. ..... तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा भुमी शाखा,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. जयंत अनंत अभ्यंकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२७.२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. १३.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते, तक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.९.८.०७ रोजी अर्ज करुन मौजे कल्याण येथील स.क्र.१४२ पैकी क्षेत्र ८९६ चौ.मी.बाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे माहिती मागीतली होती. आदेशाच्या प्रती तयार करण्यात आल्या असून माहितीपोटी एकूण रु.५४/- इतके शुल्क प्राधिकरणाकडे भरणा करावे म्हणजे आदेशाच्या प्रती रजिस्टर पोस्टाने पाठविणे सोईचे होईल असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.१८.१०.०७च्या पत्रान्वये कळविले. त्यानुसार तक्रारदाराने मनीऑर्डरने रक्कम गैरतक्रारदाराकडे पाठविली. प्राधिकरणास भरावयाची रक्कम ही रोखअथवा पे-ऑर्डर,डिमांड ड्राफ्ट अन्वये भरणा केली जाते. तक्रारदाराने रक्कम मनी ऑर्डरने पाठविली आहे. सदर रक्कम प्राधिकरणाकडे भरणा झाली आहे किंवा कसे हे पडताळून पहाण्यासाठी गैरतक्रारदाराने तक्रारदाराकडे पक्क्या पावतीची छायाप्रत मागीतली. तक्रारदाराने मनी ऑर्डरने भरणा केलेल्या रकमेच्या पावतीची व ती रक्कम प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या पोच पावतीची छायाप्रत दि.२२.१.०८ च्या पत्रासोबत गैरतक्रारदारास उपलब्ध करुन दिली. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने राज्य

माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीतील सुनावणीकरीता गैरतक्रारदार तथा उपभूमी व्यवस्थापक श्री.एस.पी.कर्णिक हे हजर होते. तक्रारदाराने मागणी केलेली कागदपत्र तक्रारदारास देण्यात आली असल्याचे तक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. तक्रारदारास पुरविलेल्या माहितीच्या प्रती गैरतक्रारदाराने आयोगास सादर केल्या. यावरुन सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते.या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:१७.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८२३/०२**

**श्री. जेम्स लोबो,**
**संगम को.ऑप.हौ.सोसायटी,**
**मणीपाडा, विद्यानगरी समोर,**
**कालिना,सांताक्रुझ(पूर्व),**
**मुंबई-४०००९८.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. जेम्स लोबो यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२५.२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. १४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.५.१०.०७ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)पी.ए.पी.फ्लॅट संदर्भात माहिती देणे.फ्लॅट हे कोणत्या लोकांना मंजूर करण्यात आले आहेत याची तसेच कुठल्या विभागातील लोकांना देण्यात आलेले आहेत ती माहिती देणे

२) एस.आर.ए.योजनेतील समोरील विक्री इमारत (टॉवर)यामध्ये तळमजल्यावर ५ कार्यालय २२५ स्क्वेअर फूट (एस.आर.ए.) योजनेतील असतांना ते कार्यालय विक्री इमारत(टॉवर)मध्ये कसे मंजूर करण्यात आले याची माहिती देणे

३)सदर एस.आर.ए.इमारत व विक्री इमारत यांचे खालील ना-हरकत प्रमाणपत्र (एन.ओ.सी.)संबंधी माहिती देणे इ

१)मुंबई म.न.पा.ना-हरकत प्रमाणपत्र २)अग्निशमन दल ना-हरकत प्रमाणपत्र

३)एअरपोर्ट ना-हरकत प्रमाणपत्र ४)मुंबई पो.आयुक्त कार्यालय ना-हरकत प्रमाणपत्र

५)सुची क्र.II संपूर्ण माहिती तसेच उपरोक्त संदर्भ व विषयाबाबत असलेली इ. माहिती देण्यात यावी.

गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२०.११.०७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. तक्रारदारास सदनिका मिळावी म्हणून माहिती मागीतली आह. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदार तथा सहाय्यक अभियंता श्री.संजय निर्मल यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत तक्रारदारास परिशिष्ट II बाबत नवीनतम/अद्यावत माहिती प्राप्त करुन तक्रारदारास पुरवावी.

## आदेश

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१७.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८२२/०२**

**श्री. संजीव कन्वर,**
**१४२,अॅटलांटा बिल्डिंग, १४वा मजला,**
**नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा असिस्टंट अॅसेसर आणि कलेक्टर,**
**बृहन्मुंबई महानगर पालिका जी(नॉर्थ) वार्ड ऑफीस,**
**रुम नं.२७, हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर(प.), मुंबई-४०००२८.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. संजीव कन्वर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२५.२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. १४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१०.१२.०७ रोजी अर्ज करुन गोपाळ भुवन वाडी, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर(प.), या मालमत्तेचे मुंबई महानगरपालिकेने सन १९६५, १९७५, १९८५, १९९५ मध्ये निरिक्षण केले. सदर निरिक्षणाच्या विवरणपत्राच्या प्रतींची मागणी केली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.३०.१.२००८ च्या पत्रान्वये सन १९९५-९६ च्या निरिक्षणाच्या विवरणपत्रची प्रत पुरविली. गैरतक्रारदाराने तक्रारदारास अपूर्ण माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकाडे तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराने तक्रारदारास अपूर्ण माहिती पुरविली आहे. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत तक्रारदारास सन १९६५,१९७५ व २९८५ मध्ये गोपाळ भूवनवाडी मालमत्तेच्या केलेल्या निरिक्षणाच्या विवरणपत्राच्या प्रती तक्रारदारास पुरवाव्यात.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१७.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८२७/०२**

**श्री. प्रदीप शिवलकर,**
**५४,रतन माई महाल,**
**१९३, लेडी जमशेदजी रोड,**
**माहीम, मुंबई-४०००१६. ..... तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,(इ.प्र.) शहरे-III,**
**ई वार्ड, म्युनिसिपल कार्यालय, ३रा मजला,**
**१० एस.के. हफीझुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई-४०० ००८. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. प्रदीप शिवलकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.११.२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. १४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२६.१२.०७ रोजी अर्ज करुन १९३ लेडी जमशेदजी रोड, माहिम, मुंबई-१६ येथील रतन माई महल, सर्व्हे क्र.५/४६७ माहिम,उत्तर विभाग येथील मालमत्तेच्या विकासाबाबत मेसर्स साई सद्‌गुरु विकासक यांनी प्रस्ताव सादर केला त्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदरहू कागदपत्र उपलब्ध नाहीत असे गैरतक्रारदाराने दि.८.१.०८ च्या पत्रान्वये तक्रारदारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तत्कालीन गैरतक्रारदार तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र.)शहर-३ यांनी सदर प्रकरणी कार्यालयाचे पत्र क्र.ईईबीपी/५६७ /एमआरआाय/शहर-३ दि.३०.१.०८ अन्वये सदर प्रकरणाची संबंधीत कागदपत्र उपलब्ध नाहीत. या विषयी जर तक्रारदाराकडे धारिणी क्रमांक उपलब्ध असतील तर ते कळविण्यासाठी तक्रारदारास गैरतक्रारदाराने दि..८.१.०८ च्या पत्रान्वये कळविले होते. ज्यायोगे सदरहु कागदपत्रे शोधण्यात येतील. कागदपत्र उपलब्ध झाल्यास माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे तक्रारदारास

गैरतक्रारदाराने कळविले असल्याची बाब विद्यमान गैरतक्रारदार यांनी तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. तसेच कार्यालयाच्या धोरणानुसार प्रत्येक भूखंडावरील मंजूर केलेले आराखडे व त्याबाबतची कागदपत्रे यांचा धारिका क्रमांक हा सर्वेक्षण नकाशावर भूकर क्रमांकावर नोंदलेला असतो, की जेणेकरुन शहर भूकर क्रमांक माहित असल्यास त्यावर नोंदविलेला धारिका क्रमांक उपलब्ध होऊ शकेल. तक्रारदारानी कळविलेल्या भूकर क्रमांकावर धारिणी क्रमांक उपलब्ध नाही. म्हणून जर त्यांच्याकडे सदर भूकर क्रमांकाचा धारिणी क्रमांक माहित असल्यास आणि धारिणी उपलब्ध असल्यास माहिती देण्यात येईल असे तक्रारदारास कळविले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन अर्जावर गैरतक्रारदाराने तक्रारदारास समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:१७.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/६६४/०२**
**/३२२/**

**श्रीमती नसीमा झेड. मर्चंट,**
**१४/३, जुबीली मेन्शन,**
**नवरोजी हिल रोड नं.१,**
**मुंबई-४००००९.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी,**
**इस्टेट विभाग,म्युनिसिपल कॉर्पोरेशन,**
**श्री छत्रपती शिवाजी मार्केट इमारत,पाल्टन रोड,**
**मुंबई-४००००१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्रीमती नसीमा मर्चंट यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. ७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते, गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन सदनिका क्र.६०-६१ हस्तांतरीत केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने अनियमिततेबाबत तक्रारदारास माहिती पुरवावी. रक्कम अदा केल्याबाबत रकमेचा तपशील द्यावा असे आयोगाने दि.२५.८.०९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानुसार गैरतक्रारदाराने आयोगाच्या आदेशाचे पालन केले. रक्कम अदा केल्याबाबतचा सविस्तर तपशील दिला आहे. परंतू तक्रारदाराचे यामुळे समाधान झ ाले नाही. याकरीता माहितीच्या अधिकारात आयोगास काही करता येत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार प्रकरण बंद करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१७.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८१८/०२**

**श्री. के.बी. कामत,**
**३/३१, जय विजय सोसायटी,**
**सहार रोड, मुंबई-४०००९९. ..... तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई(इ. व का.),**
**के/पश्चिम वार्ड ऑफीस, अंधेरी(पूर्व),**
**मुंबई. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.के.बी. कामत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२५.१.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते, तक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१८.६.०७ रोजी अर्ज करुन सी.टी.सर्व्हे क्र.१२६-इ विलेपार्ले(पूर्व)सहार रोड,मुंबई-९९येथील प्लॉट पुनर्विकासित करण्याकरीता मंजूर नकाशा आणि आ.ओ.डी.बाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने सदर प्रकरणी तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यासाठी तक्रारदाराने प्रथम अपील अथवा द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने सदर प्रकरणी तक्रारदारास निःशुल्करित्या माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पोस्टाने माहिती पाठवावी.

**<u>आदेश</u>**

**तक्रार प्रकरण बंद करण्यात येत आहे.**

**मुंबई (रामानंद तिवारी)**
**दिनांकः१७.५.२०१० राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८२५/०२**

**श्री. आर.एस.स्वामी,**
**६०१/ए, हरीओम अपार्टमेंट,**
**एस.व्ही.रोड, बोरीवली(प.),**
**मुंबई-४०००९२.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,**
**उत्तर नियंत्रण कक्ष, ठाकुर व्हीलेज,**
**कांदीवली(पूर्व), मुंबई-४००१०१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. आर.एस.स्वामी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१०.२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते, तक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.८.१.०८ रोजी अर्ज करुन हरी ओम संस्थेतील सदस्य श्री.बी.एम.शहा यांनी त्यांचे सदनिकेमध्ये ठेवलेल्या पेईंग गेस्ट संबंधात चौकशी व कारवाईची मागणी केली होती. गैरतक्रारदारास चौकशी व कारवाईचे अधिकार नसतात म्हणून तक्रारदाराचा अर्ज तक्रारी स्वरुपाचा असल्याने बोरीवली पोलीस ठाण्यास चौकशी व कारवाईकरीता त्याच दिवशी म्हणजेच दि.९.१.०८ रोजी पाठविला. त्यांचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये बसत नसून तो तक्रार अर्ज आहे. त्याबाबत तक्रारदारास यु.पी.सी.पोस्टाने दि.१२.१.०८ रोजी लेखी पत्र पाठवून कळविण्यात आलेले आहे. तक्रारदाराने प्रथम अपील अथवा द्वितीय अपील केलेले नाही असा गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. गैरतक्रारदाराने विसंगत, असंबंधीत माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकाडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी तक्रारदारास गैरतक्रारदाराने दि.२८.५.०७ च्या पत्रान्वये माहिती पुरविली असल्याचे तक्रारीतील कागदपत्रावरुन समजते. तक्रारदाराने दि.२८.५.०७च्या पत्रची प्रत तक्रारीसोबत

जोडलेली आहे. तक्रारदार सदर उत्तराची जोडणी करत नाही. अशा परिस्थितीत माहितीचा अधिकार काही करु शकत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१७.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८२६/०२**

**श्री. रामचंद्र जवाहर यादव,**
**वर्मा टिंबर ट्रेडींग कंपनी,**
**अचानक नगर,शंकर मंदिर रोड,**
**मुंब्रा, जि.ठाणे-४००६१२. ..... तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,**
**तलाठी कार्यालय, सजा-शिल, कल्याण फाटा,**
**ता.जि.ठाणे. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. रामचंद्र यादव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२६.२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते, तक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२४.१०.०७ व २६.१०.०७ रोजी अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतली होती.

अर्जदार रामचंद्र यादव व ५ इतर यांनी श्री.अंकुश गणपत पाटील यांचे पुढाकाराने मौजे शिळ-सजा शिळ येथील श्री.चंद्रकांत गणपत पाटील रा.डावेळ,ता.ठाणे,जि,ठाणे यांचे मालकीची स.नं.१७३,पै.५६-३ आर मधील क्षेत्र २४२८-०० चौ.वार(२०३० चौ.मी.)विकत घेतली व प्लॉट पाडून प्लॉट नं.४अंदाजे ५७० चौ.वार अर्जदार व इतर ५ यांचे नाव केली. सदर बाबतीत खरेदीखत करुन दुय्यम निबंधक, ठाणे यांचे कार्यालयात ११५/९३ २७ एप्रिल,१९९३ नोंद केले आहे. सदर माहिती १९९३ पासून तलाठी सजा शिळ यांचेकडे देण्याचा प्रयत्न कला असतांना त्यांनी मूळ खरेदीखत आणल्याशिवाय अशी नोंद मी करणार नाही. येणेप्रमाणे अर्जदाराने दि.३१ मे,२००७ चे सुमारास तलाठी सजा-शिळ यांचेनावे रजिस्टर पोष्टाने पाठविले व त्यांना सदर खरेदीखताप्रमाणे सर्व जणांची ७/१२ चे वर नोंदीचे विनंती करण्यात आली. आज मितीस त्यांचेकडून काहीही उत्तर अथवा नोंद झालेला ७/१२च्या उतारा ज्यामध्ये आमची नावे आहेत मिळाला नाही. याबाबत अनुंषंगिक ३ मुद्यांवर माहिती मागीतली होती.

गैरतक्रारदाराने मागीतलेली माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकाडे तक्रार दाखल केली. तक्रारदाराने खरेदी केलेली जमिन ७/१२ वर करण्याचे तलाठी सजा शिळ ता.जि.ठाणे यांनी नाकारले असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतलीहोती. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी तहसिलदार यांनी आवश्यक ती माहिती प्राप्त करुन तक्रारदारास हे आदेश प्रापत झाल्यापासून ३० दिवसांचे आत माहिती पुरवावी.

## आदेश

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१७.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८२८/०२**

**श्रीमती पल्लवी ह. शिंदे,**
**३/५१,बी.आय.टी.बिल्डिंग,**
**बेलासिस रोड, मुंबई सेंट्रल,**
**मुंबई-४०००0८.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
**दि चिल्ड्रेन्स एड् सोसायटी,**
**८३, टि.एच.कटारिया मार्ग,**
**माटुंगा रोड,पश्चिम रेल्वे समोर,माहिम,**
**मुंबई-४०००१६.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्रीमती पल्लवी शिंदे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.५.२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते, तक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१९.१२.०७ रोजी अर्ज करुन श्री.के.बी. पुरी,अधीक्षक यांनी प्रवेशिताच्या महिला पालकावर अत्याचार केल्याचे खरे आहे काय, याबाबत कार्यालयाने काय कारवाई केली याबाबत अनुषंगिक एकूण ५ मुद्यांवर माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास खालीलप्रमाणे दि.२९.१२.०७ च्या पत्रान्वये उत्तर दिले.

मागीतलेली माहिती दि चिल्ड्रेन्स एड् सोसायटी,८३, टि.एच.कटारीया मार्ग, माटुंगा रोड(पश्चिम रेल्वे)समोर, माहिम,मुंबई-४०००१६ या संस्थेशी संबंधित आहे. सदर संस्था स्वयंसेवी अशासकीय संस्था असून या संस्थेचा कारभार संस्थेच्या घटनेनुसार संस्था स्वतः करते व सदर संस्थेत कार्यरत असलेले कर्मचारी हे त्या सुस्थेचे कर्मचारी आहेत. त्यासाठी आपला दिनांक १९.१२.२००७ चा मूळ अर्ज कोर्ट फी स्टँप रु.१०/- सह व सहपत्रांसह मुख्य अधिकारी, दि चिल्ड्रेन्स एड् सोसायटी,८३,टि.एच.कटारीया मार्ग, माटुंगा रोड,पश्चिम रेल्वे समोर, माहिम, मुंबई-१६ यांचेकडे

अपेक्षित माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पाठवित आहे. यासंदर्भातील पुढील पत्रव्यवहार आपण परस्पर त्यांचेकडे करावा.

चिल्ड्रेन्स एड् सोसायटी, मुंबई येथील गैरतक्रारदार तथा मुख्य अधिकारी यांनी तक्रारदारास माहिती नाकारली. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकाडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांनी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले की, तक्रारदारास मागणीनुसार माहिती पुरविण्यात आली. यावरुन सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते.या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१७.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८१३/०२**

**श्री.सदानंद सिताराम चव्हाण,**
**२७१, बी,बाळगोविंद चाळ, खो.नं.१५,**
**तळमजला, डॉ.दादासाहेब भडकमकर मार्ग,**
**ग्रँट रोड, मुंबई-४०००0७.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,६४३-मुख्य,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. सदानंद चव्हाण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१८.२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते, तक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१०.१.०८ रोजी अर्ज करुन महाराष्ट्र शासनाद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण धोरण संमत झाले आहे का? त्याची अंमलबजावणी कधी पासून केली जाणार आहे, अशी एकूण १५मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(एफ)मध्ये नमुद व्याख्येनुसार फक्त अभिलेख देण्याची तरतूद आहे. कोणत्याही प्रश्नावर उत्तर देणे, स्पष्टीकरण, निराकरण, भाष्य वा खुलासा करणे माहितीच्या अधिकारात अभिप्रेत नाही असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.५.९.०८ च्या पत्रान्वये कळविले आहे. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास अर्जावर समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१८.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८११/०२**

**श्री. राजेंद्र मार्तंडराव शिंदे,**
**आर.एच.२, ए-१५,सेक्टर-६,**
**वाशी, नवी मुंबई-४००७०३.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा एस.पी.आय.ओ.,**
**मेट्रोपॉलीटन कमिशनर यांचे कार्यालय,**
**एम.एम.आर.डी.ए., बांद्रा कुर्ला कॉँप्लेक्स,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. राजेंद्र शिंदे,सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.७.१.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२०.११.०७ रोजी अर्ज करुन सेवानिवृत्तीनंतरच्या देय रक्कमांवर तीन वर्षाचे व्याज व इतर अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकाडे तक्रार दाखल केली. तक्रारदाराच्या जातीदाव्याबाबत कार्यालयाने शासनाकडे पत्र व्यवहार केला होता. तक्रारदाराची प्रथम नियुक्ती आरक्षीत पदावर झाली नव्हती. त्यांना सेवानिवृत्ती लाभ देणे सयुक्तीक होईल असे दि.५.४.०७ च्या पत्रान्वये शासनाने प्राधिकरणास कळविले. त्यानंतर प्राधिकरणाने तक्रारदाराचे सेवानिवृत्ती प्रलंबीत लाभ त्यांना विलंबाच्या लाभासह देणेबाबत दि.२३.४.०७ रोजी आदेश काढले व सर्व सेवानिवृत्ती लाभ तक्रारदारास प्रदान केले असल्याचे गैरतक्रारदाराने आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. तसेच सदर प्रकरणी तक्रारदारास सेवानिवृत्ती लाभ देण्यास झालेल्या विलंबाबाबत संबंधीत कार्यालयीन टिप्पणी आयोगास सादर करुन याबाबत आयोगासमोर सविस्तर खुलासा केला. तक्रारदाराने मागीतलेली माहिती, अंशदायी भविष्य निर्वाह निधी विनिमय १९७९ मराठी/इंग्रजी छायाप्रत व तक्रारदारास त्यांच्या देय रकमा उशीरा

देण्यात आल्यामुळे त्या सर्व रकमांवर ८% दराने एकूण रु.२,८२,०००/- इतकी व्याजाची रक्कम तक्रारदारास अदा करण्यात आली असेही गैरतक्रारदाराने आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१८.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८६१/०२६**

**श्री. इंद्र बहादूर शर्मा,**
**१०,शर्मा चाळ, अंधेरी कुर्ला रोड,**
**कृष्णा नगर, मरोळ नाका,**
**अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००५९. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप जिल्हाधिकारी(अति./निष्का.),**
**उप जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,**
**खो.नं.६५,गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार(अति./निश्का,),**
**पारशनाथ शर्मा चाळ, मरोळ नाका,**
**कृष्णा नगर, ए.के.रोड, अंधेरी(पूर्व),**
**मुंबई-४०००५१. ....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. इंद्र बहादूर शर्मा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३.१०.२००९ रोजी अर्ज करुन न.भू.क्र.८२३,८२३/१ ते १७० मरोळ गाव गलिच्छ वस्ती घोषित आहे किंवा कसे याबाबत माहिती मागीतली होती. कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयात येऊन संबंधीत मूळ नस्तीची पहाणी करुन आवश्यक असलेल्या माहितीच्या कागपत्रांची निवड करावी. त्यानुसार त्वरित कागदपत्राच्या प्रती पुरविण्यात येतील असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.३.२०१० च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.३०.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास १० दिवसाचे आत माहिती देणेबाबत दि.१८.२.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १७.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन न.भू.क्र.८२३,८२३/१ ते १७० मरोळ गाव गलिच्छ वस्ती घोषित आहे किंवा कसे याबाबत माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी उप जिल्हाधिका-यांनी अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचेकडे दि.१७.३.२०१० रोजी अहवाल पाठविला असल्याचे जन माहिती अधिकारी श्री.डी.डी. पारधी यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास अहवालाची प्रत पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१८.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८४२/०२**

**श्री. विलास मनोहर सावंत,**
**२६/५२७, तेजस नगर,**
**रेनॉल्ड्स रोड, वडाळा(पूर्व),**
**मुंबई-४०००२७.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा चिफ अकाऊंट्स ऑफीसर,**
**मुंबई हाऊसिंग अँड एरीया डेव्हलपमेंट बोर्ड,**
**म्हाडा, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. विलास सावंत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.३१.१.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१८.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२२.११.०७ रोजी अर्ज करुन मुंबई गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास मंडळ कार्यालयातील मुख्य लेखा अधिकारी श्री.विजय साळुंके यांनी माहिती पुरविली नसल्याने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीवरील सुनावणीकरीता गैरतक्रारदार श्री.विजय साळुंके आणि श्री.विलास लोहार हे उपस्थित होते. गैरतक्रारदारानी तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर असे प्रतिपादन केले की,तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली आहे. तक्रारदार तक्रारीवरील सुनावणीकरीता हजर नव्हते. सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२१.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८४१/०२**

**श्रीमती सेलमा डिसीलव्हा,**
**ए/७ गोल्डन जुबीली बिल्डिंग,२री बरोज क्रॉस लेन,**
**ठाकुरवाडी, मुंबई-४००००२. ..... तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**सहाय्यक पालिका आयुक्त यांचे कार्यालय,**
**सी वार्ड, चंदनवाडी, जे.एस.एस.रोड,**
**मुंबई-४००००२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्रीमती सेलमा डिसीलव्हा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१५.१२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१८.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.५.९.०८ रोजी अर्ज करुन पाण्याची पाईप लाईन टाकण्याकरीता एस.के.पाटील उद्यानात सुरुंग लाऊन खोदकाम करण्यात आले असल्याने त्याबाबत एकूण ३ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने विहित कालावधीत मागीतलेली माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीवरील सुनावणीकरीता तक्रारदार हजर नव्हते. तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराने आयोगासमोर असे प्रतिपादन केले की, तक्रारदाराच्या मागणीनुसार तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली. यावरुन सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२०.५.२०१० राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८४०/०२**

**श्री. व्ही.जे. जोशी,**
**१,दिनाथ स्मृती, चितळे पथ,**
**दादर(प.), मुंबई-४०००२८. ..... तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),**
**सहाय्यक म.न.पा.आयुक्त यांचे कार्यालय,जी/उत्तर विभाग कार्यालय,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग,दादर(प.), मुंबई-४०००२८ ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. व्ही.जे. जोशी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.३०.१.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१८.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन सदनिका क्र.७ करीता अवैधरित्या पाण्याची नळ जोडणी केल्याबाबत, भिंतीच्या दर्शनी भागावर पाण्याची गळती होते, मालमत्ता कर आकारणी करण्यात आली असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत तक्रारदारास पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथमअपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलावरील सुनावणीकरीता तक्रारदार हजर नव्हते. तक्रारदारास अपील चालवण्यात स्वारस्य नाही असे समजून प्रथम अपीलीय अधिका-यांनली दि.१९.१२.०७ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळले.यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याऐवजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. गैरतक्रारदाराची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत तक्रारदारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२०.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८०९/०२**

**मे.नित्यानंद ड्रायक्लिनर्स,**
**शॉप नं.६, नरेंद्र कॉम्प्लेक्स,बिल्डिंग नं.१,**
**एस.पी.रोड, वैशाली नगर, दहिसर(पूर्व),मुंबई-६८. ..... तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा जनरल सर्जन,**
**दि महात्मा गांधी मेमोरीयल हॉस्पीटल,**
**डॉ.एस.एस.राव रोड, परेल, मुंबई-४०००१२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार मे.नित्यानंद ड्रायक्लिनर्स यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२.१.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१७.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१५.३.०७ रोजी अर्ज करुन तक्रारदाराची निविदा चौकशी का फेटाळण्यात आली,काळया यादीची प्रत, मुंबई महानगरपालिकेच्या प्रमाणपत्राची प्रत, लॉंड्री शॉप लायसन्स इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

हॉस्पीटलच्या लॉंड्री सेवेकरीता गैरतक्रारदाराकडून निविदा चौकशी मागविण्यात आल्या होत्या. तक्रारदाराने टेंडर भरले होते. हॉस्पीटल करीता लॉंड्री सेवा पुरविण्याकरीता तक्रारदाराचे टेंडर फेटाळण्यात आले. तसेच त्यांना काळया यादीत टाकण्यात आले. याबाबत तक्रारदाराने अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२०.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८४७/०२**

**श्री.राजेंद्र श्रीराम विरकर,**
**डी-५७, धर्मनगर सोसायटी,**
**शिवसृष्टी कॉलनी, कुर्ला(पूर्व),**
**मुंबई-४०००२४.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था(२) पूर्व उपनगरे, मुंबई,कोकण भवन,**
**दुसरा मजला, नवीमुंबई-४००६१४.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.राजेंद्र विरकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१२.१.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१९.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१६.११.०७ रोजी अर्ज करुन माहितीचा अधिकार कायद्यान्वये जावक क्र.मुंबई/जिउनि-२/बी-५/गृह/१०३२/सन २००६ दि.२१.४.०६ जिउनि-२ या निर्णयाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश देऊनही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील क्र.२००८/११७८/०२ सादर केले होते. तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराने मागणी केलेली माहिती संबंधीत नस्तीवर उपलब्ध नाही. संदर्भीय नस्ती कार्यालयात तपासणीसाठी उपलब्ध आहे. तसेच सदर नस्तीच्या झेरॉक्स प्रती हव्या असल्यास कार्यालयातून कामकाजाच्या दिवशी प्राप्त करुन घ्याव्यात असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.९.२.२००९ च्या पत्रान्वये कळविले. तसेच सदर प्रकरणी तत्कालीन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था(२)उपनगरे, मुंबई यांनी सुनावणी घेऊन त्यावर निर्णय दिलेला होता. त्याबाबत कार्यालयातर्फे त्यांना दि.९.२.०९ च्या

पत्रान्वये माहिती/कारणे विचारण्यात आली होती. त्यानुसार त्यांचेकडून प्राप्त दिनांक १७.२.०९च्या पत्राची प्रत तक्रारदारास गैरतक्रारदाराने दि.१८.२.०९ च्या पत्रान्वये पुरविली असल्याचे गैरतक्रारदाराने राज्य माहिती आयोगास तक्रारीवरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी राज्य माहिती आयोगाच्या आदेशाचे पालन झाले असल्याचे दिसून येते.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२०.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८४६/०२**

**सचिव/अध्यक्ष,**
**चेंबूर इलेव्हन हेवन गृहनिर्माण संस्था,**
**इमारत क्र.११, सहकार नगर-३,**
**चेंबूर,मुंबई-७१. ..... तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,**
**धर्मादाय आयुक्त कार्यालय,**
**सार्वजनिक संस्था नोंदणी कार्यालय(न्यास),**
**बृहन्मुंबई विभाग,डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी,मुंबई-१८. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार सचिव,चेंबूर इलेव्हन हेवन गृहनिर्माण संस्था यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१८.१.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१९.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१८.९.०६ रोजी अर्ज करुन साईकृपा संस्थेविरुध्द केलेल्या तक्रारीसंबंधी केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने दि.१५.१२.०७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिमका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याऐवजी तक्रार दाखल केली.

साईकृपा संस्था एफ-२३१०१ यांनी चेंबूर इलव्हन हेवन को.ऑप.हौ.सोसायटी संस्थेमधील वादांकित सदनिका क्र.३३० बेकायदेशिर दान घेऊन त्या सदनिकेमध्ये बेकायदेशिररित्या मंदिर बनविले आहे. सदर प्रकरणी न्यायालयात दाद मागण्याकरीता तक्रार करुन अनुषंगिक माहिती मागीतली होती. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत तक्रारदाराच्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती तक्रारदारास पुरवावी.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२०.५.२०१० राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८४५/०२**

**श्री.सोनावणे राजेश शामराव,**
**४३५,२२, जयराज भुवन,न्यु मिल रोड,**
**कुर्ला(प.), मुंबई-४०००७०. ..... तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**लोकसेवा संघ संचालित डॉ.डी.बी.कुलकर्णी विद्यालय,**
**महात्मा फुले रोड,नायगांव,दादर,मुंबई-४०००१४. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार सचिव, श्री.राजेश सोनवणे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२८.१.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१९.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२८.३.०७ रोजी अर्ज करुन हस्तपोच दि.१३.१२.२००६, दि.२०.१२.२००६ व दि.२.१.०७ या तिनही पत्रांबाबत काय कार्यवाही केली त्याबाबतची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार तथा मुख्याध्यापक श्री.कृष्णा नाईक यांनी असे प्रतिपादन केले की, तक्रारदारास कांही माहिती पुरविली आहे, काही माहिती पुरविणे बाकी आहे. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने तक्रारदारास उर्वरित माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरवावी. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ अनुसार अधिनियमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी नामनिर्देशित करुन नाव,पदनाम सहीत कार्यालयाच्या दर्शनी भागात बोर्ड लावावेत. सदर प्रकरणी गैरतक्रारदार तथा मुख्याध्यापक यांनी तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. गैरतक्रारदाराची सदर कृती निश्चितच योग्य नाही. यासाठी गैरतक्रारदार तथा मुख्याध्यापक यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम

२० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:२०.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८४९/०२**

**श्री. ललित सालेकर,**
**१२४, एम महादेव शन्वार,**
**गोलफा देवी रोड,वरळी व्हिलेज,**
**मुंबई-४०००३०.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था,सेंट्रल बँक बिल्डिंग, महाराष्ट्र राज्य,**
**पुणे.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.ललित सालेकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.३.१.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१९.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१३.८.०७ रोजी अर्ज करुन वसई जनता सहकारी बँक म.वसई,जि.ठाणे या बँकेचे ताळेबंद पत्रक, सन १९९६ ते सन २००६ अखेर वार्षिक सर्वसाधारण सभावृत्तांत सन १९९६ ते सन २००६ अखेर,वसई जनता सहकारी बँक स्थापनेसंबंधीची माहिती, वसई जनता सहकारी बँक म.वसई या बँकेच्या उपविधीची प्रतीची मागणी केली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास कळविले की, मागणीकेलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. यामुळे तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सुनावणी आयोजित केली. गैरतक्रारदारानी तक्रारदारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२८.११.०७ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील अमान्य केले. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल न करता तक्रार केली.

तक्रारदाराने वसई जनता सहकारी बँक मर्या.वसई,जि.ठाणे या नागरी सहकारी बँकेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली आहे. नागरी सहकारी बँका माहितीच्या अधिकार कक्षेत येत नाहीत असा मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी रीट याचिका क्र.५६६६/२००७ संबंधी निर्णय दिला

आहे. तरी सदर प्रकरण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नसल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२०.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८१०/०२**

**श्री. सुधिर दिवाण,**
**३,करिम मनोर, ८,कृष्णा संघई पथ,**
**हयुजेस रोडच्या समोर, मुंबई-४००००७.** ..... **तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),**
**महानगरपालिका ए वार्ड यांचे कार्यालय,**
**१३४-ई, शहिद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४००००१.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.सुधीर दिवाण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१५.२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१९.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२८.११.०७ रोजी अर्ज करुन सी.टी.सर्व्हे क्र.९८ कुलाबा विभाग,प्लॉट क्र.२४,३ सोभाणी रोड,कुलाबा, मुंबई येथील इलीगंट अपार्टमेंट मधील सदनिकातील अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.१८.१२.०७ च्या पत्रानवये पत्र/नोटीसीच्या छायाप्रती पुरविल्या. गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्यचे कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

बी.एम.सी.अधिनियमातील कलम ३८१ अनुसार अनधीकृत बांधकामाविरुध्द नोटीस देण्यात आली होती. कलम ४७१ अंतर्गत प्रकरण दाखल करण्यात आले. कलम ४८९ अनुसार अनधिकृत बांधकामाविरुध्द कारवाई करण्यात आली असल्याचे गैरतक्रारदार तथा सहाय्यक अभियंता(इ.वका.)

श्री.ध.दा.कंथारीया यांनी तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१९.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८०८/०२**

**श्री. लक्ष्मण रावजी सावंत,**
**रा.३६६, खासकिलवाडा,**
**मु.पो.ता.सावंतवाडी,जि.सिंधुदूर्ग.** ..... **तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,**
**सिंधूदूर्ग जिल्हा सह.कृषी ग्रामिण बहुउद्देशीय,**
**विकास बँक सिंधूदूर्ग.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. लक्ष्मण रावजी सावंत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१४.१.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१७.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२७.११.०७ रोजी अर्ज करुन सिंधूदूर्ग जिल्हा सहकारी कृषी ग्रामिण बहुउद्देशिय विकास बँक मर्या.सिंधूदूर्ग व दि.६.६.२००७ रोजी अर्ज करुन सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे कर्मचारी विरोधी पदोन्नती धोरणासंदर्भात माहिती मागीतली होती. या दोन्ही अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. दोन्ही कार्यालयांनी संगनमताने माहिती दिली नाही असा तक्रारदाराने तक्रारीत मुद्दा उपस्थित केला आहे.

गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली होती. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती एक महिन्याचे आत गैरतक्रारदाराने तक्रारदारास पुरवावी असे दि.१९.१२.२००८ रोजी प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले होते. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती गैरतक्रारदाराने पत्र क्र.सिंजिबहुबँक/प्रशासन/६९६ दि.१३.८.२००७ रोजी टपालाने पाठविली. तसेच सदरची माहिती पुनःश्च दि.३१.१०.०७ रोजी यु.पी.सी.(पोस्टाचा दाखल घेऊन)पाठविण्यात आली. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१९.१२.०८ रोजी पारित केलेल्या आदेशास

अनुसरुन पुन्हा हातबटवडयाने तक्रारदारास समक्ष माहिती पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदार श्री.विद्याधर गणपत सावंत यांनी तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. तक्रारीवरील सुनावणीकरीता तक्रारदार हजर नव्हते. तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आह.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**　　　　　　　　　　　　　　　　　　**(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२०.५.२०१०**　　　　　　　　　　　　**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८८०/०२६**

**श्री. दत्ताराम कृष्णा पेडामकर आणि इतर,**
**मरीअम्मा नगर, रुम नं.एम-२२३,**
**नेहरुनगर सेंटर मागे, डॉ.ए.बी. रोड,**
**वरळी, मुंबई-४०००१८.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विधी सल्लागार,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** **....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. दत्ताराम कृष्णा पेडामकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.१०.२००९ रोजी अर्ज करुन मुंबईतील झोपडपट्टी संदर्भात स्थानिक रहिवाशांकडून जे तक्रार अर्ज दाखल करण्यात आले त्यावर उच्च सतरीय समिती यांच्याकडून जे आदेश संबंधीत अधिका-यांना देण्यात आले त्याच्या प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास माहिती पुरविण्याबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.९.२.२०१० रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १८.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन उच्चस्तरीय समितीच्या आदेशाबाबत माहिती मागीतली होती. अपीलकारास आवश्यक असलेली माहिती उच्चस्तरीय समितीच्या www.mahhsghpc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असल्याने अपीलकाराने ती प्राप्त करुन घ्यावी असे अपीलकारास कळविण्यात आले आहे. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असे दिसून येते. अपीलकार द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता उपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:२१.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८७६/०२६**

**श्री. जगन्नाथ एच.शर्मा,**
**चंद्रीकाबाई एच.शर्मा,**
**चाळ रुम नं.१ आणि २,**
**खार जवाहर नगर, साईबाबा रोड,**
**खार(पूर्व), मुंबई-४०००५१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** **....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. जगन्नाथ शर्मा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.६.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.४.२००९ रोजी अर्ज करुन जमीन मालकाच्या परवानगीशिवाय झोपडपट्टी पुनर्वसन योजना लागू होते का? याबाबत जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने उचित माहिती द्यावी अशी मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. प्रथम अपीलीय अधिका-यांनी क्र.२००९/२०२०/०२ या द्वितीय अपीलावरील आयोगाच्या दि.३१.३.२००९च्या आदेशाचे पालन केले नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १८.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जमीन मालकाच्या परवानगीशिवाय झोपडपट्टी पुनर्वसन योजना लागू होते का याबाबत माहिती मागीतली आहे. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी एस.आर.ए. योजना लागू करण्यासंदर्भात काढण्यात आलेल्या नोटीसची प्रत अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी. जमीन मालकाच्या संमतीशिवाय झोपडपट्टी पुनर्वसन योजना खाजगी मालकाच्या जमिनीवर राबविता येते का याबाबतही जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:२१.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८८८/०२६**

**श्री. मिलींद नाथा घाडगे,**
**सी-१:९/३:१, सेक्टर २,**
**वाशी, नवी मुंबई-४००७०३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**मध्य मुंबई(सा.बां.)विभाग,**
**गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई-४०००१८.**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता**
**तथा व्यवस्थापक, विकास विभाग चाळी,**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**मध्य मुंबई(सा.बां.)विभाग,**
**गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई-४०००१८. ....उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. मिलिंद घाडगे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३१.१२.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)दि.३.११.०९ संबंधीत चाळ अधीक्षक मार्फत वरळी बी.डी.डी.चाळ नं.५४ प्रत्यक्ष पहाणी अहवाल मिळणेबाबत

२)भाडे पावती मागे लिहिलेल्या नियम ड,फ,ग नुसार माहिती मिळणेबाबत.(वरळी बी.डी.डी.चाळ नं.५४) मुंबई-१८

३)दि.३.११.०९ चाळ अधीक्षक पाहणी अहवाल चाळ नं.५४ त्यावेळी काही खोल्या बंद होत्या. टाळे लावले होते. त्यांचे खोली नंबर किती दिवसांपासून खोल्या किती वर्षांपासून बंद आहेत, एकूण संख्या याची माहिती मिळावी. बंद अधिकृत भाडेकरुने तसे आपणास लेखी पत्राद्वारे कळविले आहे का?

४)भाडेपावती मागे लिहिलेल्या नियम ड,फ व ग नुसार वरळी बी.डी.डी.चाळ नं.५४बाबत माहिती मिळणेबाबत.

५) कलम ७च्या तरतुदींना अधीन राहून माहिती मिळावी.

जन माहिती अधिका-यांनी दि.१९.३.२०१० च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. मागणीनुसार माहिती वेळेत मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती देण्यास जाणून बूजून दिरंगाई केली. दिशाभूल करणारी माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १९.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन संबंधीत चाळ अधीक्षकांमार्फत वरळी बी.डी.डी.चाळ क्रमांक ५४ प्रत्यक्ष पाहणी अहवाल व इतर अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने आजपर्यंत कार्यालयाकडे सादर करण्यात आलेल्या सर्वच अर्जांना कार्यालयाने वेळोवेळी माहिती दिलेली असल्याची सूची जन माहिती अधिका-यांनी आयोगास सादर केली. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहितीच्या अधिकारातील अर्जावर वेळोवेळी माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः२१.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८६४/०२६**

**श्री. अजय गोविंदस्वामी दारा,**
**२०६,श्रीकृष्ण अपार्टमेंट, शास्त्रीनगर,**
**कोपर क्रॉस रोड, संतोषी माता मंदिरासमोर,**
**वरुणणधाम बिल्डिंग जवळ, डोंबिवली(प.),**
**जि.ठाणे-४२१२०२.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह आयुक्त,**
**अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**पुणे विभाग, २८ क्वीन्स गार्डन,**
**पुणे-४११ ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,**
**अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**पुणे विभाग, २८ क्वीन्स गार्डन,**
**पुणे-४११ ००१.** **....उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. अजय गोविंद स्वामी दारा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.१.२०१० रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)सन १.१.१९९५ पासून ३१.१२.२००९ पर्यंतच्या कालावधीत अनुसुचीत जमातीमधील मन्नेवार समाजाच्या किती लोकांनी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केले आहेत.

२)मन्नेवार समाजाच्या किती लोकांचे जात प्रमाणपत्र वैध ठरवले आहेत. तसेच किती लोकांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरवले आहेत.

३)अनुसूचीत जमातीमधील मन्नेवार समाजाच्या चालीरीती काय आहेत

४)मन्नेवार समाजाच्या जातीचे प्रमाणपत्र वैध/अवैध ठरवण्यासाठी आपले/शासनाचे धोरण काय आहे. त्याबाबत शासनाचे आपल्याकडे लेखी आदेश काय आहेत. त्या लेखी आदेशाच्या झेरॉक्स प्रती देणे

५)मन्नेवार समाजाच्या चालीरिती/पूजाअर्चा बाबत आपल्याकडे कोणते दस्तऐवज आहेत. ते कोणी तयार केले व कधी तयार केले आहेत याबाबत माहिती देणे. तसेच त्यांच्या झेरॉक्स प्रती देणे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील नियम ६(१)(क) अनुसार विहित पध्दतीत सदर अर्ज अग्रेषित झाला नसल्याने खारीज करण्यात येत आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल न करता प्रथम अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले. तरीही सदर प्रकरणावर दिनांक १७.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अनुसुचित जमातीतील मन्नेवार समाजाबाबत एकूण ५ मुद्यांवर माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगासमोर प्रतिपादन केले. द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता अपीलकार हजर होते. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:२१.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८८९/०२६**

**श्री.देवराम सिताराम माटे,**
**परेल शिवसंदेश को.ऑप.हौ.सो.,**
**कस्तुरबा गांधी नगर, इमारत क्र.२,**
**वरळी, मुंबइ-४०००१८.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण(अभियांत्रिकी कक्ष),**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण( सहकार कक्ष),**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** **...उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. देवराम सिताराम माटे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.६.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन इमारत क्रमांक २ ची(व्यापारी गाळे) दि.३.१०.२००७ची झालेली लॉटरीची नक्कलेची प्रत, लॉटरी झाली त्याचा तपशील पुरविण्याची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १९.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते,अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी

जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन परेल शिवसंदेश इमारत क्र.२ सहकारी गृहनिर्माण संस्था या संस्थेच्या व्यापारी गाळे वाटपासंबंधीची माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने अपीलकारास माहिती पुरविता येत नाही. याबाबत अपीलकारास लेखी कळविण्यात आले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी आयोगासमोर लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी याबाबतची माहिती संस्थेकडून गोळा करावी व अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२१.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८८७/०२६**

**श्री. शांताराम तुकाराम वालोपकर,**
**इंडियन कॉन्सिल ऑफ बेसीक एज्युकेशनचे**
**आय.जे.पटेल हायस्कूल, जुहू रोड(नॉर्थ),**
**जुहू, मुंबई-४०० ०४९.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी संचालिका,**
**इंडियन कॉन्सिल ऑफ बेसीक एज्युकेशनचे**
**आय.जे.पटेल हायस्कूल,**
**गांधी शिक्षण भवनचे श्रीमती सुरजबा कॉलेज ऑफ एज्युकेशन,**
**जुहू रोड(नॉर्थ), जुहू, मुंबई५४०००४९.** **...उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. शांताराम तुकाराम वालोपकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

इंडियन कॉन्सिलऑफ बेसिक एज्यूकेशनचेआय.जे.पटेल हायस्कूल, गांधी शिक्षण भवनचे श्रीमती सुरजबा कॉलेज ऑफ एज्युकेशन, जुहू रोड(नॉर्थ), जुहू, मुंबई-४०००४९ या शैक्षणिक संस्थांमधून कोणकोणास मानधन मिळते,रोजंदारी मिळते,पगार मिळतो त्याची तपशीलवार माहिती मागविण्याबाबत. उदा.त्यांची मानधनाची रक्कम,पगाराची रक्कम,रोजंदारीची रक्कम, तसेच पार पाडत असलेली कर्तव्ये आणि जबाबदा-या त्या कायदेशीर आहेत किंवा नाही? वर नमुद केलेल्या मिळकत घेणारे प्राचार्य,उपप्राचार्य,वरीष्ठ-कनिष्ठ लिपिक, शिपाई, सफाई कामगार, स्वयंपाकी, वॉचमन यांची सविस्तर माहिती मिळण्याबाबत. तसेच प्राचार्य इतर संस्थेमध्ये कार्यरत असल्यास तशी परवानगी आहे का?

जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित वेळेत पुरविली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १९.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते,अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी

जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन आय.जे.पटेल हायस्कूल, गांधी शिक्षण भवनचे श्रीम.सुजरबा कॉलेज ऑफ एज्युकेशन, जुहू रोड(नॉर्थ) जुहू बाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकारास वेतनश्रेणीनुसार वेतन का देण्यात आले नाही याबाबत अपीलकारास जाणून घ्यावयाचे आहे असे दिसते. याबाबत व्यवस्थापक मंडळाने अपीलकारास माहिती दि.१७.२.२०१० च्या पत्रानवये पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२१.५.२०१०** | **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८६५/०२६**

**श्री.विजय हरी कदम,**
**न्यु शिवाजी नगर, सिद्धिविनायक चाळ नं.५/१३,**
**कळवा(पूर्व), ठाणे-४००६०५.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता(मध्य कार्यालय),**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतुक भवन,**
**डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ सुरक्षा व दक्षता अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**मुंबई विभागीय कार्यालय, किरोल रोड,**
**कुर्ला, मुंबई-४०००८६.** **...उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. विजय हरी कदम यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.७.१२.०९ व दि.२४.१२.०९ रोजी अर्ज करुन एस.टी.कर्मचारी वसाहत इमारत क्रमांक ३/२८/२:३ वाशी सेक्टर १५, नवी मुंबई सदनिके बाबतची माहिती तसेच विद्युत मीटर रीडींग ०००४, खोलीचा घेतलेला ताबा दि.१७.३.०४, खोलीचा सोडलेला ताबा दि.२१.२.०९, विद्युत मीटर काढण्याची तारीख,नवीन विद्युत मीटर कधी बसविला ती तारीख,विद्युत मीटर का काढला याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.११.१२.०९ व दि.२१.१.०९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १७.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, विद्युत मीटर व सेक्टर १५ वाशी नवी मुंबई येथील एस.टी. कर्मचारी वसाहतीतील सदनिकेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली आहे. पुरविलेली माहिती चुकीची असल्याचा अपीलकाराने द्वितीय अपीलात मुद्दा उपस्थित केला आहे. परंतु पुरविलेली माहिती कशी चुकीची आहे याबाबत अपीलकाराने आयोगासमोर खुलासा केला नाही. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:२४.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८९०/०२६**

**श्री. अतिश संजय कसबे,**
**संत ज्ञानेश्वर सोसायटी, संजय नगर,**
**आंबेडकर सोसायटी जवळ,विक्रोळी पार्क साईट,**
**विक्रोळी(प.), मुंबई-४०००७९. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता(विशेष),**
**कार्यकारी अभियंता(विशेष) एन विभाग यांचे कार्यालय,**
**मुंबई महानगरपालिका, ४था मजला, जवाहर रोड,**
**घाटकोपर(पूर्व), मुंबई-४०००७७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(जलकामे),**
**कार्यकारी अभियंता(विशेष) एन विभाग यांचे कार्यालय,**
**मुंबई महानगरपालिका, ४था मजला, जवाहर रोड,**
**घाटकोपर(पूर्व), मुंबई-४०००७७. ...उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अतिश संजय कसबे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.५.१२.०९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)वर्षानगर मित्रमंडळ आणि एन विभाग दरम्यान पाण्याच्या वाटपाबाबत झालेला करार

२)वन विभागाने पाणी वाटपाबाबतच्या जबाबदारीतून हात का झटकले

३) जनतेने किती पैसे वर्षानगर तरुन मित्र मंडळास द्यावे आणि एन विभागाला वर्षानगर मित्र मंडळाने किती पैसे द्यावे याबाबत झालेल्या व्यवहाराची प्रत आणि लेखाजोखा

४)त्या कराराची प्रत हवी

५)एन विभागाने किती पाणी वाटप करणार वर्षानगर पाण्याच्या टाकीला

६)त्यावेळेस असलेल्या महानगरपालिकेच्या सर्व अधिका-यांची, कर्मचा-यांची नावे आणि हुद्दा

७)एन विभागापासून ते वर्षानगर पाण्याची टाकी पर्यंतचा पाणीच्या वाटपाचा नकाशा आणि त्या पाण्याचे वाटप वर्षानगर टाकी कोठल्या विभागात वाटप करते तो नकाशा

८) ती पाण्याची टाकी त्या विभागाच्या जीवसंख्येला पाणी पुरवठयास सक्षम आहे का? नाही तर करार का केला आणि एन विभागाने वाटप का केले नाही?

जन माहिती अधिका-यांनी दि.२४.१२.०९ रोजी माहिती दिली. माहिती असमाधानकारक, अपूर्ण माहिती,माहिती विहित वेळेवर मिळाली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२८.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल कले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १९.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन विक्रोळी पार्कसाईट विभागातील वर्षानगर पाण्याच्या टाकीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी माहितीपोटी आवश्यक ते शुल्क म्हणजे कराराच्या प्रतीसाठी रु.३४/- पाण्याची दैनंदिन गरजेची माहिती प्राप्त करण्यासाठी रु.४/- याप्रमाणे शुल्क भरल्यानंतर माहिती पुरविण्यात येईल असे अपीलकारास दि.२४.१२.०९ च्या पत्रानवये कळविले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने माहितीपोटी विहित शुल्क भरुन माहिती प्राप्त करावी.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२४.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८६६/०२६**

**श्री. उमाकांत इश्वरचंद्र तिवारी,**
**सी/२०४, राहुल अपार्टमेंट III,**
**महावीर नगर, अचोले क्रॉस रोड,**
**नालासोपारा(पूर्व), ठाणे-४०१२०३.** .... **अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहायक म.न.पा.आयुक्त,**
**पी/उत्तर विभाग कार्यालय, मामलेतदारवाडी,**
**लिबर्टी गार्डन, मालाड(पश्चिम),**
**मुंबई-४०००६४.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी शाळा,**
**पी/उत्तर-२ यांचे कार्यालय, दत्तात्रय क्रॉस रोड,**
**मालाड(पूर्व), मुंबई.** **...उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. उमाकांत ईश्वरचंद्र तिवारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.६.११.०९ रोजी अर्ज करुन शेठ एन.एल.हायस्कूल मालाड(प.), मधील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत, फी बाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२९.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास माहिती नि:शुल्करित्या उपलब्ध करुन देण्यात यावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२१.१.२०१० रोजी आदेश पारित केले.त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी दि.२५.१.२०१० रोजी अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती मोफत पुरविली. यामुळे समाधन झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १७.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी

जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, शेठ एन.एल.हायस्कूल मालाड(प.) मधील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत व फीसंबंधी अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली आहे. यामुळे अपीलकाराचे समाधान झाले नाही. अपीलकार द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता हजर नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२४.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८६७/०२६**

**श्री. मोहम्मद युसुफ खान,**
**१०२/ए, सीगुल को.ऑप.हौ.सोसायटी लि.,**
**मालाड(प.), मुंबई-४०००६४. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सहाय्यक म.न.पा. आयुक्त,**
**पी/उत्तर विभाग कार्यालय, लिबर्टी गार्डन, मामलेतदार वाडी,**
**मालाड(प.), मुंबई-४०००६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),**
**सहाय्यक म.न.पा. आयुक्त,**
**पी/उत्तर विभाग कार्यालय, लिबर्टी गार्डन, मामलेतदार वाडी,**
**मालाड(प.), मुंबई-४०००६४. ...उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. मोहम्मद युसूफ खान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१.१.२०१० रोजी अर्ज करुन टेरेस फ्लॅट क्र.४०२/सी मध्ये नेहा विचारे यांनी अनधिकृतरित्या केलेल्या बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने दि.५.२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १७.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन टेरेस फ्लॅट क्र.४०२/सी मधील अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली

होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराने केलेल्या तक्रारीनुसार अनधीकृत बांधकामाबाबत केलेल्या कारवाईची माहिती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः२४.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८००/०२६**

**श्री. निशांत सुभाष घाडगे,**
**२१/२, गोकूळ, डॉ. पेडणेकर बिल्डिंग,स.म. मार्ग,**
**कर्ला(प.), मुंबई-४०००७०. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**सहाय्यक आयुक्त(बाजार) यांचे कार्यालय,**
**महात्मा ज्योतीबा फुले मंडई, डॉ.डी.एन.रोड,**
**मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी(बाजार),**
**एल विभाग कार्यालय, स.गो. बर्वे मार्ग, कुर्ला(प.),**
**मुंबई-४०००७०. ...उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. निशांत सुभाष घाडगे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.९.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.८.२००९ रोजी अर्ज करुन कुर्ला एल विभागातील मुंबई महानगरपालिकेच्या परवानगीने व विनापरवाना धारक चिकन सेंटर, बीफ सेंटर व मटन विक्रीची किती दुकाने परवाना धारक व किती दुकाने विनापरवानाधारक आहेत याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.३.९.०९ रोजी प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ६.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन विनापरवानाधारक चिकन सेंटर,बीफ सेंटर व मटन विक्रीच्या दुकानाबाबत तसेच किती दुकाने परवानाधारक आहेत याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली असल्याचे, दुकानाच्या नावाची यादी आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:२४.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७७५/०२६**

**श्री. हिरालाल मोतीलाल जैन/टमका,**
**१९, २री मरीन स्ट्रीट, धोबी तलाव,**
**मुंबई-४००००२. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता(सी व डी वार्ड),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सी वार्ड, ७६ श्रिकांत पालेकर मार्ग,चंदनवाडी, मरील लाईन्स,**
**मुंबई-४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सी वार्ड, ७६ श्रिकांत पालेकर मार्ग,चंदनवाडी, मरील लाईन्स,**
**मुंबई-४०० ००२. ...उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. हिरालाल मोतीलाल जैन यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१३.७.२००९ रोजी अर्ज करुन सहाय्यक आयुक्त, सी विभाग यांनी तयार केलेला अहवाल आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना पाठविला, सदर अहवालाची साक्षांकित प्रत मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी दि.१५.९.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.५.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी पुन्हा कसून शोध घ्यावा व अपीलकाराने मागणी केलेल्या अहवालाची प्रत ३ आठवडयाचे आत अपीलकारास पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१९.११.०९ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सहाय्यक आयुक्त, सी विभाग यांनी तयार केलेला व आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सादर केलेल्या अहवालाची प्रत मागीतली होती. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी कार्यालयातील कागदपत्राचा कसून शोध घ्यावा व अहवालाची प्रत उपलब्ध झाल्यानंतर अपीलकारास अहवालाची प्रत पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२४.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८६०/०२६**

**श्री. मेहमूद मेहबूब शेख,**
**रुम नं.७, दोस्त महम्मद चाळ,**
**नित्यानंद नगर, घाटकोपर(प.),**
**मुंबई-४०००८६. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता(विशेष),**
**एल वार्ड, कार्यकारी अभियंता विशेष यांचे कार्यालय,**
**लक्ष्मणराव यादव मार्केट, १ला मजला,एस.जी. बर्वे मार्ग,**
**कुर्ला(प.), मुंबई-४०००७०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ व का.),**
**लक्ष्मणराव यादव मार्केट, १ला मजला,एस.जी. बर्वे मार्ग,**
**कुर्ला(प.), मुंबई-४०००७०. ...उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. मेहमुद मेहबुब शेख यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.७.९.२००९ रोजी अर्ज करुन डिटेक्शन आणि डीमोलेशन रजीस्टरची छायाप्रत मागीतली होती. मागणी केलेली माहिती तयार आहे. माहितीपोटी रु.१५८०/- इतक्या शुल्काचा कार्यालयात भरणा करावा व माहिती प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.), एल विभाग यांनी दि.६.१०.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. अपीलकाराने दि.३०.१०.२००९ रोजी रु.१५८०/-इतके शुल्क भरले. शुल्क भरुनही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.९.११.०९ रोजी प्रथम अपीलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली.अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती २० दिवसात पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.३०.११.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १७.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार  उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन डिटेक्शन आणि डिमोलेशन रजीस्टरची छायाप्रत मागीतली होती. अपीलकाराने माहितीपोटी रु.१५८०/- इतके शुल्क कार्यालयात भरले तरीही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर प्रकरणी अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती २० दिवसाचे आत पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित करुनही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरीता जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार रु.२५,०००/- इतकी शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबत जन माहिती अधिका-ऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:२४.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/३९०७/०२६**

**श्री. दत्तात्रय मोहन पेठकर,**
**११५२,ए, विष्णू गल्ली,**
**मु.पो.तासगांव,**
**जि.सांगली, पिन-४१६३१२.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव(रस्ते),**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(नियोजन),**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.** **...उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. दत्तात्रय मोहन पेठकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.४.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.७.१२.२००८ रोजी अर्ज करुन राष्ट्रीय मार्ग १४२ मध्ये एस.क्र.११२८००/एस.क्र.५४(एन)कुपवाड (वडीलोपार्जित जमिनीतील)सध्या गेलेल्या या अपीलकाराच्या जमिनीतील क्षेत्राची नुकसान भरपाईची रक्कम व्याजासह मिळण्याबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी मागीतलेली माहिती विहित कालावधीत पुविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीयअधिका-याकडे दि.३१.१.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२७.२.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १७.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सांगली जिल्हयातील शहराबाहेरील वळण रस्ता क्र.रा.मा.१४२ मधील रस्ते बांधकाम व पूल बांधकामाच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय क्र.एसएसआर १९९५/प्र.क्र.१३७८/नि३, दि.३०.५.१९९५ रोजीच्या शासन निर्णयाची प्रत तसेच या संदर्भात प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने जोडण्यात आलेले सर्व नकाशे व अन्य संबंधीत कागदपत्रे तसेच भूसंपादनाची कागदपत्रे इत्यादी माहिती मागीतली होती. अंदाजपत्रक आणि नकाशाची कागदपत्र उपलब्ध नाहीत. प्रशासकीय मान्यतेसंबंधीची कागदपत्र अपीलकारास उपलब्ध करुन देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२४.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४६२०/०२६**

**श्री. वैभव सदानंद पालकर,**
**५४/१३४५, कन्नमवार नगर-२,**
**विक्रोळी(पूर्व), मुंबई-४०००८३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**सहाय्यक पालिका आयुक्त,एस विभाग कार्यालय,बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**मंगतराम पेट्रोलपंपाजवळ,एल.बी.एस.मार्ग,भांडूप(प.),**
**मुंबई-४०००७८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण),**
**कार्यकारी अभियंता गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ(म्हाडा),**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),मुंबई-४०००५१. ...उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. वैभव सदानंद पालकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.१२.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.४.२००८ रोजी अर्ज करुन जनता मार्केट,कन्नमवार नगर-२, विक्रोळी(पूर्व) येथील रोड व त्यालगतचे गटार याबाबतची अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती विभागात उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामळे अपीलकाराने दि.२१.६.०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. सदर प्रकरणी मुख्य मुद्दा ओळखपत्र देणे आणि सदनिका धारकाकडून भाडे वसुली करणेबाबत असल्याचे अपीलकाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. पूर्वी म्हाडा भाडेवसुली करत होते. आता म्हाडाने भाडे वसूल करण्याचे थांबविले आहे. काही लोकांकडे पुराव्या दाखल आवश्यक ती कागदपत्र उपलब्ध

आहेत. परंतू त्यांना ओळखपत्र दिली जात नाहीत. सदर प्रकरणी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मुंबई मंडळ यांनी लक्ष घालून अपीलकाराच्या प्रश्नाची सोडवणूक करावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:२६.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/९२१/०२**

**श्री. एम.योगेश्वर राज,**
**१०१,सत्यम-II,**
**के.रहेजा कॉंप्लेक्स,मालाड(पूर्व),**
**मुंबइ्र-४०००९७. ..... तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा खजिना अव्वल कारकून,**
**तहसिलदार कार्यालय,ठाणे,**
**तलावपाळीजवळ,जि.ठाणे. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. योगेश्वर राज यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२७.१०.२००६ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन श्री.संतोष रामनाथ नाखवा यांच्या महादेव कोळी या जातीच्या दाखल्याबाबत १ ते ७ मुद्यांबाबत माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली. यमुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीवरील सुनावणीचेवेळी तक्रारीतील कागदपत्रांचे अवलोकन केले असता गैरतक्रारदाराने तक्रारदारास सदर प्रकरणी खालीलप्रमाणे माहिती पुरविली असल्याचे दिसून येते.

१)महादेव कोळी ही जात अनुसुचित जमाती या वर्गात महाराष्ट्र शासनाच्या यादीमध्ये समाविष्ट असून सोबत यादीची छायांकित प्रत जोडली आहे.

२,३,४,५)या कार्यालयातील अभिलेख(रजिस्टर)मधील नोंद तपासून पहाता श्री.संतोष रामनाथ नाखवा यांना महादेव कोळी या जातीचा दाखला या कार्यालयातून सन १९८३ साली देण्यात आलेला आहे. श्री.नाखवा यांना २३ वर्षापूर्वी दाखला देण्यात आला असून त्यांचे जातीच्या दाखल्याची मूळ संचिका या कार्यालयाचे अभिलेख कक्षात शोध घेता आढळून आलेली नाही. त्यामुळे आपणास मूळ संचिकेतील इतर कागदपत्र देता येत नाहीत.

६)श्री.संतोष रामनाथ नाखवा यांना या कार्यालयातून देण्यात आलेल्या जातीच्या दाखल्याची छायांकित प्रत सोबत जोडून दिलेली आहे.

७)श्री.संतोष रामनाथ नाखवा यांच्या जातीच्या दाखल्याची मूळ संचिका अभिलेख कक्षात आढळून न आल्याने आपणास श्री.नाखवा यांच्या शाळेच्या दाखल्याची प्रत उपलब्ध करुन देता येत नाही.

सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२६.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/६४८/०२**

**श्री. संजराज हरिश्चंद्र मंगेशकर,**
**द्वारा- महेश काशिनाथ सुर्वे,**
**८२/एफ, स्नेहल को.ऑप.हौ.सो.लि.,**
**मुलतानी मेन्शन,ब्लॉक नं.२,ठाकरवाडी,**
**मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मार्ग, दादर(पूर्व),मुंबई-१४. ..... तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एम-पश्चिम विभाग कार्यालय,**
**शरदभाऊ आचार्य मार्ग, नटराज सिनेमा जवळ,**
**चेंबूर(प.),मुंबई-४०००७१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. संजराज मंगेशकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१८.१.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.६.९.०९ रोजी अर्ज करुन स्नेहल सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या भूखंडावर इमारत पुनर्बांधणीचे काम सुरु आहे त्यासंबंधी म.न.पा.ने मंजूर केलेले नकाशे व इतर माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की,गैरतक्रारदार यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत तक्रारदारास मंजूर नकाशाची प्रत उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**तक्रार अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२६.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/९२३/०२**

**श्री. मनोज शर्मा,**
**बी/२००/२/२, हेमंत मांजरेकर रोड,**
**रावळी कँप, सायन(पूर्व), मुंबई-४०००३७. ..... तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पालिका आयुक्त,**
**एम/पूर्व विभाग, शरदभाऊ आचार्य मार्ग,**
**नटराज सिनेमाजवळ, चेंबूर, मुंबइ्र-४०००७१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. मनोज शर्मा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१८.१२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१८.११.०९ रोजी अर्ज करुन बौंगडवाडी,गोवंडी, मुंबई येथील फॅमिली नर्सिंग होमबाबत तक्रार केली होती. गैरतक्रारदाराने सदर प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी तक्रारदाराने फॅमिली नर्सिंग होममध्ये हजर राहून पहाणी करावी. त्यानंतर अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती पुरविण्यात येईल असे कळविण्यात आले होते. परंतू अपीलकार हजर झाले नाहीत. अपीलकारास हव्या असलेल्या माहितीकरीता आवश्यक तो शुल्क भरणा केलेला नाही. त्यामुळे तक्रारदारास माहिती पुरविता आली नाही असे गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, तक्रारदाराने माहितीपोटी आवश्यक ते शुल्क भरणा करुन गैरतक्रारदाराकडून माहिती प्राप्त करावी.

**आदेश**

**तक्रार अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२६.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/७९२/०२**

**श्रीमती विशाखा विनायक इंगळे,**
**बी/६, अलंकार को.ऑप.हौ.सो.(मर्या.),**
**टिळकनगर, चेंबूर, मुंबई-४०००८९.** ..... **तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा),**
**एम(पूर्व)-२ विभाग, एम/पश्चिम म.न.पा.विभाग कार्यालय,**
**चेंबूर, मुंबई-४०००७१.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्रीमती विशाखा विनायक इंगळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२७.४.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते, गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.३.१०.०९ रोजी अर्ज करुन बदली संदर्भात दि.२४.८.०९ रोजी कार्यालयात सादर करण्यात आलेल्या अर्जाची सद्यस्थिती तसेच अणिक गांव म्युनिसिपल माध्यमिक शाळेचे इनपूट व शेरे पुस्तकात वरिष्ठ अधिका-यांनी नोंदविलेले शेरे, अभिप्राय इत्यादी आणि संबंधित मुख्याध्यापकांनी वेळोवेळी काढलेल्या सूचना/नोटीस यांच्या छायाप्रतीची मागणी केली होती. गैरतक्रारदाराने विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील क्र.२००९/४३६३/०२ दाखल केले होते. सदर प्रकरणी तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.२३.३.२०१० रोजी आदेश पारित केले आहेत. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्याबाबत आयोगाने दि.२३.३.२०१० रोजी आदेश देऊनही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. गैरतक्रारदाराची सदर कृती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग करणारी आहे. या प्रमादाबद्दल गैरतक्रारदार यांना

जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार रु.२५,०००/- इतकी शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी अहवाल सादर करावा.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२६.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/५०४/०२**

**श्री.बिमलकुमार एच.दोशी,**
**बी-७०२, राज मनोर, नेव्ही कॉलनी समोर,**
**मालाड(प.), मुंबई-४०००६४. ..... तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी सोसायटीज,**
**पी वार्ड, ए-१ बिल्डिंग, ट्रक टर्मिनल्स,**
**वडाळा, मुंबई. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.बिमलकुमार दोशी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२६.१०.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१.२.०८ रोजी तक्रार करुन राज मनोर सहकारी गृहनिर्माण संस्था लि., मालाड(पश्चिम) मुंबई येथील संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीच्या अनियमिततेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील क्र.२००९/१७६५/०२ दाखल केले होते. सदर प्रकरणी व्दितीय अपील मान्य करुन तक्रारदारास ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे राज्य माहिती आयोगाने दि.२८.८.०९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने गैरतक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ८३ अनुसार चौकशी अधिकारी म्हणून श्री.निलेश चव्हाण यांची नेमणूक केली असल्याचे गैरतक्रारदाराने लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने आयोगाच्या आदेशाची दखल घेऊन संस्थेविरुध्द कारवाई सुरु केली आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीच्या अनियमिततेबाबत चौकशी अधिका-याची नेमणूक

करुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ८३ अनुसार कारवाई करण्यात येत असल्याबाबत गैरतक्रारदाराने तक्रारदारास पत्र पाठवून अवगत करावे.

**आदेश**

**तक्रार अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२६.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/६२४/०२**

**श्री. मच्छिंद्र करलकर,**
**हझराबज हाऊस, रुम नंबर ५,**
**इर्ला सोसायटी रोड,**
**विले पार्ले(प.), मुंबई-४०००५६.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा लँड ऑफीसर,**
**महाराष्ट्र गृहनिर्माण मुंबई बोर्ड,**
**म्हाडा बिल्डिंग, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.मच्छिंद्र करलकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.११.१.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१७.१२.२०१० रोजी अर्ज करुन शितलादेवी सहकारी गृहनिर्माण संस्था, लोकमान्य नगर सहकारी गृहनिर्माण संस्था आणि शिवनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेतील व्यापारी तत्वावरील गाळयांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीयअपील क्र.२००८/२९२९/०२ दाखल केले होते. तक्रारदारास ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.३१.७.०९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

याच विषयावरील तक्रारदाराची क्र.२०१०/७६०/०२ ही तक्रार सुनावणीअंती आयोगाने दि.३०.४.२०१० रोजी आदेश पारित करुन निकाली काढली आहे. त्यामुळे ही तक्रार दप्तरी दाखल करण्यात येत आहे.

**आदेश**

**तक्रार दप्तरी दाखल करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२६.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/६३५/०२**

**श्री. नरेंद्र भिकाजी सावंत,**
**११/३४५, सहकार नगर-३,**
**चेंबूर, मुंबई-४०००७१. ..... तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी,**
**जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय,**
**सरकारी वसाहत, प्रशासकीय भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. नरेंद्र सावंत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२.२.०९ रोजी अर्ज करुन मार्च-२००६ रोजी संघमित्रा सामाजिक संस्थेने म्हाडाकडे भूखंड व फंड मिळण्यासाठी सादर केलेल्या कागदपत्राच्या प्रतीची मागणी केली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने आयोगाकडे द्वितीय अपील क्र.२००९/३००८/०२ दाखल केले होते. तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.७.८.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, मा.सामाजिक न्याय मंत्री यांनी शिफारस केलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती गैरतक्रारदाराने तक्रारदारास हे आदेश प्रापत झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरवाव्यात.

**<u>आदेश</u>**

**तक्रार अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२६.५.२०१० राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/५६७/०२**

**श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले,**
**सिध्दीविनायक प्रसाद,**
**डॉ.शामा पसाद मुखर्जी रोड,**
**डोंबिवली(पूर्व), ता.कल्याण,**
**जि.ठाणे-४२१ २०१. ..... तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा निबंधक,**
**निबंधक उच्च न्यायालय, मुंबई यांचे कार्यालय,**
**उच्च न्यायालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. कौस्तुभ गोखले यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.११.११.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२४.४.०६ रोजी अर्ज करुन मुंबई उच्च न्यायालयात दाखल विविध दाव्यात याचिकाकर्ता अथवा सामनेवाला यांनी दाव्यात दाखल केलेली कागदपत्रे बनावट व खोटी आहेत असे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर न्यायालयाने याबाबत केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने आयोगाकडे द्वितीय अपील क्र.२००८/१६८/०२ दाखल केले होते. तक्रारारास ४५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.२६.८.०८ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

राज्य माहिती आयोगाच्या आदेशानुसार तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. तसेच तक्रारदारास माहिती पुरविण्यास विलंब झाला.

सदर विलंब जाणीवपूर्वक केलेला नाही असे गैरतक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादनद करुन विलंबाबाबत आयोगाकडे क्षमा याचना केला. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:२६.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/९२५/०२**

**श्री. फझल मेहमूद हसन पटेल,**
**९,अली उमर स्ट्रीट, ४था मजला,**
**मुंबई-४००००३. ..... तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक पालिका आयुक्त,**
**सी वार्ड कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी समोर,**
**मुंबई- ४००००२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. फझल मेहमूद हसन पटेल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२८.३.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२८.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.८.५.०७ व ८.७.०७ रोजी अर्ज करुन बृहन्मुंबई महानगरपालिका सी विभागात आराखडयाशिवाय अवैधरित्या केलेल्या बांधकामाविरुध्द केलेल्या कारवाईची तक्त्यात माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे प्रथम अपील दाखल करण्याऐवजी थेट राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरीता तक्रारदार हजर नव्हते. तक्रारदारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी मागणीप्रमाणे तक्रारदारास गैरतक्रारदाराने माहिती पुरविली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:३१.५.२०१० राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९११/०२६**

**श्री. अजितकुमार पंजाबी,**
**द्वारा रमजान भटार, चाळ नं.२६३/५,**
**डॉ.आंबेडकर चौक, तक्यावार्ड,**
**कुर्ला(प.), मुंबई-४०००७०. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता यांचे मध्यवर्ती कार्यालय,**
**५वा मजला,महानगरपालिका मुख्यालय,**
**विस्तारीत इमारत, महापालिका मार्ग,फोर्ट,मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता,**
**इमारत बांधकाम(शहर) महापालिका ई विभाग कार्यालय,**
**खोली क्र.३२,३रा मजला,१०, शेख हफीझुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई-४००००८. ...उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अजितकुमार पंजाबी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.७.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.१२.०९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

केइएम रुग्णालय,नायर रुग्णालय,सायन रुग्णालय, या तिन्ही रुग्णालयांमध्ये आपल्या खात्यामार्फत कोणकोणती कामे कोणकोणत्या इमारतीमध्ये चालू आहेत, त्या कामासंबंधी सहा.अभियंता,दुय्यम अभियंता यांची लेखी माहिती मिळावी. तसेच या कामाबाबत टेंडर भरतेवेळेस महापालिका कार्यालयात सिव्हील इंजिनिअर सुपरवायझर यांच्या प्रमाणपत्र फोटोसहीत जी जोडलेली पत्र आहेत त्यांच्या छायांकित प्रती मिळाव्यात. तसेच कोणकोणते ठेकेदार नेमलेले आहेत त्यांच्या चौक्या कोठे आहेत चौकीचे भाडे व डिपॉझीट किती आहे याची मराठीत शुद्ध माहिती मिळावी.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१६.१.२०१० च्या पत्रान्वये माहिती पुरविली. योग्य प्रकारे उत्तर मिळाले नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.३.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल

केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास दि.१८.३.२०१० पूर्वी माहिती पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी दि.५.२.२०१० रोजी आदेश पारित केले. माहिती योग्य प्रकारे दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २८.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सिव्हील कामाच्या टेंडरची माहिती मागीतली होती. अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी कामासंबंधीचे सहाय्यक अभियंता,दुय्यम अभियंता,सुपरवायझर, वास्तुशास्त्रज्ञ इत्यादींची संपूर्ण नावाची यादी अपीलकारास हे आदेश प्राप्त झ ाल्यापासून १५ दिवसाचे आत जन माहिती अधिका-यांनी पुरवावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः३१.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९१०/०२६**

**श्री. अशोक के. कुवाडीया,**
**प्लॉट -४७/६,विकास,गरोडीया नगर,**
**घाटकोपर(पूर्व), मुंबई-४०००७७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप-आयुक्त,**
**परिमंडळ-६ यांचे कार्यालय,**
**चेंबूर, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**पूर्व प्रादेशिक विभाग नियंत्रण कक्ष,**
**चेंबूर, पोलीस-४०००७१.** **...उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अशोक कुवाडीया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.६.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.११.०९ रोजी अर्ज करुन पंतनगर पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक ३०/०९ कलम ४२०,४६५,४६७,४६८,४७१,२०१ आणि ३४ भा.द.वि.स.या गुन्हयाच्या दोषारोपपत्राची संपूर्ण प्रतीची एकूण ७ मुद्यांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरिक्षक पंतनगर पोलीस ठाणे, मुंबई यांनी दि.२३.१२.०९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. जन माहिती अधिका-यांनी योग्य माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे दि.२१.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी तात्काळ द्यावी असे दि.२२.२.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यानुसार पुन्हा दि.१२.३.२०१० च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. चुकीची माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २८.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते,अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी

जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन पंतनगर पोलीस ठाणे गु.र.क्र.३०/०९ बाबत संपूर्ण माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरविण्यात आली आहे असा लेखी अहवाल सादर करुन आयोगासमोर प्रतिपादन केले आहे. अपीलकार द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता हजर नव्हते.या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३१.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९१२/०२६**

**श्री. अजितकुमार पंजाबी,**
**द्वारा रमजान भटार, चाळ नं.२६३/५,**
**डॉ.आंबेडकर चौक, तक्यावार्ड,**
**कुर्ला(प.), मुंबई-४०००७०.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**सहाय्यक पालिका आयुक्त,एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,सेंट मार्टिन्स रोड,**
**बांद्रा(पश्चिम),मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता(परिरक्षण),**
**सहाय्यक पालिका आयुक्त,एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,सेंट मार्टिन्स रोड,**
**बांद्रा(पश्चिम),मुंबई-४०००५०.** **...उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अजितकुमार पंजाबी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.७.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.१२.०९ रोजी अर्ज करुन सिव्हील कामाच्या टेंडरची खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

संबंधीत कामकाजाची प्रशासकीय माहिती अभिलेखावर तसेच सॅप प्रणालीवर माहिती आपल्या विभाग हद्दीमध्ये परिरक्षण खात्याअंतर्गत होणारी कामे जनहिताची जनतेच्या पैशातून होणारी कामे याबाबत टेंडर भरतेवेळीस टेंडर मिळविण्यासाठी अनामत रक्कम पालिका कार्यालयात भरली जाते ती अनामत रक्कम किती व कोणत्या तारखेस भरलेली आहे? सर्वसाधारण अटी व शर्ती नियमावलीप्रमाणे(General Condition of Contract)याप्रमाणे नियमानुसार जो पत्रव्यवहार केला अनामत रक्कमेचे चलन पावती क्रमांक व कोणत्या तारखेस भरले या सर्वांची लेखी माहिती छायांकित प्रतीत देण्यात यावी.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२.१२.०९च्या पत्रान्वये खाली नमूद केल्याप्रमाणे माहिती पुरविली.

१)दि.१७.१२.२००९अन्वये आपणास हवी असलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध असून छायांकित प्रतीसाठी योग्य ते शुल्क भरुन मिळवू शकतात याची कृपया नोंद घ्यावी.

२)दि.२२.१०.०९ अन्वये आपणास हवी असलेली माहिती ही सहाय्यक अभियंता(परिरक्षण)यांच्या अखत्यारीत होत असलेली किरकोळ दुरुस्तीचे कामासंबंधी असून आपला अर्ज सहाय्यक अभियंता एम/पश्चिम यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना करण्यात येत आहे.

यामुळे समाधान झाले नसल्यामुळे अपीलकाराने दि.३१.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २८.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सिव्हील कामाच्या टेंडरबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास आवश्यक ती माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३१.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९०५/०२६**

**श्रीमती ग्लोरीया डिसोझा,**
**डिव्हाईन बंगला, आय.सी.कॉलनी,**
**बोरीवली(प.), मुंबई-४००१०३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी,**
**शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,लखमाशी नप्पू रोड,म्युनी.स्कूल बिल्डिंग,**
**दादर,हिंदू कॉलनी, मुंबई-४०००१४.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा),**
**आर/मध्य विभाग राजदा नगर म्युनिसिपल शाळा,**
**उमेदा आश्रम पथ, बोरीवली(प.),**
**मुंबई-४०००९२. ...उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती ग्लोरीया डिसोझा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन अप्रशिक्षित शिक्षकांच्या सेवानिवृत्ती वेतनाबाबत सर्वंकष माहिती मागीतली होती. मुद्दा क्र.८ची माहिती दि.४.१२.०९च्या पत्रान्वये दिली. त्याचप्रमाणे क्र.ईओ/अनु/१८९७, दि.६.१.२०१० अन्वये उर्वरित सर्व मुद्यांबाबत जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१२.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास सेवानिवृत्तीवेतन प्राप्त न झालेल्या आणि प्रस्तावामध्ये समाविष्ट असलेल्या अप्रशिक्षीत शिक्षकांची यादी द्यावी असे जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांना दि.१६.१.२०१० रोजी आदेश दिले. यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २८.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते, अपीलकार

उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अप्रशिक्षित शिक्षकांच्या सेवानिवृत्ती वेतनाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता अपीलकार हजर नव्हते. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादनकेले. अप्रशिक्षीत १९९ शिक्षकांना निवृत्तीवेतन देण्याच्या प्रस्तावासंबंधी प्रक्रिया सुरु असल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले.या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३१.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९०८/०२६**

**श्री. गजानन आर देसाई,**
**दुलाबा-प्रसाद,प्लॉट नं.६०-डी/एफ,**
**एस.एम.जाधव मार्ग,**
**दादर, मुंबई-४०००१४.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा यांचे कार्यालय,**
**जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा मेटेनन्स सव्हेअर,**
**जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा यांचे कार्यालय,**
**जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४००००१.** **...उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. गजानन देसाई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५.१०.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.७.०९ रोजी अर्ज करुन दादर नायगाव विभाग येथील सी.एस.क्र.४३/६२ येथील मालमत्तेसंबंधी सर्व्हे प्लान च्या ३ साक्षांकित प्रती व इतर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे दि.३१.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २८.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन दादर-नायगाव विभागातील सी.एस.क्र.४३/६२ या मालमत्तेच्या सव्हे प्लॅनसंबंधी केलेल्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली आहे. जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुविलेली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः३१.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९०२/०२६**
**/४९०३/**

**श्री. दिपक धयालकर,**
**द्वारा ५/४४, बी.डी.डी.चाळ,**
**गणपत जाधव मार्ग,**
**कामगार हॉस्पीटल समोर, वरळी, मुंबई-४०००१८. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**करनिर्धारक व संकलक यांचे कार्यालय,**
**करनिर्धारण व संकलक खाते,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्य कार्यालय, जुनी इमारत,**
**तळ मजला,महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप-कर निर्धारक व संकलक(जकात) यांचे कार्यालय,**
**जकात नाका इमारत,एल.बी.एस.मार्ग,**
**राणा प्रताप चौक, मुलुंड(प.), मुंबई-४०००८०. ...उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. दिपक धयालकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३१.१२.०९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीली होती.

१)मुलुंड महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी, महानगरपालिकेचे ठेकेदार आणि कर्मचारी यांचे विरुध्द कोणत्या कोर्टात भ्रष्टाचाराबाबतची केस आहे काय? त्याची माहिती द्यावी.

२)संबंधित कर्मचारी/अधिकारी विरुध्द मा.कामगार न्यायालय बांद्रा, मा.मॅट,दिवाणी न्यायालय किंवा फौजदारी न्यायालयी केस चालू आहे काय? असल्यास त्याबाबतची सविस्तर माहिती द्यावी.

३) एखाद्या अधिकारी/कर्मचारी विरुध्द कोणत्याही नागरीकांनी दावा दाखल केलेला आहे काय? (टोल नाक्यासंबंधी) असल्यास सविस्तर माहिती द्यावी.

अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ बाबत उपलब्ध असलेल्या माहितीनुसार कुठलाही दावा दाखल झालेला नाही. अर्जातील मुद्दा क्र.३ हा टोल नाक्यासंबंधी म्हणजेच महाराष्ट्र राज्य शासनाशी संबंधीत आहे असे जन माहिती अधिकारी तथा उप करनिर्धारक व संकलक(जकात) श्री.र.गो.संखे यांनी दि.२५.१.२०१० च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. अपूर्ण माहिती मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१०.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.३.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २०.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते परंतु त्यांनी द्वितीय अपीलाच्या उपस्थिती पत्रावर सही करण्यास नकार दिला. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मुलुंड महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी, ठेकेदारआणि कर्मचारी यांचे विरुध्द न्यायालयात भ्रष्टाचाराबाबत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे काय याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली आहे परंतु सदर माहितीने अपीलकाराचे समाधान झालेले नाही. सदर प्रकरणी मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने द्वितीय अपीलातील उपस्थितीपत्रावर सही करण्याचे नाकारले आहे. उत्तरवादीने पुरविलेल्या माहितीने अपीलकाराचे समाधान झलेले नाही. परंतु याबाबत अपीलकाराने आयोगासमोर काहीही खुलासा केला नाही या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:३१.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९००/०२६**

**श्री. विजय हिरालाल जैस्वाल,**
**३५, कांता निवास, डी.जे. रोड,**
**विले-पार्ले(प.), मुंबई-४०००५६. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सावंतवाडी विभाग, तालुका सावंतवाडी,**
**जिल्हा-सिंधूदूर्ग,महाराष्ट्र.**

**जन माहिती अधिकारी,**
**सावंतवाडी विभाग, तालुका सावंतवाडी,**
**जिल्हा-सिंधूदूर्ग,महाराष्ट्र. ...उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. विजय जैस्वाल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३.१२.०९ रोजी अर्ज करुन १)कुडाळ पिंगुळी कोचरा रस्त्याची सुधारणा करणे २) मठ कुडाळ पंढरपूर रस्त्याची सुधारणा करणे ३)सावंतवाडी आंबोली रस्त्याची सुधारणा करणे इत्यादीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास खालीलप्रमाणे कळविले.

कलम ७(९)अन्वये या कार्यालयांत उपस्थित राहून माहिती उपलब्ध करुन घेऊ शकता त्यासाठीचे माहिती अभिलेख पहाण्यासाठी शुल्क पहिल्या एका तासासाठी कोणतेही नाही आणि त्यापुढील प्रत्येक पंधरा मिनिटासाठी(किंवा त्याच्या प्रत्येक भागाकरीता) रुपये ५/- शुल्क असेल. तसेच माहितीच्या छायांकित प्रतीचे शुल्क रु.२/- प्रती पान भरावे लागतील.

तरी आपण या कार्यालयात उपस्थित राहून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व सहकार्य करावे. तसेच आपण कोणत्या दिवशी उपस्थित रहाणार याबाबत या कार्यालयास आगावू कळवावे म्हणजे त्याप्रमाणे माहिती दस्तऐवज पहाण्यासाठी उपलब्ध करणे सुलभ होईल.

यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.८.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २०.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी प्रथम अपीलीय अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन कुडाळ पिंगुळी, मठ कुडाळ पंढरपूर व सावंतवाडी आंबोली रस्त्याच्या सुधारणाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, उत्तरवादीने कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२९.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८९२/०२६**

**श्री. रमेशकुमार जे. चौहान,**
**फ्लॅट नं.१०४/बी,दिपक ज्योती को.ऑप.हौसिंग सो.लि.,**
**जी.डी.अंबाडकर मार्ग, काळाचौकी, परंल, मुंबई-३३. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था,मुंबई(१) शहर यांचे कार्यालय,**
**मल्होत्रा हाऊस, सहावा मजला,**
**फोर्ट, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था,एफ/एस विभाग,**
**सहकारी संस्था,मुंबई(१) शहर यांचे कार्यालय,**
**मल्होत्रा हाऊस, सहावा मजला,फोर्ट, मुंबई-४००००१. ...उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. रमेशकुमार चौहान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.११.०९ रोजी अर्ज करुन अपीलकाराने दि.७.३.०२ आणि १५.१०.२००९ रोजी अशा दोन तक्रारी केल्या होत्या. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराच्या तक्रार अर्जावर कार्यालयाकडून महाराष्ट्र सहकारी संस्थेची तपासणी लावण्यात आली आहे. तपासणी अधिका-याकडून अहवाल प्राप्त होताच अपीलकारास संबंधीत अहवाल पाठविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी दि.२४.११.०९च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१०.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास अर्जातील मुद्दा क्र.A ते Gची माहिती देण्याबाबत पुढील कार्यवाही करावी असे दि.८.१.२०१० रोजी आदेश पारित केले. यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २०.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन दि.७.३.०२ आणि दि.१५.१०.०९ च्या पत्रावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास प्रथम अपीलीय अधिका-यांनी दिलेल्या आदेशानुसार माहिती पुरविलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झ ााल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविलेली नाही यामुळे उक्त अधिनियमातील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरीता उत्तरवादीला जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:२९.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८९७/०२६**

**श्री. किशोर बापूराव ढाकणे,**
**सहयाद्री को.ऑप.हौ.सो.,**
**बि.नं.सी-२,रुम नं.२:३, सेक्टर ८ब,**
**सी.बी.डी.बेलापूर,नवी मुंबई-४००६१४. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा वरिष्ठ विधी अधिकारी,**
**महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,**
**कल्पतरु पॉईंट, २/३/४ था माळा, सिने प्लॅनेटसमोर,**
**सायन सर्कल जवळ, सायन(पूर्व), मुंबई-४०००२२.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,**
**कल्पतरु पॉईंट, २/३/४ था माळा, सिने प्लॅनेटसमोर,**
**सायन सर्कल जवळ, सायन(पूर्व), मुंबई-४०००२२. ...उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. किशोर ढाकणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.७.१२.०९ रोजी अर्ज करुन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या आस्थापनेवर कंत्राटी कनिष्ठ संशोधक यांच्या पुनर्नियुक्तीसाठी सचिव,पर्यावरण विभाग अथवा अध्यक्ष यांच्याकडून प्राप्त झालेल्या दि.१७.९.०८ च्या कार्यालयीन टिप्पणीची छायाप्रत,लक्षवेधी सूचनेच्या आश्वासनपूर्तीच्या अहवालाची प्रत इत्यादी सेवाविषयक बाबीसंबंधी एकूण ७ मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नसल्याच्या कारणावरुन प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.७.१.०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास अर्जातील मुद्दा क्र.३ व ४ बाबत माहिती पुरवण्याबाबत दि.२०.१.०१० रोजी आदेश पारित केले. अपूर्ण, चुकीची माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २०.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सेवाविषयक बाबीसंबंधी एकूण ७ मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगास लेखी अहवाल सादर करुन असे प्रतिपादन केले की, कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरविण्यात आली आहे. अपीलावरील सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांनी वस्तुस्थिती,वास्तविकता सादर केली. यावरुन असे उघड होते की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली आहे. परंतु यामुळे अपीलकाराचे समाधान झाले नाही. माहितीच्या अधिकारानुसार अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली किंवा नाही याबाबत माहितीच्या अधिकारात खात्री करण्यात येते. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः३१.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८९८/०२६**

**ॲड.श्री. रामचंद्र एन.कच्छवे,**
**९८,२रा मजला, एस्प्लनेड मॅन्शन,**
**काळा घोडा,फोर्ट, मुंबई५ ४०००२३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**शालेय शिक्षण विभाग,**
**४था मजला, मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**शालेय शिक्षण विभाग,**
**४था मजला, मंत्रालय, मुंबई-४०००३२.** **...उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. रामचंद्र कच्छवे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.११.०९ रोजी अर्ज करुन महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त शाळांबाबत एकूण ५ मुद्यांबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे दि.२१.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २०.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन माध्यमिक शाळेच्या मान्यतेसाठी शासनाकडे महाराष्ट्रातील विविध भागातून किती अर्ज प्राप्त झाले आहेत२)अर्जदारांनी अर्जासोबत भरलेली एकूण किती रक्कम जमा झाली आहे ३)शालेय शिक्षण

विभागाने किती अर्जदारांना माध्यमिक शाळेची परवानगी दिली आहे ४) ज्या अर्जदारांना माध्यमिक शाळेकरीता मान्यता दिली नाही त्यांची अर्जासोबत भरलेली शुल्काची रक्कम परत केली का? ५)माध्यमिक शाळा मंजूरीबाबत शासनाने कोण्त्या शर्ती अटी निश्चित केल्या आहेत याबाबत माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती संचालक(प्राथमिक)व संचालक (माध्यमिक) स्तरावरची असल्याने अपीलकारास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग श्री.अ.मा.भट्टलवार यांनी दि.२०.१.०१० च्या पत्रान्वये अपीलकारास अवगत करुन संचालकांना कळविले आहे. यावरुन सदर प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)चे पालन केले आहे. तरी सदर प्रकरणी अपीलकाराने आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी संचालक(प्राथमिक) व संचारलक (माध्यमिक) शालेय शिक्षण विभाग यांचेकडे संपर्क साधणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:३१.५.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७८९/०२६**

**श्री. सुनिल एस. कौशिक,**
**फ्लॅट नं.१००४,कैलाश टॉवर,**
**एस.एम.शेट्टी शाळेजवळ, पवई,**
**मुंबई-४०००७२.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी ,**
**मार्केटींग डायरेक्टर, रुम नं.१९, म्हाडा बिल्डिंग,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**मार्केटींग डायरेक्टर, रुम नं.१९, म्हाडा बिल्डिंग,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** **...उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. सुनिल कौशिक यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.८.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.९.२००९ रोजी अर्ज करुन दुकान विक्रीबाबत एकूण ७ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.३.१२.०९ रोजी प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ६.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन खोपरी गाव, पवई सी.टी.एस.क्र.१,१/१ ते १/१७, ७/४ ते ७/२३ पवई, मुंबई येथील पुनर्वसीत इमारतीतील दुकान विक्रीबाबत एकूण ७ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन

माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी  असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी  हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२९.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८०६/०२६**

**श्री. के.एन.के.थंपन पनिकर,**
**१०५,धीरज व्हॅली टॉवर्स को.ऑप.हौ.सो.,**
**मोहन गोखले रोड, गोरेगाव(पूर्व),**
**मुंबई-४०००६३. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था(३) मुंबई यांचे कार्यालय,**
**गृहनिर्माण भवन, कक्ष क्र.६९,**
**तळमजला, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था(३) मुंबई यांचे कार्यालय,**
**गृहनिर्माण भवन, कक्ष क्र.६९,**
**तळमजला, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ...उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. के.एन.के.थंपन पनिकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.९.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन धीरज व्हॅली सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाची एम-२० बंधपत्राच्या सत्यप्रती, दि.५.१.२००९च्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती, नोंदणीची कागदपत्रे, संस्थेस केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती, शेवटच्या लेखापरिक्षण अहवाल, निवडणूकीचा अहवाल इत्यादी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था पी-विभाग यांनी अपीलकारास मुद्देनिहाय माहिती ३० दिवसाचे आत पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२८.१०.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ७.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित नव्हते, जन माहिती अधिकारी उपस्थित होते.सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.तसेच सुनावणीच्या वेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन धीरज व्हॅली, सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर तक्रारीवरील सुनावणीचेवेळी उत्तरवादीने आयोगास लेखी अहवाल सादर केला. सदर अहवालाचे अवलोकन केले असता अपीलकारास उत्तरवादीने दि.८.४.०९च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याने या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२९.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८८१/०२६**

**श्री. निपुण मठकर,**
**बी-५,जीवदानी कृपा चाळ,रामचंद्र जाधव वाडी,**
**विजय नगर, नालासोपारा(पूर्व), ठाणे-४००२०८. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**नालासोपारा म्युनिसिपल कौन्सिल,**
**नालासोपारा(पूर्व), नालासोपारा स्टेशन.**

**जन माहिती अधिकारी,**
**नालासोपारा म्युनिसिपल कौन्सिल,**
**नालासोपारा(पूर्व), नालासोपारा स्टेशन. ...उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. निपूण मठकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२.६.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन नालासोपारा नगरपरिषदेबाबत भारतीय नागरिकांनी मा.उच्च न्यायालय,मुंबई, मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरणाची माहिती,उक्त अधिनियमातील कलम २५ प्रमाणे तयार करावयाचा अहवाल, नागरी कमाल जमिन धारणाबाबतची माहिती इत्यादी अनुषंगिक विविध मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.४.४.०९ च्या पत्रानवये अपीलकारास माहिती पुरविली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही.यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १९.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता, अपीलकार उपस्थित होते,जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते.सुनावणीचेवेळी

अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.तसेच सुनावणीच्या वेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन नालासोपारा नगरपरिषदेबाबत विविध मुद्यांवर माहिती मागीतली होती. द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता उत्तरवादी हजर नव्हते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून अपीलकारास मागणीनुसार कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती ३० दिवसाचे आत पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२८.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८८३/०२६**

**श्री. निपुण मठकर,**
**बी-५,जीवदानी कृपा चाळ,रामचंद्र जाधव वाडी,**
**विजय नगर, नालासोपारा(पूर्व), ठाणे-४००२०८.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**बृहन्मुंबई इलेक्ट्रीक सप्लाय अँड ट्रान्सपोर्ट,**
**बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, पास्ट बॉक्स नं.१९२,**
**मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई इलेक्ट्रीक सप्लाय अँड ट्रान्सपोर्ट,**
**बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, पास्ट बॉक्स नं.१९२,**
**मुंबई-४०० ००१.** **...उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. निपूण मठकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.८.६.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २५ अनुसार प्रत्येक वर्ष समाप्त झाल्यानंतर त्या वर्षातील अंमलबजावणीबाबतचा अहवाल तयार करुन शासनाकडे, विधानमंडळाच्या दोन्ही सदनासमोर ठेवण्याकरीता पाठवावयाचा आहे, याबाबत केलेल्या कारवाईची अनुषंगिक माहिती मागीतली होती. संपूर्ण माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.६.४.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास हव्या असलेल्या माहितीसंबंधीची कागदपत्र तयार ठेवण्यात आली आहेत. कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत कागदपत्राचे निरिक्षण करावे असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२१.४.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यमुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १९.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता, अपीलकार उपस्थित होते,जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते.सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.तसेच सुनावणीच्या वेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २५ अनुसार वार्षिक अहवाल तयार करण्याबाबत केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत आवश्यक ती माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२९.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८८६/०२६**

**श्री. मोहम्मद युसुफ खान,**
**१०२/ए, सिगुल को.ऑप.हौ.सो.लि.,**
**मालाड(प.), मुंबई-४०००६४. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता(पी/उत्तर),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक महानगरपालिका आयुक्त पी/उत्तर यांचे कार्यालय,**
**लिबर्टी गार्डन, मालाड(पश्चिम),**
**मुंबई-४०००६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(जलकामे),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक महानगरपालिका आयुक्त पी/उत्तर यांचे कार्यालय,**
**लिबर्टी गार्डन, मालाड(पश्चिम),**
**मुंबई-४०००६४. ...उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.मोहम्मद युसुफ खान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.३.२०१० रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.९.११.०९ रोजी अर्ज करुन संस्थेतील प्रत्येक सदनिकेस पाण्याचा पुरवठा करण्याबाबत काय प्रमाणक आहे, किती घ.लि.पाणी साठवणी क्षमता असलेली पाण्याची टाकी हवी आहे,प्रत्यक्षात पाण्याच्या टाकीची पाणी साठवण क्षमता किती आहे तसेच पाण्याच्या कनेक्शनबाबत माहिती मागीतली होती. प्रत्येक सदनिकेस प्रत्येक दिवशी ४५० लिटर पाण्याचा पुरवठा करण्याचे प्रमाणक आहे. २९०० गॅलन पाणी साठवणूक टाकी बांधण्यास परवानगी दिलेली आहे. पीएनजी १८१०००९ आणि पीएनजी १८१०००८ या दोन्ही पाणी जोडणेची कागदपत्र सापडत नाहीत असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.९.१२.०९ च्या पत्रान्वये कळविले.

यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.३०.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १९.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता, अपीलकार उपस्थित नव्हते,जन माहिती अधिकारी उपस्थित होते.सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.तसेच सुनावणीच्या वेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन पाणी पुरवठयाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी यापूर्वी अपीलकारास पुरविलेल्या माहिती व्यतिरिक्त अधिकची माहिती निःशुल्करित्या अपीलकारास पुरवावी.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२८.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८९३/०२६**

**श्री. अब्दुल गफूर का.हुणशाळ,**
**हॉटेल प्रेसिडेंट, महाराष्ट्र नगर,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी(अति./निष्का.),**
**अपर जिल्हाधिकारी(अति./निष्का.)यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, सरकारी वसाहत,७वा मजला,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार(अति./निष्का.)**
**अपर जिल्हाधिकारी(अति./निष्का.)यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, सरकारी वसाहत,७वा मजला,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ...उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.अब्दूल हुणशाळ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२.५.२०१० रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.१०.०९ रोजी अर्ज करुन हनुमान प्रसाद सैनि यांचे उक्त क्षेत्रातील परिशिष्ट-II मधील नाव काढण्यात आल्याबद्दल,भवरलाल बनवारीलाल सैनि यांनी स्वतःच्या मृत भावाच्या नावे महाराष्ट्र नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.च्या पदाचा उपाध्यक्ष या नावाने गैरफायदा घेऊन हनुप्रसाद सैनि मृत भावाच्या नावे खोली पार करुन घेतली याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या मुद्दा क्रमांक १ बाबत श्री.हनुमान प्रसाद सैनि यांचे नाव अद्याप कमी केले नाही. तसेच मुद्दा क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई कार्यालयाकडून केली जात नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.५.९.०९च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.३१.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.४.१.२०१० रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २०.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता, जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच सुनावणीच्या वेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी उत्तरवादीने आयोगासमोर असे प्रतिपादन केले की, अपीलकाराने मागणी केलेली माहिती अपीलकारास पुरविण्यात आली आहे. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविली असल्याने या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२८.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८९४/०२६**

**श्री. गजानन बाजीराव बाबर,**
**एच/१ न्यू साईनाथ कॉलनी,**
**रामदासवाडी, मुरबाड रोड,**
**कल्याण(प.), जि.ठाणे-४२१३०४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण निरिक्षक(उत्तर विभाग),**
**प्रशासकीय इमारत,फाईन आर्ट गॅलरी जवळ,**
**चेंबूर(पूर्व), मुंबई-४०००७१.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**मराठी विद्यालय, पंतनगर, घाटकोपर(पूर्व),**
**मुंबई-४०००७५.** **...उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.गजानन बाबर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.९.१०.०९ रोजी अर्ज करुन सेवाजेष्ठता यादी, बिंदू नामावली, मुख्याध्यापकाचे रोस्टर, उपमुख्याध्यापकाचे रोस्टर, निवडयादी, बी.सी.मुख्याध्यापक यादी, बी.सी.उपमुख्याध्यापक यादी,बी.सी.पर्यवेक्षक यादी इत्यादी अनुषंगिक एकूण १२ मुद्यांबाबत माहिती मागीतली होती. माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २०.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता, जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते. अपीलकार

उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच सुनावणीच्या वेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सेवाविषयक अनुषंगिक एकूण १२ मुद्यांबाबत माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती टपालातून पाठविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती टपालातून पाठविण्यात आली असल्याचे पत्रान्वये कळवावे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:२८.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४८९५/०२६**

**श्री. रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज,**
**घनश्यामदास चाळ, रुम क्र.२,**
**संत रोहिदास मार्ग, काळा किल्ला,**
**धारावी, मुंबई-४०००१७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन,५वा माळा,बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी-१,**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन,५वा माळा,बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.** **...उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.रामशंकर सरोज यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.९.०९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

सदर संस्था समता बी SRAसह गृहनिर्माण संस्था-धारावी अंतर्गत मा.सहाय्यक निबंधक,SRA(म्हाडा) यांचे प्रतिनीधी श्री.पगारे व त्यांचे सहयोगीसह सदर संस्थाच्या इमारतीत राहणारे सभासदांचे सर्वेक्षण(Serve) दिनांक १६.९.०९ रोजी केले होते. या सर्वेक्षणचे संपूर्ण अहवाल व यादीची साक्षांकित प्रत मिळण्याबाबत.

संस्थेच्या सर्वेक्षणासंबंधीची कार्यवाही चालू असून अद्याप ती पूर्ण झालेली नाही. त्यामुळे सदर माहिती पुरविणे अशक्य आहे. सर्वेक्षणाची कारवाई पूर्ण होताच माहिती पुरविता येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१९.११.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने

अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे दि.१६.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केल. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास १५ दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे दि.१०.२.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २०.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता, जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच सुनावणीच्या वेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन समता-बी एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था धारावी अंतर्गत सहाय्यक निबंधक(एसआरए)म्हाडा यांचे प्रतिनिधींनी संस्थांच्या इमारतीत राहणा-या सभासदांचे सर्वेक्षण केले होते. सदर सर्वेक्षण अहवाल व यादीची प्रत मागीतली होती. अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती पुरविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता अपीलकार हजर होते. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२९.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७७८/०२६**

**श्री. रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज,**
**घनश्यामदास चाळ, रुम क्र.२,**
**संत रोहिदास मार्ग, काळा किल्ला,**
**धारावी, मुंबई-४०००१७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,**
**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग,**
**९हजारीमल सोमाजी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस समोर,**
**मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक,**
**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग,**
**९हजारीमल सोमाजी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस समोर,**
**मुंबई-४००००१.** **...उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.११.०९ रोजी अर्ज करुन अपीलकाराविरुध्द गु.र.क्र.११९/०९, कलम ३५४ भा.दं.वि.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला त्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत परंतु जन माहिती अधिका-यांनी पोलीस उप आयुक्त,परि.-५ वरळी, मुंबई यांच्या दि.२४.९.०९ च्या अहवालाची प्रत अपीलकारास दिली.यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता, जन माहिती अधिकारी उपस्थित होते.अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन

माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच सुनावणीच्या वेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन गु.र.क्र.११९/०९, कलम ३५४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-५ वरळी, मुंबई यांच्या दि.२४.९.०९च्या अहवालाची प्रत उत्तरवादीने अपीलकारास दिली असल्याचे अपीलकाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-५ यांचे कार्यालयाकडून सदर प्रकरणाशी संबंधीत प्राप्त झालेल्या इतर कागदपत्रांच्या छायाप्रती जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास पुरवाव्यात. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२९.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७७९/०२६**

**श्री. रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज,**
**घनश्यामदास चाळ, रुम क्र.२,**
**संत रोहिदास मार्ग, काळा किल्ला,**
**धारावी, मुंबई-४०००१७.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**सहाय्यक पालिका आयुक्त जी/उत्तर विभाग कार्यालय,**
**झोपडपट्टी सुधारणा खाते, तळमजला(खोली क्र.१४),**
**महानगरपालिका इमारत,हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर,मुंबई५ ४०००२८.**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी,जी/उत्तर,**
**सहाय्यक पालिका आयुक्त जी/उत्तर विभाग कार्यालय,**
**झोपडपट्टी सुधारणा खाते, तळमजला(खोली क्र.१४),**
**महानगरपालिका इमारत,हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर,मुंबई५ ४०००२८.** **...उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.११.०९ रोजी अर्ज करुन झोपडपट्टी पुनर्वसन योजना मौजे धारावी तालुका धारावी न.भू.क्र.१८१ ओमदत्त सहकारी गृहनिर्माण संस्था(मर्या.) महाराष्ट्र झ ाोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३३ अन्वये कार्यवाहीबाबत मागणी केली होती. अपीलकाराने अपेक्षीलेल्या माहितीबाबत सध्या कार्यवाही चालू आहे अंतीम कार्यवाहीनंतर कागदपत्राच्या प्रती देण्यात येतील असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१७.१२.०९च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.३१.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलावर

समाधानकारक निर्णय दिला नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ५.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच सुनावणीच्या वेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३३ नुसार कार्यवाही करुन व सदनिका सिल करुन प्राधिकरणाचेवतीने आपल्या कब्जात घेणेबाबत मागणी केली होती. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर प्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवाल अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरवावा.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२९.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७९९/०२६**

**श्री. निशांत सुभाष घाडगे,**
**२१/२, गोकूळ, डॉ.पेडणेकर बिल्डिंग,**
**स.म. मार्ग, कुर्ला(प.), मुंबई-७०. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, कलानगर,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, कलानगर,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. ...उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. निशांत सुभाष घाडगे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.९.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.५.१२.०९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

मुंबई झोपडपट्टी सुधारमंडळ यांच्यामार्फत होणा-या खासदार,आमदार तसेच विधान परिषद सदस्य यांच्या निधीतून व इतर विविध प्रकारच्या निधीतून होणारी विविध विकास कामे, सुधार कामे, करणा-या ठेकेदार(कॉट्रॅक्टर)मजूर संख्या तसेच सुशिक्षित बेरोजगार संख्या या सर्व म्हाडाच्या नोंदणीकृत तसेच अनोंदणीकृत संस्था व आजपर्यंत मुं.झो.सु.म.मार्फत कामे करणाऱ्या संस्था,फर्म, तसेच भागीदार फर्म यांची संपूर्ण लेखी व शुद्ध मराठी भाषेत आपल्या कार्यालयात उपलब्ध असणारी सर्वच्या सर्व माहिती मिळावी. उदा.सदर १)संस्थेचे नाव व संपूर्ण पत्ता २)अध्यक्ष व मुख्य प्रवर्तकाचे नाव व संपूर्ण पत्ता ३)संस्था व ठेकेदाराची गुणवत्ता व वर्गवारी या सर्व विषयांची आपल्या कार्यालयात उपलब्ध असणा-या माहितीचे छायांकित प्रती मिळाव्यात.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१०.९.०९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.४.१.०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास सत्वर विनाशुल्क माहिती पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. त्यानंतर अपीलकाराने माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ६.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच सुनावणीच्या वेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाच्या माध्यमातून सुधारकामे करणा-या संस्थांची सर्वच्या सर्व माहिती मिळण्याची मागणी केली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोठया प्रमाणात असून संदीग्ध स्वरुपात आहे. म्हणून अपीलकाराने विशिष्ट स्वरुपाची माहिती मागावी असा अपीलकारास आयोगाचा सल्ला आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२९.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/९१८/०२**
**/९१९/**

**श्री. हेमंत गो.चव्हाण,**
**मु.पो.उरण बाजारपेठ,**
**तालुका-उरण,**
**जि.रायगड-४००७०२. ..... तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग(रस्ते),**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. हेमंत गो.चव्हाण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१३.३.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२६.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२४.११.०७ रोजी अर्ज करुन नगर विकास विभागात (मंत्रालय)एकूण किती अधिकारी आहेत,महाराष्ट्रात एकूण नगरपालिका किती आहेत त्यांचे पत्ते इत्यादी एकूण ६ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत आवश्यक ती माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्रापत झाल्यापासून ३० दिवसाचे आत तक्रारदारास माहिती पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई (रामानंद तिवारी)**
**दिनांकः२९.५.२०१० राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/९१६/०२**

**श्री.मधुसूदन पाडळकर,**
**परिस, अंतिम भूखंड क्र.१४०/७,**
**डॉ.घोडके यांचे हॉस्पीटलचे मागे, लाईन आळी,**
**पनवेल शहर,पनवेल-४१० २०६.** ..... **तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी,**
**तहसिलदार, पनवेल तहसिल कार्यालय,**
**पनवेल-४१० २०६.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.मधुसूदन पाडळकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.६.३.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२६.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.६.१०.०७ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

आपल्या अधिकार क्षेत्रातील गावे औवे,मोहो ईत्यादी ठिकाणी असलेल्या मिळकती सरकारच्या मालकीच्या नसून गावकीच्या मालकीच्या आहेत त्यांची विक्री अगर अन्य मार्गाने गावकीच्या हिताच्या दृष्टीकोनातून विल्हेवाट लावण्यासाठी सरकारकडून परवानगी घेणे आवश्यक असल्याचे समजते व तसे असल्यास सरकारच्या परवानगीची ही अट कोणत्या कायद्याच्या अगर सरकारी अधीसूचनेच्या अनुषंगाने घातली जाते याची माहिती मला देण्यात यावी ही विनंती. याबाबतीत उपनिबंधक पनवेल यांना दिलेल्या पत्राची एक प्रत मला देण्यात यावी त्याची फी मी भरण्यास तयार आहे.

गैरतक्रारदाराने तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. यामुळे प्रथम अपील दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे थेट तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी गैरतक्रारदार तथा तहसिलदार पनवेल यांनी तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. गैरतक्रारदाराची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७चा भंग झाला आहे. गैरतक्रारदार तक्रारीवरील सुनावणीकरीता आयोगासमोर हजर का झाले नाहीत. याकरीता गैरतक्रारदार यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई सुरु का करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाच्या आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**<u>आदेश</u>**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३१.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/९३१/०२**

**श्रीमती मॅगी डिसील्व्हा,**
**एफ/३, प्रभू कृपा नगर, वैभव प्लाझाच्या समोर,**
**नवीन बरामपूर, वसई(प.),**
**ठाणे-४०१२०२.** ..... **तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी,**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका,**
**छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर(प.),**
**पिन कोड-४०११०१.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्रीमती मॅगी डिसील्व्हा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.७.३.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२८.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन घर क्र.५६ व ५७ च्या परिसरातील के.सी.किंचन, इंडियन चायनीज हॉटेल श्री.जगदिश डेकोरेटर मंडप व गोदाम तसेच पाटील झेरॉक्स व टायपिंग या अनधिकृत व्यवसायाबाबत तकार केली होती. तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता श्री.ख्रिस्तोफर मार्टीन डिसिल्व्हा यांनी दिवाणी न्यायाधीश, ठाणे येथे दावा रे.मु.नं.४४३/२००५ दि.१०.८.२००५ अन्वये दावा दाखल केला असून सदरची कामे ही न्यायप्रविष्ठ आहेत. तसेच सदर हॉटेलबाबत महानगरपालिका मिरा-भाईंदर यांनी श्री.ख्रिस्तोफर मार्टीन डिसिल्व्हा यांना दि.१९.६.०७ रोजी व्यवसायाबाबत त्यांचे समक्ष कागदपत्रे सादर करण्याची नोटीस दिली असल्याचे गैरतक्रारदाराने दि.२२.६.०७, दि.२२.२.०८ च्या पत्रान्वये तक्रारदारास कळविले आहे. यामुळे समाधान झाले नसल्याने, माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी तक्रारदारास गैरतक्रारदाराने अद्याप माहिती पुरविलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत तक्रारदारास आवश्यक ती माहिती पुरवावी.

## आदेश

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:३१.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८८४/०२**

**श्रीमती मृणालीनी मनिष राणे,**
**प्रतिक्षा नगर, बिल्डिंग नं.२०,**
**सायन, मुंबई-४०००२२.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी,**
**संक्रमण शिबीर विभाग,**
**गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्रीमती मृणालिनी राणे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१७.६.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२.५.०९ रोजी अर्ज करुन प्रतिक्षानगर सायन संक्रमण शिबिर मधील जुनी इमारत क्र.२ मधील एकूण ७० खोल्यांबाबत माहितीचा तपशील मागीतला होता. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकाडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी तक्रारीवरील सुनावणीकरीता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार दोन्ही हजर नव्हते. तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी केली असता तक्रारदारास माहिती पुरविण्यात आलेली नाही असे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी. तक्रारदारास गैरतक्रारदाराने आयोगाच्या आदेशानुसार माहिती पुरविली नाही तर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार गैरतक्रारदाराविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई सुरु करण्यात येईल.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:३१.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/९३०/०२**

**श्री. हेमंत गो.चव्हाण,**
**उरण कोठार गल्ली,मु.पो.उरण बाजारपेठ,**
**तालुका-उरण,**
**जि.रायगड-४००७०२.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**उरण तहसिल कार्यालय, म.पो.उरण,**
**ता.उरण,जि.रायगड.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. हेमंत गो.चव्हाण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१४.३.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२८.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते.सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.९.१२.०७ रोजी अर्ज करुन उरण तहसिल क्षेत्रात महसूल विभागाच्या मालकीची जमिन किती आहे आणि कोणत्या ठिकाणी, कोणत्या गावात आहे, त्याचा संपूर्ण तपशिल द्यावा इत्यादी एकूण २८ मुद्यांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१३.३.०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराने तक्रारदारास पाठविलेल्या माहितीचा एक संच आयोगास सादर करुन तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आह.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२९.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/९१३/०२**

**श्री. मनोहर नानाजी निकम,**
**माल प्लाझा को.ऑप.हौ.सोसायटी,**
**बी-२०२, सुभाषनगर, कर्जतरोड,**
**कुळगांव-बदलापूर(पूर्व),**
**ता.अंबरनाथ, जि.ठाणे. ..... तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,महावितरण अधिकारी यांचे कार्यालय,**
**डायरेक्टर ऑफ व्हिजीलन्स अँड सिक्युरिटी,**
**फ्लाईंग स्क्वाड कल्याण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या.,**
**तेजश्री,५वा मजला, कर्णिक रोड, कल्याण(प.),**
**ठाणे -४२१३०१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. मनोहर निकम यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.७.३.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२६.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते.सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१.१.०८ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)किती घरगुती (एल.टी.आय.)विज ग्राहकांचे विज मिटर तपासणी (Inspection)केले कृपया ते कळवावे

२)वरील (१)मधील ग्राहकांची यादी(नाव, पत्ता)मिळावी

३)वरील(१)मधील विज ग्राहकांना Compounding Charge व Under Claime-१३५ Charge किती आकारला आहे ते कळवावे या लोकांची यादी(नांव,पत्ता,कंपाऊंडींग चार्ज व इतर)कळवावे

४)अशा लोकांना दिलेल्या रिसीट व बील(कंपाऊंडींग चार्ज व अंडरक्लेम -१३५) Certified True Copy कृपया मिळावे

५) वीज मिटर तपासणीची(Inspection) विस्तृत (Detailed)पध्दती(Procedure) कृपया कळवावी.

६)वरील (१)मधील किती वीज ग्राहकांचे वीज मिटर बदलण्यात आले अशा ग्राहकांची नावे,पत्ते व त्यांना आकारण्यात आलेले बिल याची माहिती कळवावी आणि मिटर बदलण्याची कारणे कृपया कळवावी.

७)Spot Inspection Report बनवायची जागा कोणती असायला हवी(मिटरच्या जवळ किंवा एम.एस.ई.बी.च्या ऑफीसमध्ये)ते कृपया कळवावे

८) Reportची भाषा महाराष्ट्राची मायबोली मराठी असणे बंधनकारक आहे का ते कृपया कळवावे

९)Spot Report वीज ग्राहकास(Consumer)समजावून सांगणे आवश्यक आहे का कृपया ते कळवावे.

गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.५.५.०८च्या पत्रान्वये मुद्देनिहाय सविस्तर माहिती पुरविली. दरम्यानच्या कालावधीत माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगास लेखी अहवाल सादर करुन तक्रारदारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती पुरविण्यात आली असल्याचे प्रतिपादन केले. तक्रारीवरील सुनावणीकरीता तक्रारदार हजर नव्हते. सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:३१.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/९३३/०२**

**श्री. व्ही.एम.डोईफोडे आणि कं.,**
**चेंबर नं.४४/४५,५ वा मजला,**
**२८५,सुचेता निवास,**
**शहिद भगतसिंग रोड,फोर्ट, मुंबई-४०००१.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक(टाऊन सर्व्हीस),**
**सिटी अँड इंडस्ट्रीअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्रा लि.,**
**सिडको भवन,सी.बी.डी. बेलापूर,**
**नवी मुंबई-४००६१४.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. व्ही.एम.डोईफोडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.३०.१०.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२८.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते.सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.३०.१०.२००९ रोजी अर्ज करुन वाशी नवी मुंबई येथील सेक्टर-१२ मधील सदनिका क्र.६५ या निवासी सदनिकेसंबंधी दि.२५.१०.२००० रोजी केलेल्या लीज डीडच्या प्रतीची मागणी केली होती. तसेच भोगवटा प्रमाणपत्राची प्रत मागीतली होती. गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित वेळेत पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराने आयोगासमक्ष तक्रारदारास माहिती पुरविली. सदर प्रकरणी माहिती पुरविण्यात आली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:३१.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/९३४/०२**

**श्री. विलास शंकर चौधरी,**
**११२,भंडारवाडा, वसई,**
**पो.वसई,जि.ठाणा, पिन-४०१२०१. ..... तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा निरिक्षक,**
**वसई तालुका(निरिक्षक)भूमिलेख,**
**वसई कार्यालय,जि.ठाणे. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. विलास चौधरी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.५.११.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२८.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.३.८.२००९ व २९.८.२००९ रोजी अर्ज करुन वसई निरिक्षक तालुका भूमिलेख,वसई, अधिक्षक भूमि अभिलेख ठाणे येथील कार्यालयाच्या भ्रष्टाचारी व अयोग्य कारभाराविषयी चौकशीची मागणी केली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराच्या प्लॉटवरील कर्जाची नोंद काढून टाकण्याबाबत सन १९५५ मध्ये आदेश काढण्यात आले आहेत. सदर नोंद अंतीमतः सन २००९ मध्ये काढण्यात आली असे गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. तक्रारदारास घर बांधण्यास दिरंगाई झालेली आहे. संबंधीत अधिकारी वर्गावर योग्य उपाय योजना करावी असा तक्रारदाराने तक्रारीत मुद्दा उपस्थित केला आहे. माहितीच्या अधिकारात उपलब्ध माहिती पुरवावी ही मुख्य बाब असल्याने सदर प्रकरणी माहितीच्या अधिकारात काही करता येणार नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई (रामानंद तिवारी)**
**दिनांक:३१.५.२०१० राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/९२६/०२**

**श्री. नागेश वसंत परळकर,**
**सावित्री,१ला मजला, ६४ एन.एल.परळकर मार्ग,**
**परळ, मुंबई-४०००१२ ..... तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र.)शहर-III,**
**ई वार्ड, म्युनिसिपल ऑफीस, ३रा मजला,**
**१०,एस.के. हफीझुद्दीन मार्ग, भायखळा,मुंबई-४०० ००८. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. नागेश परळकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२२.३.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२८.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.३१.१.०८ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)६६बी,नानाभाई लक्ष्मण परळकर मार्ग,परळ, मुंबई-४०००१२ येथे साईधाम इमारत आहे. या साईधाम इमारतीच्या मागील बाजूस मेसर्स माणिक डेव्हलपर्स यांच्यातर्फे एक दत्तएन्क्लोव नावाच्या इमारतीचे बांधकाम चालू आहे.

या दत्तएनक्लोव इमारतीपर्यंत ॲम्ब्युलन्स अथवा फायर ब्रिगेडचा बंब किंवा कोणतेही चार चाकी वाहन नेण्या जाण्यासाठी ॲप्रोच रोडच अस्तित्वात नाही. महानगरपालिकेने अशा ठिकाणी या इमारतीस बांधकामास परवाना मान्य केलेला आहे का?

२)या दत्तएन्क्लोव इमारतीचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत आहे तरीही या दत्तएन्क्लोव इमारतीमध्ये सदनीकाधारक वास्तव्य करीत आहेत.महानगर पालिकेने या दत्तएन्क्लोव इमारतीमध्ये वास्तव्याचा परवाना मान्य केलेला आहे का?

गैरतक्रारदाराने तक्रारदारास पत्र पाठवून संबंधीत धारिणी व कागदपत्रे उपलब्ध असून सदर धारिणीची पाहणी करुन आवश्यक ते नियमानुसार शुल्क महानगरपालिकेस अदा करुन आवश्यक असलेल्या छायाप्रती उपलब्ध करुन द्याव्यात असे कळविलेले आहे. परंतु तक्रारदार कार्यालयातील कागदपत्रांची पहाणी करण्याकरीता कार्यालयाकडे फिरकलेच नाहीत. यामुळे समाधान झाले नाही तर

अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करणे आवश्यक होते. परंतु अपीलकाराने प्रथम अपील दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे थेट तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविणे सोईचे व्हावे म्हणून संबंधीत धारिणीची प्रथम पहाणी करण्याची विनंती केली होती. परंतु तक्रारदार कार्यालयात संबंधीत कागदपत्राच्या पहाणीकरीता गेलेच नाहीत. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, तक्रारदाराने प्रथम कार्यालयात हजर राहून संबंधीत धारिणीची पहाणी करावी, हव्या असलेल्या कागदपत्रांची निवड करावी. त्यानतर गैरतक्रारदाराने तक्रारदारास हव्या असलेल्या निवडक कागदपत्राच्या छायाप्रती पुरवाव्यात.

**आदेश**

**तक्रार अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३१.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८८६/०२**

**श्री. महेश सूजी,**
**५/१० बरोटो कंपाऊंड, डी-मोन्टे लेन,**
**ऑरलेम चर्च,मालाड(प.), मुंबई-४०००६४.** ..... **तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक,महाराष्ट्र वैद्यकीय परिषद,**
**१८९-अे, आनंद कॉंप्लेक्स,२रा मजला,**
**साने गुरुजी मार्ग, आर्थर रोड नाका,चिंचपोकळी(प.),**
**मुंबई-४०००११.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. महेश सूजी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१५.६.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२७.२.०९ रोजी अर्ज करुन मार्वे रोड, मालाड(प.),मुंबई-६४ येथील परुळकर नर्सिंग होम, मालाड, मुंबई विरुध्द केलेल्या दि.६.२.०९ च्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. तक्रारदारास गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल न करता तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे थेट तक्रार दाखल केली.

परुळकर नर्सिंग होम विरध्द कारवाई करण्याची बाब महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या अखत्यारीत येत नसल्याने नर्सिंग होम विरुध्द कारवाई करण्याबाबत अतिरिक्त आयुक्त-हेल्थ, मुंबई महानगरपालिका, मुंबई यांचेकडे संपर्क करावा असे तक्रारदारास कळविले. तक्रारदाराचा अर्ज अतिरिक्त आयुक्त, आरोग्य विभाग, मुंबई महानगरपालिका मुंबई-१ यांच्याकडे दि.९.४.०९ च्या पत्रान्वये पाठविला. तसेच तक्रारदाराचा अर्ज दि.८.५.०९ रोजी पुढील योग्य कारवाईकरीता संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य भवन, मुंबई यांच्याकडे सुध्दा पाठविला. तसेच याबाबत तक्रारदारास अवगत

करण्यात आले आह असे जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद यांनी तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी गैरतक्रारदार महारारष्ट्र वैद्यकीय परिषदेशी संबंधीत नाही. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५मधील कलम ६(३)अनुसार तक्रारदाराचा अर्ज संबंधीत कार्यालयाकडे हस्तांतरीत केला आहे असे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः३१.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८६६/०२**

**श्री.बाळासाहेब विनायक कळकर्णी,**
**७/३०३, शिवाजीनगर- शिवकिरण,**
**डॉ.ए.बी. रोड, वरळी, मुंबई-४०००३०** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी(प्राथ.),**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,**
**४था माळा, मंत्रालय, मुंबई-४०००३२.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. बाळासाहेब कुळकर्णी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२२.७.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२१.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.३०.१.०८ रोजी अर्ज करुन जनरल एज्युकेशन इन्स्टिटयुट ट्रस्ट यांच्या ठाणे येथील प्राथमिक शाळेतील ५ शिक्षकांना शासकीय मान्यता प्राप्त पगार व भत्ते न मिळाल्याबाबत तक्रार केली होती. या संदर्भात मंत्रालय नोंदवही पुस्तक क्रमांक २४४ दि.१५.२.०७,४३६९, दि.१६.८.०७ व ३७७६ दि.३०.१०.२००७,शासकीय आदेशाबाबत प्रगती संबंधी माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग झाला आहे. यासाठी जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३१.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/९०२/०२**

**श्री. ज.ना.संदानशिव,**
**वकील, उच्च न्यायालय,**
**१/१, झाकिर मंझील, आनंद नगर,**
**साज सिनंमा समोर, सरदार प्रतापसिंग मार्ग,**
**भांडूप(प.), मुंबई-४०००७८. ..... तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा अपर चिटणीस**
**जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, १०वा मजला,**
**सरकारी वसाहत, बांद्रा(पू.), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. ज.ना.संदानशिव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२१.३.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२६.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२३.१.०८ रोजी अर्ज करुन शासनाच्या युध्दोत्तर पुनर्वसन योजना क्र.२१९ अंतर्गत असलेल्या अटी व शर्तीनुसार मुंबई उपनगर जिल्हयातील नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांना प्रदान केलेली एकूण शासकीय जमिन व सदनिका हस्तांतर मोबदला म्हणून वसुल केलेले महसूल उत्पन्न इत्यादीबाबत माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती विभागाच्या स्तरावर उपलब्ध नाही. म्हणून तक्रारदाराचा अर्ज पुढील आवश्यक कार्यवाहीकरीता जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे हस्तांतरीत करुन तक्रारदारास गैरतक्रारदाराने दि.१२.२.०८च्या पत्रान्वये कळविले. तक्रारदाराच्या अर्जात नमूद विषय जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा कार्यालयाच्या कार्यकक्षेत येत नसल्याने तक्रारदाराचा अर्ज महसूल व वन विभाग, मंत्रालयाकडे परत केला. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव श्री.विनोद सि.वखारे हे हजर होते. सदर प्रकरणी तक्रारदाराने नेमकी विशिष्ट अशी माहिती मागीतलेली नाही असे गैरतक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मीअसे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने तक्रारदारास सर्व संबंधीत फाईल निरिक्षणाकरीता प्रथम उपलब्ध करुन द्याव्यात. तक्रारदाराने कार्यालयात हजर राहून संबंधीत फाईल व कागदपत्राचे निरिक्षण करुन हव्या असलेल्या माहितीची गैरतक्रारदाराकडे मागणी केल्यानंतर गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:३१.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८८७/०२**

**डॉ.श्री. प्रसाद रामचंद्र जोशी,**
**अत्रेय फार्मास्युटीकल्स, ५९/१,सुखनिवास,**
**गणपती चौक, आग्रा रोड, कल्याण(प.),**
**पिन-४२१३०१, जिल्हा-ठाणे. ..... तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी वैद्यकीय अधिकारी,**
**अधिष्ठाता यांचे कार्यालय,**
**२०शय्या आयुर्वेद कक्ष, ससून सर्वोपचार रुग्णालय,**
**पुणे-४११ ००१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार डॉ.श्री. प्रसाद जोशी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१७.११.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्ररदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.७.७.०९ रोजी अर्ज करुन राज्य आणि केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी, अंतररुग्ण बाहयरुग्ण अहवाल,औषधे इत्यादी माहिती मागीतली होती. माहितीपोटी रु.३५/- इतके शुल्क भरुन औषधासाठी तसेच अंतररुग्ण:बाहयरग्णाबाबतची माहिती प्राप्त करुन घ्यावी. केंद्र शासनाकडून कोणतेही अनुदान देण्यात आले नाही. महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या अनुदानाची माहिती शासनाचे संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. मागीतलेले औषधाचे नमुने हे माहितीच्या अधिकाराच्या व्याख्येत बसत नसल्यामुळे कार्यालयाकडून देता येणे शक्य नाही असे जन माहिती अधिकारी यांनी दि.१२.८.०९च्या पत्रान्वये तक्रारदारास गैरतक्रारदाराने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे तक्रार दाखल केली. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.१२.८.०९च्या पत्रानुसार माहिती पुरविली आहे. औषधाचे नमुने देण्याचे नाकारले आहे. यावरुन अर्जावर गैरतक्रारदाराने नियमानुसार समर्पक कार्यवाही केली असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः२८.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८८५/०२**

**श्री.महेश बने,**
**द्वारा- श्री.संजय तुकाराम दाते,**
**वैभव पार्क, डी विंग, रुम नं.००६, तळ मजला,**
**रेमंड शॉप मागे, मिरा-भाईंदर रोड, मिरा रोड(पूर्व),**
**जि.ठाणे-४०११०७.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा ए.ओ.(आर/एन)(शाळा),**
**महापालिका आयुक्त कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,सी.एस.टी.स्टेशन समोर,मुंबई-१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.महेश बने यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.३१.८.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२०.५.२००८ रोजी अर्ज करुन तक्रारदाराच्या पत्नीने ए.ओ.(स्कूल)आर/एन यांना वारंवार पत्रे,स्मरणपत्रे पाठविली. परंतू उत्तर प्राप्त झाले नाही. केलेल्या पत्रव्यवहाराला उत्तर मिळाले नसल्याने उत्तर का मिळाले नाही याबाबत माहिती मागीतली होती. माहिती मिळाली नसल्याने व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केली.

तक्रारदाराची तक्रार माहितीच्या अधिकारासंबंधी असल्याचे दिसून येत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२८.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८८४/०२**

**श्री. दिलीप धोंडी परब ,**
**टी/११/४०४, प्रतिक्षा नगर,**
**सायन कोळीवाडा, मुंबई-४०००२२.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**फ ग(दक्षिण) विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**परेल, मुंबई-४०००१२.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. दिलीप परब यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२३.१.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१९.१२.२००७ रोजी अर्ज केला होता. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. तक्रारदाराचे नांव संमतीच्या यादीमध्ये दिसून येते का? जर तक्रारदाराचे नाव संमतीच्या यादीमध्ये असल्यास करारपत्राची प्रत विकासकाकडून प्राप्त करुन घेऊन हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी.

मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## **<u>आदेश</u>**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२८.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८८३/०२**

**श्री. देवेंद्र बलराम तलवार,**
**११०,सिलवर हाऊस,१३, क्रॉस रोड,**
**एम.आई.डी.सी.,अंधेरी(प.), मुंबई-४०००९३.** **..... तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय अधिकारी,**
**मुंबई शहर(पुनर्वसन शाखा) यांचे कार्यालय,**
**युनायटेड इंडिया इमारत, ४था मजला,**
**सर पी.एम.मार्ग,फोर्ट, मुंबई-४००००१.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. देवेंद्र तलवार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.३.३.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२४.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२५.७.०८ रोजी अर्ज करुन सायन कोळीवाडा येथील वि.क्र.२१, रुम नं.९९७ येथील अमरदास दयालसिंग तलवार यांच्या रुमबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. रुम क्र.९९७ ही मूळ श्री.अमरदास दयालसिंग तलवार यांचे नावे होती. त्यांचे मृत्यूपश्चात त्यांचे वारसाबाबत १)वारस दाखला२)वारसाचे ना-हरकत शपथपत्र तक्रारदाराने अर्जासोबत सादर केलेले नसल्याने तक्रारदाराच्या अर्जावर पुढील कार्यवाही करता येत नाही असे जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय अधिकारी, मुंबई शहर(पुनर्वसन शाखा) यांनी दि.२७.२.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे तक्रारदाराने व्यथीत होऊन राज्य माहिती आयोगाकडे तक्रारदाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराने आयोगासमोर असे प्रतिपादन केले की, तक्रारदारास सदर प्रकरणी मागणीनुसार माहिती पुरविण्यात आली आहे. तक्रारदर तक्रारीवरील सुनावणीकरीता हजर नव्हते. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२८.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/७८३/०२**

**श्री.एस.आर.पाटील(मुख्याध्यापक),**
**सर्वोदय विद्यालय, घाटकोपर(नं.१),**
**भीम नगर, लालबहादूर शास्त्री मार्ग,**
**घाटकोपर(पश्चिम), मुंबई-४०००८६.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपनिरीक्षक(एन वार्ड),** ..... **उत्तरवादी**
**शिक्षण निरीक्षक(उत्तर) यांचे कार्यालय,**
**नवीन प्रशासकीय इमारत,फाईन आर्ट गॅलरीच्या बाजूला,**
**रेशनिंग ऑफीसच्या वर,चेंबूर(पूर्व), मुंबई-४०००७१.**

**विवेचन**

तक्रारदार श्री. एस.आर.पाटील,मुख्याध्यापक यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.४.१०.२००७ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.७.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१०.५.२००७ रोजी अर्ज करुन म.न.पा.एन विभागातील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांच्या नावाच्या यादीची प्रत,अतिरिक्त ठरलेल्या शिक्ष्कांपैकी किती शिक्षक दुस-या शाळेकडे पाठविले त्या शिक्षकांच्या नावाची व सर्व संबंधीत शाळेची यादी इत्यादी अनुषंगिक माहिती मागितली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे थेट तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरीता कोणीही हजर नव्हते. सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्रापत झाल्यापासून १५ दिवसाचेआत तक्रारदारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२८.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/५००/०२**

**श्री. शिवाजी संभाजी बोईनवाड,**
**सी-१०२/१२, सागर को.ऑप.हौ.सो.लि.,**
**सेक्टर-२, चारकोप, कांदिवली(प.),**
**मुंबई-४०००६७.** ..... **तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव-२०२/२०,**
**सागर को.ऑप.हौ.सो.लि.,**
**सेक्टर-२, चारकोप,कांदीवली(प.),**
**मुंबई-४०००६७.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. शिवाजी संभाजी बोईनवाड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१६.९.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.३०.११.०५ रोजी अर्ज करुन सागर सहकारी गृहनिर्माण संस्था लि.,सेक्टर-२, चारकोप,कांदीवली(प.), मुंबई या संस्थेच्या कामकाजाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास मागणीप्रमाणे विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील क्र.२००८/४३८/०२ दाखल केले होते. तक्रारदारास ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.३.७.०८ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरीता तक्रारदार/गैरतक्रारदार हजर नव्हते. सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविल्याचे तक्रारीतील कागदपत्रावरुन दिसून येत नाही.तक्रारदारास माहिती पुरविण्यात आलेली नाही. आयोगाच्या दि.३.७.०८ च्या आदेशाचे गैरतक्रारदाराने पालन केलेले नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग झला आहे. याकरीता गैरतक्रारदार यांना

जबाबदार धरुन सदर प्रमादाबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार गैरतकारदाराविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:२८.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८७३/०२**

**श्री. नितीन एम.सरवैय,**
**५१/११११,आझाद नगर-३,**
**विरा देसाई रोड, अंधेरी(प.),**
**मुंबई-४०००५८.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-२,**
**उपनिबंधक, सहकारी संस्था,मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व), मुंबई-५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. नितीन सरवैय यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२३.७.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२१.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते.. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.३१.५.०८ रोजी अर्ज करुन कृपा सागर सोसायटीने मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाबरोबर केलेल्या अभिहस्तांतरण कराराची कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याबाबत माहिती मागीतली होती. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती मिळकत व्यवस्थापक-२, मुंबई मंडळ वांद्रे(पूर्व)यांचे अधिकार कक्षेत येत असल्याने तक्रारदाराचा अर्ज त्या कार्यालयाकडे वर्ग केला असल्याचे उप निबंधक सहकारी संस्था मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांनी दि.२०.६.०८च्या पत्रान्वये तक्रारदारास कळविले. यामुळ तक्रारदाराने दि.२२.७.०८ रोजी प्रथम अपीलीय अधिका-याकडे अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी प्रथम अपीलाची प्रत घेण्यास नकार दिला. माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याऐवजी तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, मिळकत व्यवस्थापक-२, मुंबई मंडळ, वांद्रे(पूर्व), मुंबई-५१ यांनी कृपा सागर सोसायटीने, मुंबई गृहनिर्माण मंडळाबरोबर केलेल्या अभिहसतांतरण कराराची प्रत तक्रारदारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरवावी.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२८.५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८६३/०२**

**श्री. जगदिश खुराना,**
**खुराना कंपाऊंड, आय.बी.पटेल रोड,**
**गोरेगाव(पूर्व), मुंबई-४०००६३.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक,मुंबई शहर क्र.२,**
**मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालय,**
**जुने जकात घर, तळमजला, शहिद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४०००२३.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. जगदीश खुराना यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.७.७.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२१.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते.. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२१.५.०८ रोजी अर्ज करुन १)दस्त क्रमांक बबज-२९९० २)बबज ३८२७/८६ व ३)५२१/८६ च्या सद्यस्थितीबाबत माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास खाली नमूद केल्यानुसार माहिती कळविली.

उक्त दस्तांसंबंधी अभिलेख विभागातील अभिलेख तपासले असता दस्त क्रमांक एस बबज २९९०/८६ हा यादी क्र.३/८५ दस्त क्र.३८२७/८६ यादी क्र.७/८६ व दस्त क्र एस बबज ५२१/८६ हा यादी क्र.१/८६ अन्वये कलम ३२अ खालील कार्यवाहीसाठी जा.क्र.२३८२ दि.४.९.०६ नुसार मा. मुद्रांक जिल्हाधिकारी, ता.बोरीवली यांचे कार्यालयात पाठविण्यात आलेले आहेत. बलम ३२-अची कार्यवाही पूर्ण होऊन उक्त सर्व दस्त या कार्यालयात अद्याप प्राप्त झालेले नाहीत.

गैरतक्रारदाराने चुकीची माहिती दिली असल्याच्या कारणावरन तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याऐवजी थेट राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली आहे. तक्रारदाराने तीनही दस्ताची प्रमाणित प्रत प्राप्त करुन घेतली असल्याचे गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. तसेच गैरतक्रारदाराने आयोगासमोर असे प्रतिपादनदकेले की, तीनही मूळ दस्त हे छायाचित्र नोंदणीसाठी व्यवस्थापक शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे येथे छायाचित्र नोंदणीसाठी यादी क्र.१/२००९ अन्वये पाठविण्यात आले आहे. तक्रारदाराचे तीनही दस्त पुणे येथील कार्यालयाकडून यावयाचे आहेत. मूळ दस्त पुणे येथून छायाचित्र नोंदणी पूर्ण होऊन कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर तक्रारदारास त्वरित परत करण्यात येतील असेही गैरतक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी तक्रारदारास गैरतक्रारदाराने माहिती पुरविली असल्याचे दिसून येते.या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः२८.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक २०१०/८६४/०२**

**श्री. व्ही.व्ही.गायकवाड,**
**साई ओम को.ऑप.हौ.सो.,**
**प्लॉट नं.१६, लुईसवाडी, ठाणे-४००६०४.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक,**
**जिल्हा व सत्र न्यायालय,**
**ठाणे-६०१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. व्ही.व्ही.गायकवाड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१२.१.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२१.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते.. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१२.११.०७ रोजी अर्ज करुन प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी,ठाणे न्यायालय यांनी फौजदारी प्रकरण ४५०/२००२ बाबत दिलेल्या निर्णयाविरुद्ध अपील प्रस्ताव फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३७८(१) (अ) मधील तरतुदीनुसार जिल्हा व सत्र न्यायालयात अपील दाखल करण्यासाठी केलेल्या शिफारशीसंबंधी अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे थेट तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर असे प्रतिपादन केले की, तक्रारदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात तयार आहे. सदर माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता तक्रारदार येईल म्हणून ते तक्रारदाराची वाट पहात आहेत. या परिस्थितीत मी असे आदेश

देतो की, गैरतक्रारदाराने तक्रारदारास आवश्यक ती माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाचे आत टपालातून पाठवावी.

**<u>आदेश</u>**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः२६.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४७८३/०२६**

**श्री. सुहास सुभाष भोसले,**
**७/५६,बी.आय.टी.चाळ,सेंट मेरी रोड,**
**माझगांव, ताडवाडी, मुंबई-४०००१०. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपनियंत्रक,**
**उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय,**
**अ परिमंडळ, पुरवठा भवन इमारत,**
**५वा मजला, जनरल नागेश मार्ग,**
**परेल, मुंबई-४०००१२.**

**जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी,**
**शिधावाटप कार्यालय ३/अ,**
**उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय,**
**अ परिमंडळ, पुरवठा भवन इमारत,**
**५वा मजला, जनरल नागेश मार्ग,**
**परेल, मुंबई-४०००१२. ...उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. सुभाष भोसले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन अधिकृत शिधावाटप दुकान क्र.३/अ/७७ चे नुतनीकरण नेमके कोणत्या सालापर्यंत झाले आहे याबाबत माहिती मागीतली होती. अधिकृत शिधावाटप दुकान क्र.३/अ/७७ चे प्राधिकारपत्र सन २००४ पर्यंत नुतनीकरण झालेले असून पुढील नुतनीकरणाकरीता प्रकरण अ परिमंडळ वरळी येथे पाठविण्यात आलेले आहे असे दि.११.२.०९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी, शिधावाटप कार्यालय क्र.३/अ श्रीम.एस.एस.साळवी यांनी अपीलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी खोटी माहिती पुरविली असल्याने सदर अधिका-यांविरुध्द तात्काळ कठोर कारवाई करावी याबाबत अपीलकाराने प्रथम

अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिकारी यांजकडून अपीलकारास चुकीची माहिती देण्यात आली आहे. त्यास जबाबदार धरण्यात येऊन जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी,शिधावाटप कार्यालय क्र.३/अ यांना ज्ञापन देण्यात येऊन त्यांचेवर नियमानुसार खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१७.७.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानुसार कार्यालयाकडून पत्र क्र.अप/माअ/०९/जा.२९३१, दि.१७.७.०९ नुसार जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी ३/अ श्रीम.एस.एस.साळवी यांचेवरील दोषारोपपत्र जोडपत्र १ ते ४ मुख्य कार्यालयास पाठविले होते. दोषारोपानुषंगाने मुख्य कार्यालयाने दि.५.११.०९च्या पत्रानुसार दंडात्मक व शिस्तभंग विषयक कारवाई करण्याचे अधिकार प्रथम अपीलीय अधिका-यास नसून राज्य माहिती आयोगास असल्याचे प्रधान कार्यालयाने निदर्शनास आणले व दि.१७.११.०९ रोजी दोषारोप रद्द करुन मुख्य कार्यालयाच्या स्तरावर योग्य ती कारवाई होण्याबाबत कळविले. चुकीची माहिती देणा-या जन माहिती अधिका-यांच्या चुकीवर पांघरुण घालून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करणा-या अधिका-यास शिक्षा देण्यात यावी. उशिराने माहिती दिल्यामुळे मोफत माहिती देऊन माहितीपोटी भरलेले रु.१२०००/- परत मिळावेत म्हणून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ६.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच सुनावणीच्या वेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अधिकृत शिधावाटप दुकान क्र.३/अ/७७ या दुकानाचे नुतनीकरण नेमके कोणत्या सालापर्यंत झाले आहे याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ३/अ/७७ चे प्राधिकारपत्र सन २००४ पर्यंत नुतनीकरण झालेबाबत अपीलकारास माहिती दिली. तद्नंतर अपीलकाराने याबाबत अ परिमंडळ कार्यालयाकडून माहितीच्या अधिकारात माहिती प्राप्त केली असता ३/अ/०७या अ.शि.दुकानाचे प्राधिकारपत्र २००१ पर्यंतच नुतनीकरण झालेले असल्याची अपीलकारास दि.२१.४.०९च्या पत्रान्वये माहिती मिळाली. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास खोटी माहिती दिली असल्याच्या मुद्यावरुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्याचे दि.१७.७.०९ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी प्रथम अपीलावरील सुनावणीचेवेळी खालीलप्रमाणे सदरप्रकरणी खुलासा सादर केला होता.

“अधिकृत शिधावाटप दुकान क्र.३/अ/७७ चे सन २००५-२००७ या कालावधीकरीताचे प्राधिकारपत्र नुतनीकरणासंबंधीचे प्रकरण दुकानदारास वेळोवेळी सूचना देऊनही तसेच पत्रवव्यहार करुनसुध्दा नुतनीकरणासंबंधीच्या आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे, सदर प्रकरण खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करुन संपूर्ण प्रकरण उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ यांना पत्र क्रमांक ३/अ/दुकान/०५/८७३/१७१/जा.१३०४, दि.२६.९.२००८ रोजी सादर केले. सदर प्रकरण २००५-२००७ या कालावधीसाठीचे होते. सबब सन २००४ पर्यंत नुतनीकरण झाले असावे असे गृहीत धरुन माहिती अधिकारासंबंधी अर्जदारास सन २००४ पर्यंत नुतनीकरण झाले असे कळविण्यात आले. त्यामध्ये

गैरतक्रारदाराचा कोणताही खोटी माहिती देण्याचा उद्देश नव्हता. तरी यापुढे काळजीपूर्वक माहिती देण्यात येईल".

सदर प्रकरणी नियंत्रक- शिधावाटप व संचालक नागरीपुरवठा यांना, उपनियंत्रक शिधावाटप अ-परिमंडळ, परेल यांनी दि.२४.११.०९ व दि.२७.११.०९ च्या पत्रान्वये पाठविलेला अहवाल पहाता जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी श्रीम.साळवी यांच्याविरुध्द कोणतेही गंभीर आरोप/दोष आढळून येत नाहीत म्हणून प्रकरण दफ्तरी दाखल करण्याचा प्रस्ताव नियंत्रक शिधावाटप यांनी मान्य केला. जन माहिती अधिकारी हया प्रतिज्ञापत्र छाननी मोहिमे दरम्यान शिधावाटप कार्यालय क्र.३/अ कार्यालयात कार्यरत नव्हत्या. माहिती अधिकारात दिलेली माहिती उपलब्धतेनुसार दिली असे अहवालावरुन दिसून येते. सदर बाब विचारात घेऊन नियंत्रक शिधावाटप यांनी जन माहिती अधिका-यांविरुध्दचे खातेनिहाय चौकशीचा प्रस्ताव रद्द केला आहे. विभागीय चौकशी रद्द करण्याचा निर्णय योग्य नसल्याचे तक्रारदाराचे म्हणणे बरोबर नाही असे उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. उत्तरवादीने विभागीय चौकशी रद्द करण्याच्या घेतलेल्या निर्णयात राज्य माहिती आयोगास ढवळाढवळ करता येत नाही. प्रथम अपीलीय अधिका-यांनी विभागीय चौकशी प्रस्तावित केली. त्यानंतर रद्द करण्याचा निर्णय घेतला. सदर निर्णयाविरुध्द कारवाई करणे आयोगास बंधनकारक नाही. या परिस्थितीत मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:३१.५.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**